# पिंपरी चिंचवड महानगरपालिका, पिंपरी - ४११ ०१८

## मा.महापालिका सभा

## कार्यपत्रिका क्रमांक – ९

## सभावृत्तांत

दिनांक – १६.१०.२०१७ वेळ – दुपारी २.०० वाजता

पिंपरी चिंचवड महानगरपालिकेची माहे ऑक्टोंबर-२०१७ ची मा.महापालिका सभा सोमवार दि.१६.१०.२०१७ रोजी दुपारी २.०० वा. महानगरपालिकेच्या प्रशासकीय इमारतीमधील यशवंतराव चव्हाण सभागृहात आयोजित करणेत आली होती. सभेस खालील सन्मा.सदस्य उपस्थित होते.

१) मा.नितीन (आप्पा) प्रताप काळजे - महापौर
२) मा.शैलजा अविनाश मोरे - उपमहापौर
३) मा.कुंदन अंबादास गायकवाड
४) मा.स्वीनल कपिल म्हेत्रे
५) मा.साधना अंकुश मळेकर
६) मा.दत्तात्रय बाबूराव साने
७) मा.अश्विनी संतोष जाधव
८) मा.सारीका शिवाजी सस्ते
९) मा.राहुल गुलाब जाधव
१०) मा.वसंत प्रभाकर बोराटे
११) मा.बुर्डे सुवर्णा विकास
१२) मा.तापकीर विनया प्रदीप (आबा)
१३) मा.लक्ष्मणशेठ सोपान सस्ते
१४) मा.डोळस विकास हरिश्चंद्र
१५) मा.उंडे लक्ष्मण धोंडू
१६) मा.घुले नानी ऊर्फ हिराबाई गोवर्धन
१७) मा.गायकवाड निर्मला मनोज
१८) मा.सागर बाळासाहेब गवळी
१९) मा.गोफणे अनुराधा देविदास
२०) मा.बारसे प्रियांका प्रविण
२१) मा.अजित दामोदर गव्हाणे
२२) मा.बोइनवाड यशोदा प्रकाश
२३) मा.लांडगे सारिका संतोष
२४) मा.लांडगे रवि लक्ष्मण
२५) मा.लांडगे राजेंद्र किसनराव
२६) मा.संतोष (आण्णा) ज्ञानेश्वर लोंढे

२७) मा.प्रा.सोनाली दत्तात्रय गव्हाणे
२८) मा.फुगे भिमाबाई पोपट
२९) मा.ॲड.नितीन ज्ञानेश्वर लांडगे
३०) मा.सावळे सिमा रविंद्र
३१) मा.लोंढे नम्रता योगेश
३२) मा.मडिगेरी विलास हनुमंतराव
३३) मा.लांडे विक्रांत विलास
३४) मा.गीता सुशिल मंचरकर
३५) मा.राहुल हनुमंतराव भोसले
३६) मा.वैशाली ज्ञानदेव घोडेकर
३७) मा.समीर मोरेश्वर मासुळकर
३८) मा.अनुराधा गणपत गोरखे
३९) मा.केशव हनुमंत घोळवे
४०) मा.मंगला अशोक कदम
४१) मा.अश्विनी भिमा बोबडे
४२) मा.योगीता ज्ञानेश्वर नागरगोजे
४३) मा.संजय बबन नेवाळे
४४) मा.एकनाथ रावसाहेब पवार
४५) मा.भालेकर प्रविण महादेव
४६) मा.पौर्णिमा रविंद्र (आप्पा) सोनवणे
४७) मा.संगिता (नानी) प्रभाकर ताम्हाणे
४८) मा.पंकज दत्तात्रय भालेकर
४९) मा.घोलप कमल अनिल
५०) मा.उत्तम प्रकाश केंदळे
५१) मा.चिखले सचिन तुकाराम
५२) मा.यादव मीनल विशाल
५३) मा.वैशाली जालिंदर काळभोर
५४) मा.प्रमोद कुटे
५५) मा.राजू मिसाळ
५६) मा.बाबर शर्मिला राजू
५७) मा.अमित राजेंद्र गावडे
५८) मा.बाळासाहेब नामदेव ओव्हाळ
५९) मा.खानोलकर प्रज्ञा महेश
६०) मा.भोंडवे संगिता राजेंद्र
६१) मा.मोरेश्वर महादू भोंडवे
६२) मा.ढाके नामदेव जनार्दन
६३) मा.माधुरी कुलकर्णी उर्फ मोनाताई

६४) मा.करुणा शेखर चिंचवडे
६५) मा.चिंचवडे सचिन बाजीराव
६६) मा.भोईर सुरेश शिवाजी
६७) मा.अपर्णा निलेश डोके
६८) मा.अश्विनी गजानन चिंचवडे-पाटील
६९) मा.गावडे राजेंद्र तानाजी
७०) मा.शैलेश उर्फ शैलेंद्र प्रकाश मोरे
७१) मा.जयश्री वसंत गावडे
७२) मा.कोमल दिपक मेवानी
७३) मा.शितल उर्फ विजय गोरख शिंदे
७४) मा.सुलक्षणा राजू धर
७५) मा.शाम गणपतराव लांडे
७६) मा.सुजाता सुनिल पालांडे
७७) मा.योगेश मंगलसेन बहल
७८) मा.कदम निकीता अर्जुन
७९) मा.संदीप बाळकृष्ण वाघेरे
८०) मा.उषा संजोग वाघेरे (पाटील)
८१) मा.डब्बू आसवानी (हिरानंद)
८२) मा.पाडाळे निता विलास
८३) मा.काळे उषा दिलीप
८४) मा.कोकणे संतोष अंकुश
८५) मा.पवार मनिषा प्रमोद
८६) मा.बारणे अर्चना तानाजी
८७) मा.अभिषेक गोविंद बारणे
८८) मा.कैलास उर्फ बाबा भालचंद्र बारणे
८९) मा.अॅड.भोसले सचिन सुरेश
९०) मा.बारणे झामाबाई बाळासाहेब
९१) मा.बारणे माया संतोष
९२) मा.निलेश हिरामण बारणे
९३) मा.वाघमारे अश्विनी विक्रम
९४) मा.दर्शले रेखा राजेश
९५) मा.कलाटे राहुल तानाजी
९६) मा.कलाटे मयूर पांडुरंग
९७) मा.ममता विनायक गायकवाड
९८) मा.कामठे तुषार गजानन
९९) मा.चोंधे आरती सुरेश
१००) मा.कस्पटे संदिप अरुण

१०१) मा.बाबासाहेब (बाबा) त्रिभुवन
१०२) मा.सविता बाळकृष्ण खुळे
१०३) मा.सुनिता हेमंत तापकीर
१०४) मा.चंद्रकांत बारकु नखाते
१०५) मा.कुटे निर्मला संजय
१०६) मा.विठ्ठल उर्फ नाना काटे
१०७) मा.आंगोळकर सागर सुनिल
१०८) मा.मुंढे उषा अंकुश
१०९) मा.कदम शशिकांत गणपत
११०) मा.लोखंडे चंदा राजू
१११) मा.बनसोडे राजू विश्वनाथ
११२) मा.आशा धायगुडे-शेंडगे
११३) मा.काटे स्वाती (माई) चंद्रकांत
११४) मा.रोहित (आप्पा) सुदाम काटे
११५) मा.कांबळे अंबरनाथ चंद्रकांत
११६) मा.राजापुरे माधवी राजेंद्र
११७) मा.चौगुले सीमा दत्तात्रय
११८) मा.नवनाथ दत्तू जगताप
११९) मा.संतोष बबन कांबळे
१२०) मा.सोनवणे शारदा हिरेन
१२१) मा.उषा उर्फ माई मनोहर ढोरे
१२२) मा.हर्षल मच्छिंद्र ढोरे
१२३) मा.वाबळे संजय मल्हारराव
१२४) मा.भोईर भाऊसाहेब सोपानराव
१२५) मा.थोरात ज्ञानदेव मुरलीधर
१२६) मा.नायर प्रेमकुमार शंकरन उर्फ बाबू
१२७) मा.ॲड.मोरेश्वर ज्ञानेश्वर शेडगे

याशिवाय मा.श्रावण हर्डीकर-महापालिका आयुक्त, मा.अच्युत हांगे-अतिरिक्त आयुक्त, मा.उल्हास जगताप-नगरसचिव, मा.तळदेकर-मुख्यलेखापरिक्षक, मा.चव्हाण-शहर अभियंता, मा.डॉ.अनिल रॉय–आरोग्य वैद्यकीय अधिकारी, मा.ठाकूर- उपसंचालक नगररचना, मा.गावडे-सहआयुक्त, मा.तुपे, मा.दुधेकर, मा.पठाण-सहशहर अभियंता, मा.डोईफोडे, मा.आष्टीकर, मा.कडूसकर, मा.खोरटे, मा.दुरगुडे, मा.इंदलकर, मा.राऊत- सहा.आयुक्त, मा.पवार-कायदा सल्लागार, मा.पोमण-मुख्य माहिती व तंत्रज्ञान अधिकारी, मा.निकम, मा.इंगळे, मा.लडकत, मा.कांबळे, मा.गट्टूवार, मा.भोसले-कार्यकारी अभियंता, हे अधिकारी सभेस उपस्थित होते.

---------

**मा.महापौर-** उपस्थित मा.नगरसेवक व मा.नगरसेविका, मा.आयुक्त, अधिकारी वर्ग, पत्रकार, नागरिक या सर्वांचे स्वागत करुन सभा कामकाजाला सुरुवात करणेत येत आहे.

**मा.नामदेव ढाके--**मा.महापौर साहेब,मा.आयुक्त साहेब,सर्व सन्मा.सभागृह,पत्रकार बंधू, गेले अनेक वर्षांपासून खरे म्हणजे या पिंपरी चिंचवड शहरामुळे संपूर्ण राज्यात अनधिकृत घरांचा जो प्रश्न आहे तो सोडवण्याचं काम या राज्याचे मुख्यमंत्री आदरणीय श्री.देवेंद्र फडणवीस साहेबांनी चार दिवसांपूर्वी एक जी.आर. काढला होता. पिंपरी चिंचवड शहरातील अनधिकृत घरांसंदर्भात मा.आमदार लक्ष्मणभाऊ जगताप, मा.आमदार महेशदादा लांडगे यांच्या सातत्याने पाठपुराव्यामुळे गेल्या अनेक वर्षांपासून प्रलंबित असलेला अनधिकृत घरांचा प्रश्न याठिकाणी त्यांनी सोडवलेला आहे. हा प्रश्न सोडवल्यामुळे आदरणीय मुख्यमंत्री मा.श्री.देवेंद्र फडणवीस साहेब, मा.आमदार महेशदादा लांडगे व मा.आमदार लक्ष्मणभाऊ जगताप यांच्या अभिनंदनाचा ठराव मी सभागृहाच्या वतीने इथे मांडतोय.

**मा.चंद्रकांत नखाते**- मा.महापौर साहेब,मा.आयुक्त साहेब,सर्व सन्मा.सभागृह, आत्ता जो ठराव मांडला, त्याला माझे अनुमोदन आहे.

**मा.महापौर** - हा अभिनंदनाचा ठराव मंजूर करण्यात येत आहे.

**मा.दत्तात्रय साने** - मा.महापौर साहेब, मा.नामदेव ढाके यांनी जो अभिनंदनाचा ठराव मांडला आहे, त्या ठरावाला आमचेही अनुमोदन आहे. या ठरावाविरोधात मी कधीही बोलणार नाही. कारण अनधिकृत बांधकामांचा प्रश्न हा कोणत्याही एका पक्षाचा नव्हता किंवा कोणा राष्ट्रवादीचा, एनसीपीचा किंवा कोणत्याही अन्य पक्षाचा, नागरीकाचा तो प्रश्न नव्हता तर तो सर्वसामान्य जनतेचा प्रश्न होता. अभिनंदनाचा जो ठराव केला त्या विषयाला मी अनुमोदन देतो. पण ठराव नक्की काय आलेला आहे. अनधिकृत बांधकामांचा प्रश्न सोडवला,सोडवला,सोडवला, नक्की कसा सोडवला. आमच्यापर्यंत हा ठराव अजून आलेला नाही. किंवा त्याबाबतीत आम्हाला कसलीही कल्पना नाही. शास्तीकराबाबत पाचशे स्क्वे. फूटापर्यंत इतके आणि पुढे हजार स्क्वे. फूटापर्यंत शंभर टक्के असा जो काही ठराव आलेला आहे तो कुठल्याही लोकांना, कुठल्याही नागरीकांना याचा लाभ होणार नाही, असे मी पत्रकार बंधूंच्या समोर सांगतोय. अनधिकृत बांधकाम सोडलं किंवा त्याचा प्रश्न सूटला, शास्तीकराचा प्रश्न सूटला, हा जनतेचा भूलभूलैय्या करण्यापेक्षा नक्की वस्तुस्थिती काय आहे. कारण आमच्या भागात हा प्रश्न जास्त आहे. मला वाटते, आपले मा.एकनाथ पवार इथे आहेत, यांनी आम्ही त्यासाठी पार काठ्या लाठ्या खाल्लेल्या आहेत. अनधिकृत बांधकामांसाठी आम्ही अनेक वेळा आंदोलने केलेली आहेत. यात नक्की काय जी.आर. केला आहे. जसा शास्तीकराचा ठराव सभागृहासमोर मांडला व वाचला, तसा अनधिकृत बांधकामांचा ठराव सभागृहासमोर वाचला जावा अशी मा.महापौर साहेब मी आपल्याला विनंती करतो. नंतर आम्हाला चर्चा करायला देखील वेळ द्यावा.

**मा.महापौर** – हा ठराव इथे वाचण्यापेक्षा त्याची प्रत सगळ्यांना दिली जाईल.

**मा.दत्तात्रय साने** – मा.महापौर साहेब, हा ठराव वाचण्यास सांगावा अशी मी विनंती करतो.

**मा.महापौर-** थोडक्यात माहिती दिली जाईल. बाकी डिटेल्स घरी पाठवले जातील. जी.आर. इंग्लिशमध्ये आहे. किती लोकांना समजेल. त्यापेक्षा पठाण साहेब थोडक्यात सांगतील. जी.आर. तुम्हाला घरी वाचायला दिला जाईल. मग तुम्ही अभ्यास करा. मा.पठाण साहेब, आपण हा ठराव वाचून दाखवावा.

**मा.दत्तात्रय साने-**मा.महापौर साहेब,तुम्ही असे बोलू नका. जी.आर. हा इंग्लिश व मराठी दोन्हीमध्ये असतो.

**मा.पठाण(सहशहर अभियंता)**-मा.महापौर साहेब,मा.आयुक्त साहेब,सर्व सन्मा.सभागृह,पिंपरी चिंचवड महानगरपालिका हद्दीतील दि.३१/१२/२०१५ पुर्वीचे बांधकामे नियमीत करण्यासाठी शासन निर्णय क्र. टीपीएस/१८१४ दि.७/१०/२०१७ पारीत करण्यात आलेला आहे. पिंपरी चिंचवड महानगरपालिका हद्दीतील अनधिकृत मिळकतधारकांना दि.३१ डिसें. २०१५ पुर्वीची बांधकामे नियमीत करण्यासाठी महानगरपालिकेकडे अर्ज करावे लागणार आहेत. त्याची थोडक्यात माहिती आपल्यालादेतो की कोणत्या प्रकारतील बांधकामे नियमीत होउ शकतात. रहिवाशी झोन, वाणिज्य झोन, औदयोगीक झोन, आरक्षणास पर्यायी जागा नियमानुसार दिल्यास आरक्षणामधील त्याच्यामध्ये ग्राऊंड, प्लेग्राऊंड, ओपन स्पेस आरक्षणे वगळून तसेच रस्त्यास पर्यायी रस्ता दिल्यास विकास आराखडयातील रस्त्याची सुध्दा बांधकामे नियमीत होवू शकतात. कोणत्या प्रकारातील बांधकामे नियमीत होवू शकणार नाहीत. रेडझोन, बफर झोन, ग्रीन झोन, ब्ल्यू लाईन मधील बांधकामे, डोंगरउतारावरील बांधकामे, धोकादायक इमारती बांधकामे व दि.१/१/२०१६ नंतर बांधलेली वा पुर्ण झालेली बांधकामे नियमीत होणार नाहीत. नियमीत करण्याची पध्दत आपण ठरवतो. आपण याचे मा.आयुक्त साहेबांच्या मंजूरीने जाहीर निवेदन देणार आहोत. यासाठी सहा महीन्याची मुदत दिली जाईल. अर्ज स्विकारले जातील व कोणती कागदपत्रे लागणार आहेत ते जाहीर केले जाईल. त्यानंतर महानगरपालिकेच्या नोंदणीकृत अर्किटेक्टव्दारे छाननीशुल्कासहीत कागदपत्रासहीत अर्ज करावे लागतील. त्यानंतर महानगरपालिकेचे अभियंते प्रत्यक्ष स्थळाची पाहणी करुन, नकाशाची छाननी करुन त्यात काही त्रुटी असतीलतर त्या कळवतील. तसेच होणारी रक्कम जी आहे शुल्क निश्चित करतील व ती कळवतील. संबंधितांनी शुल्क महानगरपालिकेकडे जमा केल्यानंतर त्यांना तो नियमतीकरण केल्याचा दाखला देण्यात येईल. आता प्रश्न आहे किती उंची पर्यंतच्या इमारती. १५ मी. उंची पर्यंतचे मात्र त्यापुढे ३६ मी. पर्यंतचे अग्निशामक विभागाचा नाहरकत दाखला सादर करण्यात आल्यानंतर ते नियमीत करता येतील. एफएसआय किती असणार आहे असा प्रश्न येवू शकतो. सर्वसाधारणपणे एक अनधिकृत प्लॉटसाठी .८५ एक चटई क्षेत्र दयायचे अनुज्ञेय आहे तथापि याव्यतिरीक्त बांधकाम पॅसेजेस, टेरेस, जिना याकरिता जे प्रिमीएम शुल्क भरुन व पर्यायाने प्रत्यक्ष ३० टक्के पर्यंत एफएसआय वाढवता येवू शकतो आणि नियमानुसार जर रस्तारुंदीप्रमाणे टिडीआर अनुज्ञेय होत असल्यास टिडीआर घेवून सुध्दा क्षेत्र वाढवता येवू शकतं. फ्लॅटच्या साईजप्रमाणे ईडब्ल्यूएस स्किमच्या नियमानुसार जेवढा अनुज्ञेय एफएसआय आहे त्या एफएसआयपर्यंत सुध्दा बांधकामे नियमीत करता येवू शकतील. नियमतीकरणासाठी अंदाजे किती शुल्क लागेल हे प्रत्येक केस टू केस आपल्याला अभ्यास करुन आणि त्याच्यासाठी वेगवेगळे काढावे लागणार आहे. परंतु टेन्टीटीव्ह जे मिनीमम चार्जेस लागणार

आहेत ते जमिनीच्या दराचे रेडीरेकनरच्या ४ टक्के भूखंडासाठी आणि जवळ जवळ १६ टक्के बांधकामाच्या क्षेत्रासाठी जमिनीच्या रेडीरेकनरचे दर इतके मिनीमम शुल्क लागणार आहेत. व त्याच्यानंतर प्रत्येक मार्जीनसाठी व पार्कीगसाठी जर पार्कींग कमी असेलतर त्यासाठी पण शुल्क आकारण्यात येणार आहे. तसेच टिडीआर खरेदी करुन टिडीआर लोडींग केल्यास टिडीआरचा खर्च तसेच वापर शुल्क महानगरपालिकला जमा करावे लागेल, अशी सर्वसाधारण पद्धत आहे.

**मा.दत्तात्रय साने** - मा.महापौर साहेब,मा.आयुक्त साहेब,सर्व सन्मा.सभागृह, एक गुंठा जागा फेस-टू-फेस बांधलेली आहे. रस्ता कमी आहे. दहा फूट, पंधरा फूट रस्ता आहे. हा प्रॉब्लेम ग्रामिण भागात जास्त आहे. समजा एक गुंठा जागेत एक हजार स्क्वे. फूटाचे परफेक्ट बांधलेले आहे. पण पार्किंग झोन सोडलेला नाही. आणि समजा त्याने एक दोन मजले वाढवले आहेत. अशी बांधकामे कशा पद्धतीने रेग्युलराईज होऊ शकतात हाच आमच्या सर्वांच्या मनामध्ये प्रश्न आहे. प्रिमियम किती असेल, मार्जिन किती असेल, त्याला किती रस्ता सोडावा लागेल, हे सांगितलेतरी डोक्यात बसणार. आमच्या इथे कुठेही डिपी रस्ता नाही. म्हणजे डिपी रस्ता सोडून अंतर्गत सोसायटी आहे, अंतर्गत काही गल्ल्या आहेत, काही खाजगी प्लॉट आहेत. त्याठिकाणी त्यांनी दहा फूटाच्या आतमध्ये १२ फूट, १५ फूट, २० फूट असे जे रस्ते सोडले त्यांचं मार्जिन काय असेल,त्यांना पार्किंग कंपल्सरी असेल का असं जर थोडं सविस्तर सांगितलं तर बरे होईल.

**मा.पठाण(सहशहर अभियंता)**-मा.महापौर साहेब,मा.आयुक्त साहेब,सर्व सन्मा.सभागृह,प्रत्येक केस डिटेल्डमध्ये बघावी लागेल. मी लगेच कॅलक्युलेशन करुन सांगू शकणार नाही.

**मा.महापौर**-मा.दत्ता काका साने,ते एवढ्या मोठ्या प्रमाणात सर्वांना सांगू शकणार नाहीत. तरी सर्व नगरसदस्यांना नियमावली घरपोच पाठवून द्यावी.

**मा.एकनाथ पवार**-मा.महापौर साहेब,मा.आयुक्त साहेब,सर्व सन्मा.सभागृह,खरेतर मा.दत्ता काका साने, मी विनंती करतो की, दिवाळीनंतरची विशेष सभा आणि त्या विषयामधले सर्व डिटेल्स सन्मा.नगरसेवकांना समजले पाहीजेत. शहरातील जास्तीत जास्त लोकांना अनधिकृत बांधकामे नियमित करायची संधी मिळाली पाहिजे. यासाठी आपण स्वतंत्र विशेष सर्वसाधारण सभा घोषित करावी व पुढील विषयाला सुरुवात करावी.

-----------

**मा.माधुरी कुलकर्णी** – मा.महापौर साहेब, विषय क्रमांक १ वर मी पुढीलप्रमाणे ठराव मांडते.

ठराव क्रमांक -८४ विषय क्रमांक – १
दिनांक - १६/१०/२०१७ विभाग- मा.आयुक्त

संदर्भ – १) मा.महापालिका आयुक्त यांचे जावक क्र.कर/मुख्य/५/कावि/२८५/

२०१७ दि.११/०९/२०१७

२) मा.स्थायी समितीकडील ठ.क्र.९९३ दि.१९/९/२०१७

केंद्र शासनाने 'स्वच्छ भारत अभियान' दिनांक 02/10/2014 पासून घोषित केले असून दिनांक 02/10/2014 ते दिनांक 02/10/2019 या कालावधीत अभियान राबविण्यात येत आहे. या अभियाना अंतर्गत शहरे हागणदारी मुक्त करणे व घनकचरा व्यवस्थापना अंतर्गत शहरे स्वच्छ करणे या दोन प्रमुख बाबींचा समावेश आहे. केंद्र शासनाच्या 'स्वच्छ भारत अभियान (नागरी)' च्या धर्तीवर दिनांक 15/05/2015 च्या शासन निर्णयान्वये राज्यामध्ये स्वच्छ महाराष्ट्र अभियानची (नागरी) अंमलबजावणी सुरू आहे. पिंपरी चिंचवड महानगरपालिकेमार्फत शहरात स्वयंसेवी संस्था, सहकारी गृह रचना संस्था,नागरिक यांचे सहकार्याने स्वच्छ भारत अभियान राबविण्यात येत आहे. स्वच्छ भारत अभियानाचा जास्तीत जास्त प्रसार होऊन नागरिकांचा त्यामध्ये समावेश वाढण्याच्या दृष्टीने शहरातील गृहप्रकल्पांमध्ये पर्यावरण पूरक व स्वच्छता विषयक स्पर्धा झाल्यास शहर पर्यावरण पूरक व स्वच्छ होणेस मदत होईल, पर्यायाने कचरा वाहतूक व विल्हेवाट करण्यासाठी महानगरपालिकेवर व इतर शासकीय यंत्रणांवर पडणारा अतिरिक्त ताण काही प्रमाणात कमी होण्यास मदत होईल. महाराष्ट्र महानगरपालिका अधिनियमातील कलम 140-अ मध्ये मालमत्ता कराची रक्कम आगाऊ भरल्यास व 140-ब मध्ये परिस्थितीकीयदृष्ट्या लाभदायक योजनेची अंमलबजावणी करणेकरिता करात सूट देणेची तरतूद आहे. 'आदर्श पर्यावरण संतुलित सोसायटी' बक्षीस योजना राबविणेकामी खालीलप्रमाणे कार्यवाही करणे आवश्यक आहे.

१. 'आदर्श पर्यावरण संतुलित सोसायटी' बक्षीस योजना खालीलप्रमाणे 02 गटामध्ये स्पर्धा घेणे.

| | |
|---|---|
| गट १-१२ ते १०० फ्लॅट/बंगलो/ रो हाऊस असलेली सोसायटी | क्षेत्रिय कार्यालयनिहाय १ या प्रमाणे ८ क्षेत्रिय कार्यालयातून ८ सोसायट्यांची निवड |
| गट २-१०० चे पुढील फ्लॅट/ बंगलो/रो हाऊस असलेली सोसायटी | क्षेत्रिय कार्यालयनिहाय १ या प्रमाणे ८ क्षेत्रिय कार्यालयातून ८ सोसायट्यांची निवड |

२. आदर्श पर्यावरण संतुलित सोसायटी स्पर्धेकरिता मा. आयुक्त यांचे मान्यतेने स्पर्धेमध्ये सहभाग घेणेकामीचा अर्ज व तपासणीकामीचे निकष तयार करणे.

३. स्पर्धेमध्ये भाग घेणा-या आदर्श पर्यावरण संतुलित सोसायटीने 100% पाणीपट्टी व सोसायटी मधील मिळकतधारकांनी 90% मिळकतकराचा भरणा करणे अनिवार्य राहील.

४. आदर्श पर्यावरण संतुलित सोसायटी स्पर्धेत सहभागी होणेकामी सोसायटी/गृह प्रकल्पांचे क्षेत्रिय कार्यालय स्तरावर अर्ज स्विकारुन निश्चित केलेल्या निकषांनुसार तपासणी करणेकामी प्रत्येक क्षेत्रिय कार्यालयाकरिता 1. दोन मनपा अधिकारी 2. एक अशासकीय संस्थेचा प्रतिनिधी 3. एक पत्रकार,यांचा समावेश असलेले तपासणी पथकांची नेमणूक करणे.

५. आदर्श पर्यावरण संतुलित सोसायटी बक्षीस योजना अंमलबजावणीचे मुख्य निकष व गुण खालीलप्रमाणे.

| अ.क्र. | मुख्य निकष | गुणांक |
|---|---|---|
| १. | इमारत व इमारतीचे परिसरामध्ये १००% कचरा वर्गीकरण व प्रक्रिया | ३० |
| २. | पाणी संवर्धन, पाणी पुनर्चक्रण, पाणी पुनर्वापर | २० |
| ३. | सौर उर्जा प्रकल्प, एल.ई.डी. दिव्यांचा वापर | १५ |
| ४. | वृक्षारोपण आणि संवर्धन लॅण्ड स्केपिंग | २० |
| ५. | पर्यावरण पूरक नाविन्यपूर्व उपक्रम | १५ |
| | | १०० |

६. आदर्श पर्यावरण संतुलित सोसायटी तपासणीमध्ये प्राप्त झालेल्या गुणांच्या आधारे स्टार रेटींगनुसार सामान्य करात देण्याचे सवलतीची टक्केवारी

| अ.क्र. | गुण तपशील | रेटींग | सामान्य करात सवलत |
|---|---|---|---|
| १ | ८६ ते १०० गुण | ***** | १५% |
| २ | ७६ ते ८५ गुण | **** | १०% |
| ३ | ६६ ते ७५ गुण | *** | ५% |
| ४ | ५१ ते ६५ गुण | ** | प्रमाणपत्र |

७. महापालिकेच्या प्रत्येक क्षेत्रिय कार्यालयनिहाय गट क्रमांक 1 व गट क्रमांक 2 करिता प्रत्येकी एक आदर्श पर्यावरण संतुलित सोसायटीची निवड करणे.

८. आदर्श पर्यावरण संतुलित सोसायटी स्पर्धेतील विजेत्या सोसायटींमधील मिळकतींना महापालिकेमार्फत सध्या सामान्य करातील देण्यात येणा-या सवलतीं व्यतिरिक्त स्टार रेटींगनुसार सामान्य करात सवलत देणे.

९. तपासणी केलेल्या आर्थिक वर्षाचे पुढील आर्थिक वर्षात दिनांक 30 जून अखेर थकबाकीसह संपूर्ण बिलाची एक रक्कमी रक्कम भरणा करणा-या मिळकती सवलतीच्या लाभास पात्र राहतील.

१०. आदर्श पर्यावरण संतुलित सोसायटी बक्षीस योजना सन 2017-2018 ते 2019-2020 या कालावधीत 3 वर्षे राबविण्यात येईल.

तरी “आदर्श पर्यावरण संतुलित सोसायटी” बक्षीस योजना राबवून निवड झालेल्या सोसायटींमधील मिळकतींना महापालिकेमार्फत सध्या सामान्य करातील देण्यात येणा-या सवलतीं व्यतिरिक्त स्टार रेटींगनुसार सामान्य करात सवलत देणेची मा.आयुक्त यांची मागणी असलीतरी मुद्दा क्र.६ मधील आदर्श पर्यावरण संतुलित सोसायटी तपासणीमध्ये प्राप्त झालेल्या गुणांच्या आधारे स्टार रेटींगनुसार सामान्य करात देण्याचे सवलतीची टक्केवारी खालीलप्रमाणे निश्चित करुन त्याप्रमाणे कार्यवाही करणेस मान्यता देणेत येत आहे.

| अ.क्र. | गुण तपशील | रेटींग | सामान्य करात सवलत |
|---|---|---|---|
| १ | ८६ ते १०० गुण | ***** | २५% |
| २ | ७६ ते ८५ गुण | **** | १५% |
| ३ | ६६ ते ७५ गुण | *** | १०% |
| ४ | ५१ ते ६५ गुण | ** | ५% |

याप्रमाणे कार्यवाही करण्याकरिता मान्यता देणेत येत आहे.

**मा.आरती चोंधे** - मा.महापौर साहेब, ठरावास अनुमोदन देते.

**मा.सचिन चिखले**-मा.महापौर साहेब,मा.आयुक्त साहेब,सर्व सन्मा.सभागृह,अधिकारी वर्ग व पत्रकार बंधू, खरेतर आज आपल्याला शहरात अत्यंत बिकट अवस्था पहायला मिळते आहे. रोज एकही न्युज पेपर नाही की जिथे शहरातील विविध भागांच्या, कच-याच्या समस्यांबाबतीत एकही बातमी येत नाही. सन्मा.महापौर साहेब,ज्या-ज्या वेळी आम्ही प्रभागात असो, शहरातील विविध भागांत असो, आम्ही ज्या-ज्या ठिकाणी जातो, त्या-त्या ठिकाणी आम्हाला सध्यातरी एकच चित्र दिसते. तुडूंब भरलेल्या कचराकुंड्या, त्याचप्रमाणे कचराकुंड्यांत असणारी कुत्री म्हणा, डुकरे म्हणा, हा सगळा अस्वस्थ करत असणारा, अस्वच्छ असणारा परिसर. पिंपरी चिंचवड शहरामध्ये सगळीकडेच घाणीचे साम्राज्य पसरलेले आहे. सन्मा.महापौर साहेब,या घाणीमुळे आपण रोजच्या वर्तमानपत्रांमध्ये पाहतोय की, डेंग्यूचा आजार असेल, साथीचे आजार असतील, मलेरीया असेल, या आजारांपासून रोज रुग्ण दगावतात, या सर्व गोष्टी आपण पाहत आलो आहोत. गेले कित्येक दिवस या गोष्टीला घेऊन शांतपणे पाहत होतो. वेळोवेळी आमच्या सर्व अधिका-यांना सांगत होतो. एकदा नाही कित्येक वेळा आम्ही सुद्धा या विषयावर चर्चा केली होती. सन्मा.महापौर साहेब, आपण सांगितले. मा.आयुक्त साहेबांना निवेदन देत असताना त्या दिवशी सांगितले, टेंडर प्रोसेस चालू आहे. टेंडर फ्लोट केले आहे. कचरा उचलण्यासाठी, नवीन ठेकेदार येण्यासाठी अजून एक/दोन महिने जातील. मा.महापौर साहेब, आम्ही या सर्व प्रक्रियेत आपल्या सोबत आहोत. परंतू मनात एक चिंता येते की, या आधी सर्व सुरळीत चालू असताना तोच ठेकेदार हे काम करत असताना अचानक अशी परिस्थिती कशी काय उपस्थित झाली. कशामुळे सर्वत्र घाणीचे साम्राज्य पसरलेले आहे. आम्ही सध्या कच-याबरोबर पाण्याच्या समस्येला तोंड देतो आहोत. लाईटच्या समस्येला तोंड देतो आहोत. सकाळी पाच वाजल्यापासून ते संध्याकाळी सहा वाजेपर्यंत कचरा असो, पाणी असो किंवा लाईट असो या तीन मुलभूत गरजांची वाट पाहत असतो. नागरीक फोन करतात आणि सांगतात की, काही ठिकाणी गाड्या येत नाहीत, काही ठिकाणी कचरा व्यवस्थित उचलला जात नाही. हे आम्ही शहरात दररोज पाहत असतो. मा.महापौर साहेब, अक्षरशः दिवस दिवसभर काही ठिकाणी सोसायट्यांच्या बाहेर, रस्त्यांच्याबाहेर कच-याचे ढिगच्या ढिग लागलेले दिसतात आणि त्यांच्यावर कोणत्याही प्रकारची कारवाई होताना दिसत नाही. काम होताना दिसत नाही. खरेतर मा.आयुक्त साहेब निवेदन देत असताना काल तुम्ही आम्हाला सांगितले होते की, दुपारी 3.00 नंतर ज्या कचराकुंड्या फूल असतीलतर त्याचा फोटो व लोकेशन आम्हाला द्या. मा.महापौर साहेब, मा.आयुक्त साहेब, कालच आमच्या एका कार्यकर्त्याने तुम्हाला व्हॉटस् अप करुन तीन/चार कुंड्यांचे फोटो पाठवले. प्रशासकीय अधिकारी असेल, कर्मचारी असेल, नक्की काम का करत नाही, दूर्लक्ष का करतोय. हे आम्ही मान्य करतोय की, आता चार वॉर्डचा एक प्रभाग झाला आहे. प्रभागांत लोक नसतील, रिटायरमेंटमुळे जागा रिक्त झाल्या आहेत. या सर्व गोष्टींना सामोरे जात असताना लवकरात लवकर ही परिस्थिती सुधारणे खूप गरजेचे आहे. कित्येक दिवस रोज सकाळी, संध्याकाळी, दुपारी दूसरं कोणतच काम नाही. कचरा याठिकाणी साठलाय, कच-याची गाडी पाठवावी. या गल्लीत गाडी घेऊन या, त्या गल्लीत गाडी घेऊन या. संपूर्ण

शहरभर पाहतोय की, सगळीकडे कच-याची समस्या आहे. मी आपल्याला विनंती करतो की, आपण लवकरात लवकर ही प्रोसेस पार पाडावी व ही कच-याची समस्या लवकरात लवकर दूर व्हावी.

मा.आयुक्त साहेब, मी दोन मिनिटं बोलू इच्छितो की, काल माझ्यावर गुन्हा दाखल झाला. पण शहरातील जनतेसाठी गुन्हा दाखल करायला मला अजिबात खंत वाटली नाही. ही व्यवस्था व्यवस्थितपणे सुधारली गेली नाहीतर मा.महापौर साहेब, महाराष्ट्र नवनिर्माण सेनेतर्फे प्रत्येक प्रभागामध्ये आंदोलने केली जातील. आम्हाला कदाचित सुद्धा कोणत्याही अधिका-यांना म्हणा किंवा कोणत्या पदाधिका-यांना म्हणा नाराज करायची इच्छा नाही. परंतु लोकांनी आम्हाला नगरसेवक म्हणून काम करण्यासाठी संधी दिलेली आहे. आणि आम्ही जर हे करत नसूतर आम्हाला नगरसेवक म्हणून आम्हाला इथे बसायची सुद्धा लाज वाटते. मा.महापौर साहेब, येणा-या दिवसांमध्ये तुम्ही जर व्यवस्थितपणे लक्ष दिलं नाहीतर शंभर टक्के प्रभागांमध्ये आंदोलन करण्याचा इशारा देत आहोत. शहरातील जनतेसाठी शंभर गुन्हे झालेतरी ते करुन घ्यायला आम्ही तयार आहोत. आत्ताच पवार साहेबांनी सांगितले, सचिनभाई तुम्ही सांगितले, ताईंनी सांगितले. शंभर टक्के ताई मी तुम्हाला सांगतो, तुम्ही माझ्या मोठ्या बहीण आहात आणि तुमचा शब्द ठेवणं माझं काम आहे. मा.आयुक्त साहेब, आम्ही तुम्हाला कोणत्याही प्रकारचा त्रास देणार नाही. तुमच्या पाशी येणार नाही, तुमच्या घरापाशी पण येणार नाही. तुमचा सन्मान म्हणजे पिंपरी चिंचवड शहराचा सन्मान आहे. पण आजही काही अधिकारी वर्ग सोडल्याशिवाय राहणार नाही, ही पालिका सोडल्याशिवाय राहणार नाही हेही लक्षात घ्या. मा.पवार साहेब, तुम्ही मला मोठ्या भावासारखे आहात. हा एकच सैनिक आहे पण राजसाहेब ठाकरेंचा सच्चा सैनिक आहे. अजिबात फुटणार नाही. दूसरी सर्वांत महत्वाची गोष्ट अशी की, या शहरातील सर्वांत मोठा प्रश्न म्हणजे कच-याचा प्रश्न आहे तो लवकरात लवकर मार्गी लावावा अशी मी विनंती करतो व थांबतो. जयहिंद, जय महाराष्ट्र, धन्यवाद.

**मा.तुषार कामठे**-मा.महापौर,मा.आयुक्त,सर्व सन्मा.सभागृह, मघाशी मा.राहुलदादा जाधव व मा.अभिषेक बारणे यांनी जो विषय घेतला त्या विषयाला बाकीच्या पक्षवाल्यांनी या पद्धतीने येथे वर्तन केले याबद्दल मला खेद वाटतो. इथून मागच्या सत्तेमध्ये दोन व्यक्ती सोडल्या तर बाकीच्यांना बोलू देत नव्हते. मी इथे मा.महापौर साहेब,मा.पक्षनेते साहेब व मा.सीमाताई सावळे यांचे मनापासून आभार मानतो. तुमचा कुठलाही दबाव आमच्या कुठल्याही नगरसेवकांवर नसून सामान्य जनतेच्या ज्या काही समस्या असतील, पक्षाच्या विरुद्ध भूमिका असेल तरी ती केव्हाही तुम्ही मांडा असे आम्हाला सांगितले. आमचे मा.अभिषेक बारणे व मा.राहुलदादा जाधव या दोघांनी त्यांचं मन येथे व्यक्त केले. मा.एकनाथ दादा पवार आपल्याला कोणाच्याही दाखल्याची आवश्यकता नाही. आठ महिन्यांआधीच तुम्हाला जो दाखला भेटायचा होता तो भेटलेला आहे. म्हणून तुम्हाला कुठल्याही दाखल्याने कोणालाही काहीही फरक पडत नाही. या जनतेने त्यांचे दाखले आपल्याला दिलेले आहेत. माझी सर्व पक्षांना विनंती आहे की, आपण इथे पक्ष म्हणून बसू नकातर सामान्य लोकांचे प्रश्न सोडवायचे म्हणून आपल्याला इथे बसायचे आहे. आणि आमचा प्रशासनाला अजिबात विरोध नाही. पण मागच्या सत्ताधा-यांकडून काही काही अधिकारी लाडवले आहेत. त्यांच्याविरोधात आमचे दोन नगरसेवक बोलले. बाकी स्वच्छतेचा जो विषय असेलतर मा.सचिनदादा चिखले आपण व्हॉटस् अप

ग्रुपमध्ये आहोत. माझ्या प्रभागातील स्वच्छतेबाबत मी 80 टक्के समाधानी होतो. माझ्या प्रभागातली स्वच्छता एकदम चांगली होती. मघाशी जे सांगितलं फोटोसेशन चालते. पण भाजपवाले जे काम करतात त्याचे फोटो सेशन चालते. तुम्ही लोकं कामालाच जात नाहीत तर तुमचे फोटो येऊच शकत नाहीत ना. ज्यांनी काम केले त्यांचे फोटो दिसतील. ज्यांनी काम केले नाही, त्यांचे फोटो दिसत नाहीत. माझी सर्व सभासदांना विनंती आहे की, आपण आपल्या वॉर्डमध्ये किंवा प्रभागांमध्ये अधिका-यांचा वचक आपला आपण ठेवायचा आणि आपण आपल्या पद्धतीने काम केलं पाहिजे. आपलं काम होत नाही याचा दोष आपण अधिका-यांना देऊ नका. आपल्याकडून काम होत नाही म्हणजे आपण निष्क्रिय आहोत, आपण तेवढे केपेबल नाही हे यातून सिद्ध होतं. आपण आपल्या पद्धतीने काम करून घ्या. अधिकारी आपल्या सोबत असतील. आपण तसे काम करुन घ्या. एवढे बोलून मी माझे दोन शब्द संपवतो.

**मा.सचिन भोसले**-सन्माननीय महापौर,मा.आयुक्त साहेब,मा.नगरसचिव,सर्व अधिकारी वर्ग, सभागृहातले माझे सर्व सहकारी,नगरसदस्य, नगरसदस्या आणि माझ्या पत्रकार बंधुंनो, दिवाळीचा आज पहिलाच दिवस आहे. सर्वप्रथम मी आपल्या सर्वांना दिवाळीच्या मनःपूर्वक हार्दिक शुभेच्छा देतो. विषय आहे कच-याची समस्या. शहरामधला हा अतिशय ज्वलंत असा प्रश्न आहे. मा.महापौर साहेब मी आपल्याला सांगू इच्छितो की, मी दि.१३ एप्रिल रोजी मी पत्र दिलं होतं की, प्रभागांमध्ये घंटागाडी नाही. पाचच घंटागाड्या काम करत होत्या. ऍक्च्युली त्याठिकाणी मला सांगण्यात आलं होतं की, आरटीओचा काहीतरी रजिस्ट्रेशनचा प्रॉब्लेम आहे. त्यामुळे त्या घंटागाड्या आपल्याला मिळालेल्या नाहीत. तेव्हापासून पत्रव्यवहार केल्यानंतर आजतागायत प्रशासनाने मला उत्तरदेखील दिलेलं नाही. म्हणजे जर एखादी समस्या आपण अधिका-यांना सांगतोय तर मला असं वाटतं की त्या अधिका-यांच काम आहे की किमान पत्रव्यवहार करून कळवावे की काय प्रॉब्लेम आहे किंवा ती किती दिवसांमध्ये समस्या सोडवणार आहेत. कुठल्याही प्रकारे आम्हाला कळवले जात नाही. आम्ही नगरसेवक झालो, जनतेने फार विश्वासाने आपल्याला इकडे पाठवले आहे. परंतु ही कच-याची समस्या वाढतच चाललेली आहे. प्रत्येक गल्लोगल्ली कच-याचे ढीग पडताहेत. घंटागाडी नियमित येत नाही. मा.महापौरसाहेब,प्रत्येक प्रभागांमध्ये आमच्या प्रभाग क्रमांक २४ मध्ये ड्रेनेज लाईन अशी झालेली आहे ही त्यावेळची जी लोकसंख्या होती, त्यावेळच्या लोकसंख्येला गृहीत धरून ड्रेनेजलाइन टाकलेली होती आणि आज रोजी याठिकाणी खूप मोठ्या प्रमाणात लोकसंख्या वाढलेली आहे. तर त्याठिकाणी कन्टीन्युअसली हा प्रॉब्लेम येतो की प्रत्येक वेळी दोन/दोन दिवसाआड तिथे ड्रेनेज लाईन जाम झालेली असते. मा.महापौरसाहेब परिस्थिती इतकी गंभीर असते की, दोन/तीन घरांमध्ये ड्रेनेजचं पाणी, लोक याठिकाणी बसतात. त्यामुळे त्या परिसरात किती दुर्गंधी, त्या परिवाराला किती त्रास. गेल्या अनेक दिवसांपासून आपण पाहतोय की, माझ्या थेरगाव प्रभागामध्ये कुत्री आणि डुकरे झाल्याचेसुद्धा निवेदन दिलं होतं. त्याच्यावरतीसुद्धा आजतागायत कुठलीच कारवाई केलेली नाही. आम्ही कुठलीही समस्या सांगायला गेल्यावर त्यातून मार्ग निघत नसेलतर आंदोलन हा एकमेव पर्याय आहे. मला असं वाटतं की आंदोलन केल्यावर जर गुन्हे दाखल होत असतील तर ही एक प्रकारची हुकूमशाही झालेली आहे. ख-या अर्थाने मी तुम्हाला सांगतो की, माझ्या प्रभागांमध्ये डुकरांचा इतका सुळसुळाट झालेला आहे. सगळ्या नागरिकांना त्यांच्यापासून त्रास होतोय, तर लवकरात लवकर त्यावर कारवाई करावी. अन्यथा आंदोलन केल्यानंतर गुन्हे दाखल होतात. आम्ही

कुठल्याही गुन्ह्याला घाबरणार नाही. पुढील वेळी जर एक महिन्याच्या आतमध्ये यावर कारवाई झाली नाहीतर सभागृहात डुकरे आणून सोडेन, याची सर्वांनी नोंद घ्यावी. मा.महापौर साहेब, मी सुद्धा आपल्याला याठिकाणी सांगतो की, मी दहा-दहा वेळा विनंती करतो, मुद्दे उपस्थित करतो, नागरिकांचे प्रश्न उपस्थित करतो तर त्यावर उपाययोजना करणे ही प्रशासनाची जबाबदारी आहे. आणि जर प्रशासन त्याच्याकडे दुर्लक्ष करत असेल तर न्याय मागण्यासाठी आम्ही जायचे कुठे, असे अनेक प्रश्न आहेत. मी तुम्हाला या ठिकाणी आता ऐकू शकतो की काय सांगितलं. आज सकाळी सभागृहात येण्यापूर्वी एक तासापूर्वी गुजरनगरला शिंदे म्हणून आहेत त्यांच्या घरी ड्रेनेजचे पाणी आले. तिथे एका ठेकेदाराच्या माणसाला फोन केला तर तो काय सांगतो की त्याचे कर्मचारी संपावर गेलेत. कर्मचारी संपावर गेले म्हणजे यांनी काय घाणीत दिवाळी काढायची का. त्यांच्या घरामध्ये ड्रेनेजच्या पाण्यात दिवाळी साजरी करायची का, अशी परिस्थिती आहे. म्हणजे एकंदरीत काय झालंय की शहरामध्ये स्वच्छता आणि आरोग्याची खूप मोठी समस्या निर्माण झालेली आहे. या शहरांमध्ये अनेक जण डेंग्यूने आणि स्वाइन फ्लूने मृत्यू पावलेले आहेत. तर मला असं वाटतं की, आपलं प्रशासन नागरिकांना सुविधा देण्यासाठी आहे. महानगरपालिकेचा टॅक्स त्यांच्याकडून वसूल करतो आणि आपल्याला त्यांना जर सुविधा देता येत नसतील तर हे पंचावन्न लोक स्वाइन फ्लूने गेले. अनेक लोक डेंग्यूने गेले. त्यांच्या मृत्यूला जबाबदार कोण आहे. माझं ठाम म्हणणं आहे की, हे प्रशासन जे कामचुकारपणा करतेय, जे काम करत नाही. मा.महापौरसाहेब त्यांना आपण व्यवस्थित वठणीवर आणा. आणि या सभागृहामध्ये सत्ताधारी असतील, विरोधी पक्षातील असतील, कोणीही असतील, आपल्यामध्ये काही मतभेद असतील पण आपण मतभेद होऊ दिले नाही पाहीजेत. आपण न्याय दिला पाहिजे. काम करून घेतलं पाहिजे. या सभागृहामध्ये आपण समस्या सोडवण्यासाठी येतो. कुणाची उणी-दुणी काढण्यासाठी या सभागृहात येत नाही. मा.महापौर साहेब, माझी आपल्याला विनंती आहे, या सभागृहाला माझे विनंती आहे. मा.आयुक्तसाहेब, आपल्यालाही विनंती आहे की, लवकरात लवकर यावर ताबडतोब उपाययोजना कराव्यात आणि या शहराला स्वच्छ शहर आपण म्हणताय. स्मार्ट सिटी जे पद आपल्या शहराला शोभेल अशा पद्धतीने आपण कामकाज करावे. मी आपल्याला या ठिकाणी विनंती करतो आणि थांबतो. जय हिंद, जय महाराष्ट्र!

**मा.अश्विनी चिंचवडे-** महापौर साहेब आपण लक्ष दिलं आणि बोलण्याची संधी दिलीत याबद्दल धन्यवाद. मा.महापौर,मा.आयुक्त,मा.नगरसचिव तसेच उपस्थित सभागृह, पत्रकार बंधू-भगिनींनो, केंद्र शासनाने स्वच्छ भारत अभियान अंतर्गत आदर्श पर्यावरण संतुलित सोसायटी बक्षीस योजना व स्पर्धा या उपक्रमाचे प्रथमतः मी आपले स्वागत करते. आपण हा उपक्रम येथे राबविणार आहात तो विषय आज घेतलेला आहे त्याबद्दलही मी आपले अभिनंदन करते. इमारतीच्या परिसरामध्ये शंभर टक्के कचरा वर्गीकरण व प्रक्रिया करता आपल्या शहरातील रोझलँड सोसायटीचे देशपातळीवर कौतुक झाले आहे. आम्हा नगरसेवकांची देखील जबाबदारी आहे की, आपापल्या प्रभागातील सोसायट्यांना या स्पर्धा व अभियानामध्ये सहभागी करून घेणे व जनजागृती करणे. मला अभिमानाने सांगावेसे वाटते, चिंचवडमध्ये देखील साहेब मी असा प्रकल्प गेल्या जून महिन्यांमध्ये राबवला. गोखले वृंदावन सोसायटी आहे तिथे ओला आणि सुका कचरा वर्गीकरण केलेला आहे. आणि सुका कचरा फक्त गाडीत दिला जातो. तसेच रेन वॉटर हार्वेस्टिंग हा प्रकल्प पण तिथेच आता राबवत आहोत. हळूहळू टप्प्याने तो जो प्रकल्प आहे तो यशस्वी होतो आहे. परंतु मला खेदही वाटतोय, आपल्या महानगरपालिकेची

आरोग्य विभागाची यंत्रणा म्हणजे कचरा वाहतूक व्यवस्था. घंटागाडीमध्येओला व सुका कचरा तसेच घातक कचरा यांचे पूर्णपणे वर्गीकरण न करता तो एकत्रच भरला जातो. कचरा वेगवेगळा न करता तसेच घंटागाडी वेळेवर तिथे पोचत नाही. प्रत्येक ठिकाणी घंटागाडी वेळेवर पोहोचत नाहीतर घंटागाडी साठी आपण जीपीएस यंत्रणा राबवणार आहोत. तर त्याचेही काय झालं ते आजतागायत काहीच कळालेले नाही. शहरांमध्ये स्वच्छ अभियानाअंतर्गत मा.आयुक्त, मा.महापौर, सर्व पदाधिकारी, सर्व सहभागी संस्था यांनी स्वयंस्फूर्तीने सहभाग घेतला. पूर्वी कचराकुंडीविरहित वॉर्ड ही संकल्पना राबवली होती. कचराकुंड्या कमी करण्यात यशही आले होते. परंतु पुन्हा एकदा हैंगिंग डस्टबिनच्या नावाखाली दुकानदारी मांडली गेलेली आहे. जी रोज वृत्तपत्र येतात त्यांच्यात एकतरी फोटो हा हैंगिंग डस्टबिनचा असतो. मागील पंचवार्षिकमध्ये आपण घरोघरी डस्टबिन वाटल्या होत्या. पण आज रोजी त्या डस्टबिनचा वापर होतोय का याची पण नोंद घेतली पाहिजे. वाहतुकीचं टेंडर किती वर्ष काढलं नाही. दरवाढ मुदतवाढ हे दुष्टचक्र चालूच आहे. स्वच्छ भारत अभियानाअंतर्गत शाळा-महाविद्यालयांमध्येही शाळा स्वच्छ ठेवण्यासाठी आपण स्पर्धेचे नियोजन केले पाहिजे. तसेच विशेषतः झोपडपट्टी प्रकल्प जिथे-जिथे झालेले आहेत,तेथेही स्वतंत्र स्पर्धा आपण राबवलीत तर नक्कीच आपल्या शहराचा स्मार्टसिटीमध्ये नावलौकिक वाढेल. माझ्या प्रभागात वेताळ नगर झोपडपट्टी आहे, तिथे शेजारी पवनानगर वसाहत आहे आणि वेताळनगर झोपडपट्टीतला कचरा त्या सोसायटीच्या अगदी समोरच टाकला जातो. गेल्या पंचवार्षिक योजनेमध्ये यासाठी नियोजन करा म्हणून मी सांगितले होते. पण आजतागायत तिथला कचरा उचलला जातच नाही. आपण त्यावर काहीतरी तोडगा काढून तात्पुरत्या स्वरूपात सीसीटीव्ही कॅमेरे लावून दंडात्मक कारवाई करावी अशी विनंती करते. मा.महापौरसाहेब, आपण मला बोलण्याची संधी दिलीत त्याबद्दल धन्यवाद.

**मा.माया बारणे**- मा.महापौर साहेब,मा.आयुक्त साहेब,सन्माननीय सभागृह, अधिकारी वर्ग, पत्रकार बंधू, खरतरं मी कौतुक करेन की अतिशय चांगल्या विषयाला हात घातला. मा.आयुक्त साहेब, मी आपल्याला दोन महिन्यांपूर्वी भेटले होते, त्यावेळी कच-यासंदर्भात आणि डुकरांसंदर्भात निवेदन दिलं होतं,त्याचवेळेस मी तुम्हाला म्हटलं होतं की तुमचा प्रशासनावर अजिबात अंकुश नाही आणि अजूनही एक गोष्ट बोलली जाते की, त्याचे परिणाम सुद्धा आपल्याला बघावे लागतील. आपण नगरसेवकांच्या सहनशक्तीचा अंत पाहू नका आणि मला वाटतेय की, हे कुठेतरी आता सत्यात उतरले आहे. आज एक नगरसेवक पुढे आलेला आहे, उद्या हजारो येतील. प्रत्येकाच्या वॉर्डमध्ये आपण जर पाहिलं तर आरोग्यासंदर्भात अतिशय घाणेरडी अवस्था आहे. यासाठी केवळ प्रशासनाला दोष देण्यात अर्थ नाही. काहीअंशी आम्हीही जबाबदार आहोत. नागरिकांचे प्रबोधन करणं किंवा त्यांना जी सवय लागली आहे, त्या सवयींत बदल होण्यासाठी वेळ लागणार आहे. परंतु पंतप्रधान मा.श्री.नरेंद्र मोदी यांनी कुठेतरी चांगल्या गोष्टींची सुरुवात केली आहे. त्या चांगल्या गोष्टीचं कौतुकही होणं गरजेचं आहे. जादूची कांडी फिरली तसा एका रात्रीत हा प्रभाव दिसणार नाही. त्याला कालावधी द्यावा लागणार आहे परंतु त्यासाठी प्रशासन देखील गतिमान करणे हे मा.आयुक्तसाहेब आपले काम आहे. खरेतर सगळ्या नगरसेवकांनी या विषयाचे कौतुक केले, अभिनंदनही केले. मा.महापौर साहेब, मी आपल्याला एक विनंती करेन की, जोपर्यंत नगरसेवक मा.सचिन चिखले यांच्यावर गुन्हा दाखल झाला आहे, प्रशासन हा गुन्हा मागे घेत नाही, तोपर्यंत कुठल्याही प्रकारचं सभागृह याठिकाणी चालवू

नये. मला वाटते की, नक्कीच आपण या गोष्टीचा गांभीर्याने विचार करावा. सर्वांना दिपावलीच्या हार्दिक शुभेच्छा, धन्यवाद!

**मा.निता पाडाळे-**मा.महापौर साहेब,मा.आयुक्त साहेब,सर्व नगरसेवक, नगरसेविका,मा.आयुक्त साहेब, एक महिन्यापूर्वीच काळेवाडीमध्ये कच-याच्या गाड्यांची एवढी समस्या होती. मी ब प्रभागात कचरा नेला होता. परंतू त्याचा काही फायदा झाला नाही. मा.आयुक्त साहेब, आपल्याला सगळ्यात गरज आहे ती कच-याच्या गाड्या लवकरात लवकर खरेदी करण्याची. तर आपण लवकरात लवकर कच-याच्या गाड्या, कॉम्पॅक्टर खरेदी करावेत अशी मी आपल्याला विनंती करते. मा.आयुक्त साहेब, आत्ताच माझी मैत्रीण मा.अश्विनी चिंचवडे यांनी सांगितलं की, गेल्या वर्षी डस्टबिन घेतले होते. पूर्ण पिंपरी-चिंचवडमध्ये डस्टबिन वाटले तर नागरीक ते डस्टबिन वापरतात का नाही ते पहाव. मा.आयुक्त साहेब मी आपणाला हे विचारते की, हे डस्टबिन खरेदी करताना कोण होतं की ज्यांनी किती माणसांच्या कुटुंबासाठी हे छोटेसे डस्टबिन खरेदी केले आणि नक्की हे ठरवले कुणी की या डस्टबीनची साईज किती पाहीजे. आज दोन माणसांचासुद्धा कचरा या डस्टबिनमध्ये बसला जात नाही. त्यामुळे नागरिक डस्टबिन वापरत नाहीत. अक्षरशः ते धान्य भरून ठेवण्यासाठी या डस्टबिन चा वापर करतात. तरी मा.आयुक्त साहेब, आपण या डस्टबिनच्या खरेदीची चौकशी करावी. कोणते अधिकारी त्यात होते. हे डस्टबिन चार माणसांच्या कच-यासाठीसुद्धा पुरेसं नाही. त्याचप्रमाणे मा.आयुक्त साहेब, वॉर्डमध्ये ड्रेनेजचीसुद्धा समस्या गंभीर आहे. यातील बरेचसे नगरसेवक हे काळेवाडीतुन जात येत असतील. डी-मार्ट समोर गेले सहा महिन्यांपासून ३ चेंबर वाहतात. संध्याकाळी चार/पाच वाजता पाणी आलं की चेंबर वाहायला सुरुवात होते. तर ते चेंबर संध्याकाळी बारा वाजेपर्यंत वाहतात तर याला जबाबदार कोण. मा.आयुक्त साहेब, आमचा वॉर्ड २२ आणि २७ नेमका तिथूनच फूटला होता. अधिका-यांना याबद्दल सांगितले की, अधिकारी सांगायचे ते वॉर्ड २७ चे काम आहे आणि वॉर्ड २७ च्या अधिका-यांना सांगितले की ते सांगायचे हे वॉर्ड २२ च्या अधिका-यांच काम आहे. दोन्ही वॉर्ड कंबाईन असल्यामुळे नक्की काम करायचं कुणी. त्यादिवशी मा.गट्टूवार साहेब आले आणि पाहून गेले. परंतु मा.आयुक्त साहेब अजूनही मी तिथे गेले तर त्या परिसरात एवढी दुर्गंधी सुटलेली होती. आपण ही समस्या सोडवण्यासाठी फॉलोअप का करत नाहीत. ड्रेनेज लाईन मधून आपल्या पाण्याच्या लाईन गेल्या आहेत. मा.आयुक्त साहेब, आपण लवकरात लवकर लक्ष देऊन हा प्रॉब्लेम सॉल्व करावा. त्याचप्रमाणे मा.आयुक्तसाहेब माझी आपल्याला विनंती आहे की, आता आपल्याला टेंडर प्रोसिसिंग व्हायला कदाचित एक/दीड महिना लागेल, तोपर्यंत मोठ्या-मोठ्या रोडला जे ट्रक आहेत, त्या ट्रकची संख्या ठेकेदाराला वाढवायला सांगितल्यास, किमान दोन सोसायट्यांमधील कचरा त्या ट्रक घेतील. त्याचबरोबर मा.आयुक्त साहेब माझी आपल्याला विनंती आहे की, आपल्या पिंपरी-चिंचवड शहरात सुद्धा पुणे महानगर पालिकेसारख्या भरपूर प्रमाणात सोसायट्या आहेत.आता गेल्या आठवड्यात पिंपळे सौदागर मधल्या रोज लँड सोसायटीला पुरस्कार मिळालेला आहे. तर त्या सोसायटीने ज्या पद्धतीने आपल्या कच-याचे व्यवस्थापन केले आहे. ज्या सोसायट्या आहेत, भलेही त्या 20 फ्लॅटच्या, 25 फ्लॅटच्या सोसायट्या असू द्यात. या सोसायट्यांना आपण त्यांचा कचरा तिथेच जिरवण्याच कंपल्सरी करावे. मा.आयुक्त साहेब, पुणे शहराची जी परिस्थिती झाली. उरळीचे ग्रामस्थ रोडवर उतरतात, तशी परिस्थिती आपल्या पिंपरी चिंचवड शहरामध्ये सुद्धा येऊ शकते. तरी आपण आत्तापासूनच जर याचे नियोजन केले तर, नक्कीच

आपल्याला त्याचा फायदा होईल. तरी आपण लवकरात लवकर काहीतरी ठोस निर्णय घ्यावा, एवढेच सांगते. धन्यवाद!

**मा.एकनाथ पवार**- मा.महापौर साहेब,मा.आयुक्त साहेब,सर्व सन्मा.सभागृह,माझी विनंती आहे की विषय खूप चांगला दिलेला आहे. विषयाला धरून चर्चा झाली पाहिजे. स्वच्छतेसंदर्भात मागच्या मा.महापालिका सभेतही चर्चा केली होती. खरेतर हा सोसायट्यांचा मुद्दा आहे. प्रत्येक प्रभागांमध्ये सोसायट्या आहेत. त्या नगरसेवकांनी या विषयावर बोलले पाहिजे. मला वाटते, सगळ्यांना बोलू द्यावे.

**मा.प्रमोद कुटे**-मा.महापौर साहेब,मा.आयुक्त साहेब,मा.नगरसचिव साहेब तसेच उपस्थित सर्व नगरसेवक, आज अत्यंत चांगल्या प्रकारचा विषय या ठिकाणी मांडण्यात आलेला आहे. स्मार्ट सोसायटी म्हणजे थोडक्यात स्वच्छ सोसायटी हा पुरस्कार देण्यासंदर्भात विषय आहे. ज्याप्रकारे या सोसायट्यांबद्दल भूमिका घेताय, तशीच परिसरामध्ये,एका वॉर्डमध्ये ज्या छोट्या-छोट्या लेन आहेत, त्याबद्दल पण अशीच भूमिका घ्यावी. स्वच्छतेवर बोलायचे झालेतर वारंवार तक्रार करुनही कुठल्याही प्रकारचा कचरा उचलला जात नाही. सकाळी उठल्यावतर बाहेर पडताना पहिल्या प्रथम काम काय आहे तर या गल्लीमध्ये झाडूवाला नाही, त्या गल्लीमध्ये झाडूवाला नाही, तिकडे झाडूवाला नाही. यासाठी प्रशासनाने योग्य ते नियोजन करावे आणि आपल्या अधिका-यांना सांगावे की, जे घंटागाडी कर्मचारी आहेत, जे पर्मनंट कर्मचारी आहेत, त्यांनी त्याठिकाणी व्यवस्थित नियोजनबद्ध काम करावे. नियोजनाच्या अभावी जो कचरा साठला जातो. स्लॉटर हाऊसेसबद्दल तर कोणते धोरणच नाही आहे. मांस विक्रेत्यांकडून जो कचरा होतो तो सगळा कचरा नाल्यांमध्ये जातो. नाल्यांमध्ये गेल्यावर त्याच्या अवती-भवती कुत्र्यांचं साम्राज्य झालेलं आहे. या ठिकाणाहून रस्त्याने जात असताना कुत्री नको तेवढा त्रास देतात. याला सर्वस्वी जबाबदारी या अधिका-यांचीच आहे. मी तुम्हाला विनंती करतो की, आपण गाड्यांची संख्या देखील संपूर्ण शहरामध्ये वाढवून द्यावी. तसेच तुम्ही सोसायट्यांबद्दल जो निर्णय घेतलेला आहे तो खरोखरच कौतुकास्पद आहे. आज हजार हजार पाचशे पाचशे फ्लॅट्सच्या सोसायट्या आहेत. त्यामुळे मोठ्या प्रमाणावर कचरा शहरांमध्ये होतो. तो कचरा त्याठिकाणी जिरवण्यासाठी आपण प्रत्येक सोसायटीला चांगल्या प्रकारे कचरा रिसायकल करण्यासाठी काहीतरी अनुदान देण्याची योजनासुद्धा करून द्यावी. जेणेकरून रिसायकल युनिट घेण्यासाठी त्यांना चांगल्या प्रकारे सहकार्य होईल. तसेच आज माझे सहकारी मित्र, नगरसेवक मा.सचिन चिखले यांनी परवा जे आंदोलन केले,त्यांच्यावर गुन्हा दाखल करण्यात आला. याठिकाणी कुठलाही नगरसेवक असू दे, भाजपचा असू द्या, शिवसेनेचा असू द्या, आरपीआयचा असू द्या, मनसेचा असू द्या, त्याचं कामच आहे या ठिकाणी येऊन लोकांसाठी भांडणे. जर आवाज उचलून याठिकाणी अशाप्रकारे गुन्हा दाखल होणार असेल तर ही सगळ्यात मोठी अन्यायकारक गोष्ट आहे आणि मग नगरसेवक व्हायचं कशाला. जर आंदोलन करायचं नाही, प्रश्न उपस्थित करायचा नाही तर. मी तुम्हाला एवढी विनंती करतो, मी उपसूचना मांडतो की, नगरसेवक मा.सचिन चिखले व इतर यांच्यावरती दाखल केलेला गुन्हा ताबडतोब मागे घेण्यात यावा. (गुन्हा क्रमांक ५८४/२०१७) आणि आपण या शहराला जो चुकीचा पायंडा पाडू इच्छित आहात की, आंदोलन करणा-यांवर प्रत्येक वेळी गुन्हा दाखल करावा. उद्या भाजपचा नगरसेवक आंदोलन करत असेलतर

त्यांच्यावरही गुन्हा दाखल होऊ शकतो किंवा आम्हीही आंदोलन करतो तर आमच्यावरही गुन्हा दाखल होऊ शकतो. सर्वप्रथम या विषयावर मा.महापौर यांनी, प्रशासनाला आदेश द्यावेत की, मा.सचिन चिखले यांच्यावर गुन्हा दाखल केलेला आहे तो गुन्हा मागे घेण्यात यावा. असे आश्वासन द्यावे. धन्यवाद.

**मा. दत्तात्रय साने** – मा.महापौर साहेब, उपसूचनेला अनुमोदन आहे.

**मा.झामाबाई बारणे**-मा.महापौर साहेब,मा.आयुक्त साहेब,सभागृहामधले सर्व नगरसेवक,नगरसेविका अधिकारीवर्ग आणि पत्रकार बंधू, आज शहराच्या स्वच्छतेसाठी एका चांगल्या पद्धतीने चर्चेला विषय आलेला आहे. मा.महापौरसाहेब, आपल्या शहरांमध्ये नरेंद्र मोदींनी स्वच्छता मोहिमा राबवायला एक संकल्पना केलेली आहे आणि शहर स्वच्छ करणे हे आपल्या सर्वांचं, नागरिकांचे कर्तव्य आहे आणि या स्वच्छते मोहिमेसाठी खरोखर अनेक संस्था,अनेक मंडळे,गणपती मंडळे असतील,अनेक नागरिकांनी या स्वच्छते मोहिमांमध्ये भाग घेतलेला आहे. मग त्यापद्धतीने नगरसेवक असतील, आयुक्त साहेब आपण स्वतः, महापौरसाहेब, पक्षनेते, स्टँडिंग चेअरमन यांनी या एका चांगल्या मोहिमेत भाग घेतलेला आहे. मीसुद्धा माझ्या वॉर्डामधील गणपती मंदिर असेल,बोटक्लबच्या परिसरात असेल, डांगे चौकातल्या परिसरामध्ये महापालिकेच्या कर्मचा-यांबरोबर स्वच्छता मोहिमेमध्ये भाग घेतलेला आहे. चांगल्या आरोग्यासाठी सर्वांच्या प्रभागांमध्ये स्वच्छता मोहिम राबवायला पाहिजे. आणि राबवली आहे. फक्त काहीजण म्हणतात, पण फोटोमध्ये काय असतं हे काय मला माहित नाही. मी गेले पंचवीस वर्षे नागरिकांमध्ये काम करतेय, त्यांच्या समस्या सोडवते. परंतु कुठल्याही फोटोसाठी आणि फोटो जर आला तर आपण खूप मोठे झालो,आपण वॉर्डात खूप काम करतो,प्रभागात खूप काम करतो आणि नागरिकांचे हित सांभाळतो अशा पद्धतीचं साहेब आत्तापर्यंत काम केलेला नाही. आता कोण काय म्हणत असेल,कोण काय म्हणत असेल याच्याबद्दल मला काही बोलायचं नाही. मा.पक्षनेते आत्ता याअगोदर हा विषय झालेला आहे. परंतु नागरिक आपल्याला आपलं काम पाहूनच निवडून देतात. आपल्या वॉर्डात निवडून देतात आणि त्यांचं काम काय असेल हे पाहणं आपलं कर्तव्य आहे. कुठल्या पुढच्या अडचणींना आपण सामोरं जायचं आहे. हा नुसता स्वच्छता मोहिमेचाच प्रश्न नाही साहेब तर वॉर्डमध्ये अनेक प्रश्न आहेत. आता कुत्र्यांचा विषय झालेला आहे डुकरांचा विषय झालेला आहे. कुत्र्यांचा तर प्रभागांमध्ये नागरिकांना त्रास होतोय. मी खरोखर सांगते, माझ्या प्रभाग क्र.२४ मध्ये नागरिक, ज्येष्ठ नागरिक सकाळी फिरायला जातात तेव्हा त्यांना जीव मुठीत धरून जायला लागतं. एवढे कुत्र्यांची घोळके असतात की चालायची मुश्किल होते. आणि डुकरांचा पण विषय आहे. कारण खरोखर या विषयावर आत्ता सभागृहामधे मा.सचिन चिखले म्हणाले की, सभागृहामध्ये डुकरं सोडणार आहे. मागे खासदारांनी डुकरं सोडली होती. नगरसेविका मा.माया बारणे यांनी या सभागृहात डुकरं सोडली होती. सभागृहात नगरसेवकांबरोबर या डुकरांचाही प्रवेश करण्यात आला होता, खरेतर ही खेदाची बाब आहे. आपल्या आरोग्य विभागाच्या लोकांनी यामध्ये लक्ष दिलं पाहिजे आणि प्रत्येक नगरसेवकाच्या प्रभागांमध्ये जनावरं सुद्धा असतात. गाड्या लावण्याची पण मुश्कील असते. जनावर असतात. आणि मला एक सांगायचं आहे की आरोग्य विषयावरती आज ड्रेनेजचं पाणीसुद्धा पिण्याच्या पाण्यामध्ये मिक्स होतं. आपल्या ज्या जुन्या लाइन्स आहेत त्या बदलल्या पाहिजेत. मी हे अनेक वेळा सांगितलेले आहे. ड्रेनेज व पाणीपुरवठा

विभागाच्या अधिका-यांना पण सांगितलेले आहे. ते पण लोक येऊन गेले आहेत. पाण्याची पण समस्या ते पाहून गेले आहेत. काही भागांमध्ये जे आपले सफाई कर्मचारी आहेत, ते रजेवर राहिले किंवा त्यांच्या जागेवरती दुसरे लोक घ्यायला पाहिजेत. आत्तापर्यंत तीन/चार महिने झालेले आहेत, प्रभाग क्रमांक २४ मध्ये जवळजवळ सहा ते सात कर्मचारी नाहीत. याठिकाणी बाकीचे लोक त्याबाजूला साफसफाई करत नाहीत. कारण त्यांच्या जागेवर दुसरे लोक रुजूच झालेले नाहीत. त्यामुळे आरोग्य विभागाचे लोक सांगतात की,लोक कमी असल्यावर आम्ही तरी काय करणार. या भागामध्ये लोकांची भरती झाली पाहिजे, त्यांना रुजू करून घेतलं पाहिजे आणि जे आपले सार्वजनिक टॉयलेट आहेत तेसुद्धा साफ करायला लोक जात नाहीत हेसुद्धा लक्षात आलं पाहिजे. पण मी हे आरोग्य अधिका-यांच्या लक्षात आणून दिले आहे. मी एवढेच सांगू इच्छिते की, आपण ही जी स्वच्छता मोहीम राबवतोय. परंतु सर्वच ठिकाणी लक्ष दिलं पाहिजे. स्वच्छता मोहीम व्यवस्थितपणे झाली पाहिजे. याठिकाणी मी सर्वांना दिवाळीच्या शुभेच्छा व्यक्त करते आणि माझे दोन शब्द संपवते.

**मा.सुलक्षणा धर**-मा.महापौर साहेब,मा.आयुक्त साहेब,मा.नगरसचिव,उपस्थित सर्व नगरसेवक, नगरसेविका,अधिकारी,सर्व पदाधिकारी आणि पत्रकार बंधू-भगिनींनो, माझ्या प्रभाग क्रमांक २० मध्ये जो एरिया आहे तो जिओग्राफीकली खूप मोठा आहे. आपल्या महानगरपालिकेपासून सुरुवात होते ती दापोडी एण्डपर्यंत आणि तिकडे भोसरीपर्यंत इतका हा एरिया एवढा मोठा आहे. मोठा एरिया असल्यामुळे स्वच्छतेचा अभाव आहे. कारण आत्तापर्यंत आपल्याकडे ज्या चार/पाच झोपडपट्ट्या आहेत त्याची परिस्थिती अशीच आहे आणि तुलनेने त्यापेक्षा जास्त घाणीचे साम्राज्य वाढलेले आहे. त्याचप्रकारे आपल्याकडे जे एक स्वच्छतागृह आहे, त्याचीही साफसफाई रोजच्या रोज होत नाही. आपल्या या एरियामध्ये जे-जे कर्मचारी अलॉट केलेले आहेत, ते या एरियाच्या हिशोबाने सफिशियन्ट आहेत. परंतु ते रोजच्या रोज कामावर हजर असतात का हाही खूप मोठा प्रश्न आहे. जर एका एरियामध्ये दहा/पंधरा कर्मचारी देत असू आणि त्यातील एक किंवा दोनच कर्मचारी साफसफाई करत असतील तर त्यांच्याकडून नक्कीच तो एरिया कव्हर होणं अशक्य आहे. त्यामुळे त्यांच्यावर नियंत्रण कोणाचे असतं हा ही एक मोठा प्रश्न आहे. आत्ताच जसे मा.योगेश बहल म्हणाले की, आपण प्रभाग वाढवले. त्यामुळे अधिका-यांच्या बदल्या झाल्या. अधिका-यांची बदली झाली म्हणून नक्कीच कामाकडे दुर्लक्ष झालंय. मी नवीन असताना माझाही हाच प्रश्न आहे. कारण पूर्वीचे जे एस.आय. होते, त्यांना आपल्या एरियाची परिस्थिती, सगळा कानाकोपरा माहिती होता. परंतु आता नवीन आलेल्या कर्मचा-यांना आणि नवीन आलेल्या अधिका-यांना तो एरिया पूर्णपणे माहीत नसतो. त्यामुळे कुठल्या एरियात या कच-याचे कलेक्शन करायचा आहे, कुठल्या एरियामध्ये लक्ष दिले पाहिजे हे अजूनपर्यंत दोन-तीन महिने झाले तरी अधिका-यांना अजूनही हा प्रश्न सुटलेला नाही. हाफकीन असेल, आपल्याकडे एच.ए.ग्राऊंड खूप मोठं आहे. आणि आमच्या संत तुकारामनगर एरियामध्ये खानावळी,हॉटेल,मेस याचं प्रमाण खूप जास्त असल्यामुळे हॉटेल वेस्टचं कलेक्शन हे त्या-त्या वेळेत होणं खूप गरजेचं आहे. आपल्याकडे हॉटेल वेस्टसाठी जी गाडी येते त्या गाडीची अनियमित वेळ असते आणि त्यामुळे ती लोक रस्त्यावर किंवा एच.ए.ग्राऊंडवर तो कचरा पसरवतात आणि त्याच्यामुळे डासांचे प्रमाण हे खूप जास्त वाढलेलं आहे. वाय.सी.एम; डी.वाय.पाटील या हॉस्पिटल्समध्ये संपूर्ण शहरातून लोक सेवा घेण्यासाठी येत असतात. त्यामुळे नक्कीच तिथे घाण पण त्याचप्रमाणात झालेली असते. वाय.सी.एम.हॉस्पिटल्समध्ये ही स्वच्छता पाहिजे तितक्या प्रमाणात

नाही आणि त्याच्या ठिकाणीही कर्मचा-यांची कमी आहे. जे एस.आय. आहेत, ते नवीन आहेत. त्यांना ना एरियावर, ना कर्मचा-यांवर कंट्रोल ठेवता येत नाही. पूर्वी या ठिकाणी जे एस.आय. होते, त्यांचा कंट्रोल होता. त्यांना एरिया माहिती होता आणि कर्मचा-यांवरही कंट्रोल होता. त्यामुळे त्यांच्याकडून समाधानकारक काम होत होते. आत्ता तेव्हढं समाधानकारक काम होत नाही. आपल्याकडे ज्या झोपडपट्ट्या आहेत त्यांच्यामध्ये जी गटारं आहेत, गटारांमधील गाळ काढून तो नागरिकांच्या घरासमोरच टाकला जातो. त्याची ही योग्य प्रकारे विल्हेवाट लावली जात नाही. कचरा कलेक्शन करताना त्यांच्याकडून सुका कचरा/ओला कचरा हा सुद्धा आपण व्यवस्थित कलेक्ट करत नाही आणि कलेक्ट केला तरी आपलेही कर्मचारी त्याला व्यवस्थित कलेक्शन होऊ देत नाहीत. त्यामुळे अशा ठिकाणी एस.आय. देताना तो अनुभवी आणि पारंगत असेलतर त्यांच्याकडून नक्कीच चांगल्या प्रकारचं काम होईल असं आम्हाला आणि नागरिकांनाही वाटते आणि आपण जर एरियावाइज अधिकारी दिलेतर आपल्याकडे जी ही रोजची समस्या आहे, ही रोजची समस्या उद्भवणार नाही असे मला वाटते. यावर योग्य तो पर्याय काढावा, योग्य तो निर्णय घ्यावा. एवढचं बोलते आणि थांबते.

**मा.राहुल कलाटे** – मा.महापौर साहेब,मा.आयुक्त साहेब, सभागृहातील सर्व सहकारी,पत्रकार बंधू, आपले शहरात रोजलँडसारख्या सोसायटीने स्वच्छतेसाठी केंद्र सरकारचा पुरस्कार घेतला आहे. प्रथमतः आपण सगळ्यांनी मिळून या सोसायटीचे अभिनंदन केले पाहिजे. त्या सोसायटीला सभागृहात घेऊन आले पाहिजे. खरेतर त्यांनी शहरात एक बेंचमार्क तयार करून दिलाय. आपण या सोसायट्यांमध्ये स्पर्धा लावत असताना मी आपल्याला एकच विनंती करेन की, स्पर्धेबरोबर कायमस्वरूपी त्यांच्यासाठी हे केलं, आपल्या गुणांकांच्या अनुसार त्यांनी हे केलेतर, निश्चितच चांगल्या प्रकारे सोसायटी काम करते. हे करत असताना एक अडचण येईल की, आपण त्यांचे टॅक्स कलेक्ट केले पाहिजेत. तुम्ही बरेचसे फ्लॅट पाहिलेतर हजार-हजार ते दोन हजार स्क्वे.फुटांचे फ्लॅटस् आहेत. त्यांचे काहींचे मालक इन्व्हेस्टर आहेत, काहींचे मालक हे परदेशात आहेत. ते या सोसायट्यांमध्ये कधीही आलेले पण नाहीत. आपण ही अट कुठेतरी शिथिल करावी. कारण हजार फ्लॅटस् मधील दोनशे फ्लॅटसनी टॅक्स भरलेला नसेलतर ती सोसायटी या स्पर्धेमधून बाद होईल. हे तयार केले याचा देखील आपण विचार करावा. तसेच प्रत्येक क्षेत्रीय कार्यालय यातून आपण आठ सोसायट्यांची निवड केलेली आहे. या संख्येत देखील आपण वाढ केलीतर त्याचा फायदा सोसायट्यांना निश्चितच होईल. आपण आदर्श पर्यावरण संतुलित सोसायटी स्पर्धेमध्ये सहभागी होण्याकरीता सोसायटीकडून सर्व निश्चित केलेल्या निकषांनुसार तपासणी करणेकामी प्रत्येक क्षेत्रीय कार्यालयात दोन मनपा अधिकारी, एक अशासकीय संस्थेचा प्रतिनिधी आणि एक पत्रकार यांचा समावेश करत असताना अशासकीय संस्थेचा प्रतिनिधी आणि पत्रकार हे पर्यावरणप्रेमी असले पाहिजेत. ग्रीन बिल्डींग्जचे जे शासकीय नॉर्मस् आहेत, त्या नॉर्म्सबद्दल त्याला थोडी माहिती असेल तर निश्चितच त्याचा लाभ होईल. आणि तो इझिली ॲक्सेसिबल असावा. तो त्या सोसायटीतल्या लोकांशी कन्सर्न असावा किंवा रोझलॅण्ड सोसासटीने किंवा ज्यांनी पुरस्कार घेतलेले आहेत,अशा सोसायटांचा तो एक प्रतिनिधी असावा, असे मी या ठिकाणी आपल्या निदर्शनास आणून देतो. आपण याठिकाणी सांगितलं आहे की, इमारत व इमारतीचे परिसरामध्ये शंभर टक्के कचरा वर्गीकरण व प्रक्रिया यासाठी ३० गुण, पाणी संवर्धन, पाणी पुनर्चक्रण, पाणी पुनर्वापर यासाठी २० गुण. जर आपण पाहिले तर शहरामधे शंभर सोसायट्या असतीलतर ऐंशी सोसायट्यांचे एसटीपी प्लान्टस् बंद

आहेत. या एसटीपी प्लांटचा जो मेंटेनन्स कॉस्ट आहे, तो देखील आज या सोसायट्यांना परवडत नाही. अशा ठिकाणीदेखील आपण या गुणांकनामध्ये थोडी जर शिथिलता आणली तर निश्चितच जास्तीत जास्त सोसायट्या याला पात्र ठरतील. आपण सौरऊर्जा प्रकल्प, एल.ई.डी. दिव्यांचा वापर याला १५ गुणांक दिले आहेत. वृक्षारोपण आणि संवर्धन,लँडस्केपिंग यासाठी २० गुण, पर्यावरणपूरक नाविन्यपूर्ण उपक्रम यासाठी १५ गुण, आपण यात काय-काय मेन्शन करणार आहात. नाविन्यपूर्ण उपक्रम यांतून सोसायट्यांची स्वच्छता होईल, जेणेकरून त्या सोसायट्यांना याचा फायदा होईल. मा.आयुक्त साहेब, आपण सामान्य करात सवलत यामध्ये १५%, १०% आणि ५% असं म्हणतोय. मुद्दा क्र.६ प्रमाणे आपण जर सामान्य करात २५%,१५%,१०%, आणि ५% अशी सवलत दिलेली असताना मुद्दा क्र.६ च्या गुणांकानुसार म्हणजे २५,१५,१० आणि ५% असे आपण ठेवलेतर निश्चितच जास्तीत जास्त सोसायट्या त्यामध्ये येतील. कच-याच्या समस्येवर आपण खूप चर्चा केली. पण आपण या सोसायट्यांना अशाप्रकारे कायमस्वरूपी सवलत दिलीतर निश्चितच या सोसायट्या पर्यावरणपूर्वक कच-याच्या गोष्टी किंवा तिथेच कचरा गोळा करणे, तिथेच एल.ई.डी.लावणे,एस.टी.पी.प्लांटस् चालू ठेवणे अशा गोष्टी करतील. मा.आयुक्त साहेब, एस.टी.पी. प्लांट्स चालवण्याची कॉस्ट, त्यांना मिळणारी सवलत आपण या सोसायट्यांना टॅक्समध्ये द्यावी. मी गावडे साहेबांनाही विचारलं होते. सामान्य कराव्यतिरिक्त बाकी भरपूर कर आहेत. याचे प्रमाणदेखील जास्त आहे. आपण या करांमध्ये शिथिलता करावी. निश्चितच हा अतिशय चांगला उपक्रम आहे. या उपक्रमात या शहरातल्या सोसायट्या निश्चितच सहभाग घेतील. यानंतर आपण नेहमीच त्यासाठी सवलत द्यावी. मी एकदा गावडे साहेबांना विचारलं होतं की, सोसायट्या विचारतात की आम्हाला जेव्हा बिल्डरनी फ्लॅट विकले तर त्यात ग्रीन बिल्डींग असेल तर भविष्यात करामध्ये सवलत मिळेल का. तेव्हा गावडे साहेबांनी आम्हाला सांगितलं होत की, सोसायटीवाल्यांनी ग्रीन बिल्डींगचे सर्टिफिकेट आणून द्यावे. आपण पहात असाल की, बिल्डर आणि सोसायट्या यांच्यात कुठेच को-ऑर्डिनेशन नाही. त्यांनी जे-जे सांगितलं ते देखील नाहीए. त्यामुळे ग्रीन बिल्डींगचे सर्टिफिकेट त्यांच्यावर सोडण्यापेक्षा आपल्या अधिका-यांनी व्हिजिट दिली, त्यांनी जर त्याची पाहणी केली आणि त्यांनी जर सोसायट्यांना सर्टिफिकेट दिलेतर, आपल्या जुन्या सोसायट्या याला पात्र ठरतील. मी पुन्हा एकदा या अतिशय चांगल्या उपक्रमाचे स्वागत करत असताना आपण ही सवलत कायमस्वरूपी या सोसायट्यांना द्यावी अशी मी विनंती करतो. धन्यवाद!

**मा.एकनाथ पवार-**मा.महापौर साहेब,मा.आयुक्त साहेब,सन्मा.सभागृह, खरेतर मी स्थायी समितीचे मनापासून अभिनंदन करतो. या विषयात सोसायटीला बक्षीस मिळाले पाहिजे, पारितोषिक मिळाले पाहिजे आणि स्वच्छतेच्या संदर्भामध्ये सोसायटीचा सहभाग पण असला पाहिजे. खरेतर पिंपरी चिंचवड शहरातल्या आपल्या सर्व नागरिकांनी रोजलँड सोसायटीचे अभिनंदन करायला पाहीजे. सन्माननीय पंतप्रधानांनी जी हाक दिली, याला रोजलँड सोसायटी, आणि ती ही पिंपरी चिंचवडमधील सोसायटी पूर्णपणे अशा पद्धतीचे काम करते. खरतरं एखादी सोसायटी खूप चांगलं काम करते आणि त्या सोसायटीच्या मागे पाठीवर हात फिरवायला सुद्धा कोणी नाही. आज खरेतर ही पहिली सुरुवात आहे. आपण प्रभागानिहाय सोसायट्यांची निवड करणार असू. मग १२ ते १०० फ्लॅट्स असलेली सोसायटी असो किंवा त्यापेक्षा जास्त फ्लॅट असलेली सोसायटी असो. मला असं वाटतं की, अशा पद्धतीने अनेक सोसायट्यांचा सहभाग या उपक्रमात येईल तेव्हा याच्यामध्ये किती

वाढ करायची याचे लिमिट नसणार आहे. परंतु सुरुवातीला पिंपरी-चिंचवड शहरामध्ये एक चांगल्या पद्धतीने खरेतर सोसायट्यांना पाच टक्यांपासून पंचवीस टक्यांपर्यंत करसवलत देतो. म्हणजे मोठ्या प्रमाणामध्ये करसवलत देतोय. मला असे वाटते की, पिंपरी चिंचवड शहराच्या माध्यमातून, या महापालिकेच्या माध्यमातून या शहरात एक चांगला पायंडा पाडतोय. माझी सर्व सभागृहाला विनंती आहे की, ज्या-ज्या प्रभागांमध्ये अशा पद्धतीच्या सोसायट्या आहेत,पिंपळे सौदागर असेल, पिंपळे गुरव आहे, चिंचवडचा काही भाग,इकडचा आपला मोशीकडील भाग आहे. मा.महापौर साहेब,तुमच्याही प्रभागामध्ये अनेक सोसायट्या मोठ्या प्रमाणामध्ये येताहेत. माझी सन्मा.नगरसेवकांना विनंती आहे की, आपल्या सोसायट्यांचा सहभाग यापद्धतीच्या उपक्रमामध्ये जास्तीतजास्त झालातर, किती मानांकन मिळाली,किती मार्क्स मिळाले,मला वाटतेय की,त्याहीपेक्षा स्वच्छतेसंदर्भात माझ्या भागातल्या सोसायटींमधील दहा सोसायटी तरी निश्चितच या उपक्रमामध्ये सहभागी होतील,अशा पद्धतीचे काम सन्मा.नगरसेवकांनी करावे. मा.महापौर साहेब, या पुढील काळामध्ये याला जर पहिल्या वर्षी प्रतिसाद चांगला मिळाला तर मला वाटतेय की याहीपेक्षा चांगल्या पद्धतीचे पारितोषिक असेल. त्याच्या मधल्या काही नॉर्म्स कमी-जास्त करण्याच्या संदर्भात असेल. पुढच्या वर्षापासून आपल्याला निश्चितच असे करता येईल. मी मा.महापौर साहेबांना विनंती करतो की, आपल्या या शहरामध्ये एक चांगला उपक्रम राबवला जातोय. हा विषय मंजूर करून आपण पुढील विषय घ्यावा. धन्यवाद!

यानंतर सदर ठराव मतास टाकणेत आला असता -

अनुकूल- ८१ प्रतिकूल- ०

अशी मते पडली व सदर ठराव सर्वानुमते मान्य झाल्याचे मा.महापौर यांनी प्रकट केले.

-------

**मा.स्विनल म्हेत्रे-**मा.महापौर साहेब, विषय क्रमांक २ वर मी पुढीलप्रमाणे ठराव मांडते.

ठराव क्रमांक - ८५ विषय क्रमांक – २

दिनांक- १६/१०/२०१७ विभाग- मा.आयुक्त

संदर्भ-१) मा.महापालिका आयुक्त यांचे जावक क्र.लेखा/कावि/६/८०४९/२०१७ दि.१६/०९/२०१७

२) मा.स्थायी समितीकडील ठ.क्र.१०४७ दि.२७/९/२०१७

प्रस्तावात नमुद प्रमाणे शासन निर्णय क्र.टीपीएस-१८१५/१२०४/१३/प्र.क्र.८७/१५/नवि-१३,दिनांक ३१/३/२०१५ च्या अधिसूचनेन्वये पुणे महानगर प्रदेश क्षेत्राकरीता क्षेत्र विकास प्राधिकरण गठीत करण्यात आले असून दिनांक ०४/१२/२०१५ च्या अधिसूचनेन्वये पुणे महानगर प्रदेश क्षेत्र विकास प्राधिकरणाची हद्द वाढ मंजूर करण्यात आली आहे. राज्यातील महानगर प्रदेशांसाठी महानगर क्षेत्र विकास प्राधिकरण अधिनियम लागू करण्याबाबतचा अध्यादेश शासनाने दिनांक १३/६/२०१६ रोजी घेतलेला आहे. हा अध्यादेश पुणे महानगर व क्षेत्र विकास प्राधिकरणास लागू करण्यात आलेला आहे. सदर

अध्यादेशातील क्रमांक २० च्या तरतूदीनुसार किमान १० कोटी रूपयांचा निधी नवनियुक्त प्राधिकरणास पुणे महानगरपालिका व पिंपरी चिंचवड महानगरपालिका यांनी सम प्रमाणात उपलब्ध करून देणे बाबत शासन निर्णय क्रमांक संकीर्ण-३०१६/प्र.क्र.७१५/नवि-२२, दिनांक २८ नोव्हेंबर, २०१६ अन्वये आदेश दिलेले आहेत. त्यानुसार पिंपरी चिंचवड महानगरपालिके तर्फे र.रू.५ कोटी निधी उपलब्ध करून देणे आवश्यक आहे. महाराष्ट्र महानगर प्रदेश विकास प्राधिकरण अध्यादेश २०१६ मधील क्रमांक २० मधील तरतूदीनुसार पिंपरी चिंचवड महानगरपालिकेतर्फे ५ कोटी रूपयांचा निधी महानगर प्रदेश विकास प्राधिकरणास वितरीत करण्यास उपरोक्त शासन निर्णयान्वये प्रशासकीय मान्यता देण्यात आलेली आहे. तरी पुणे महानगर प्रदेश क्षेत्र विकास प्राधिकरणास र.रु.५ कोटीचा निधी नगररचना विभागाकडील भूसंपादन निधी लेखाशिर्षातून उपलब्ध करून देण्यास मान्यता देणेत येत आहे.

**मा.सारीका सस्ते** - मा.महापौर साहेब, सदर ठरावाला अनुमोदन देते.

यानंतर सदर ठराव मतास टाकणेत आला असता -

अनुकूल-८१ प्रतिकूल- ०

अशी मते पडली व सदर ठराव सर्वानुमते मान्य झाल्याचे मा.महापौर यांनी प्रकट केले.

-------

**मा.सुनिता तापकीर -** मा.महापौर साहेब, विषय क्रमांक ३ वर मी पुढीलप्रमाणे ठराव मांडते.

ठराव क्रमांक - ८६ विषय क्रमांक – ३

दिनांक- १६/१०/२०१७ विभाग- मा.आयुक्त

संदर्भ – १) मा.महापालिका आयुक्त यांचे पत्र क्र.
वैदय/३/कावि/९८०/२०१७ दि.२८/०८/२०१७
२) मा.विधी समिती ठ.क्र.२६ दि.१५/९/२०१७

पिंपरी चिंचवड महानगरपालिकेच्या यशवंतराव चव्हाण स्मृति रुग्णालयामध्ये पदव्युत्तर अभ्यासक्रम सुरु करणेबाबतची प्रक्रिया कार्यान्वित आहे. याकरीता मान्यता मिळणेबाबतचा प्रस्ताव महापालिकेने केंद्रशासनामार्फत भारतीय आयुर्विज्ञान परिषदेकडे मंजूरीस्तव सादर करणेत आलेला आहे. त्यानुसार याबाबतची तपासणी माहे ऑगष्ट, सप्टेंबरचे दरम्यान होण्याची शक्यता आहे. त्यावेळी सदरचे अभ्यासक्रमाकरिता आवश्यक प्राध्यापक, सहयोगी प्राध्यापक तसेच सहाय्यक प्राध्यापक व इतर आवश्यक अधिकारी व कर्मचारी वर्ग उपलब्ध असणे आवश्यक आहे.सदरचे अभ्यासक्रमाकरीता महाराष्ट्र शासनाच्या नगरविकास विभागामार्फत क्र.पीसीसी-३०१३/प्र.क्र.६०१/नवि-२२, दि.०४/०३/२०१४ या शासन निर्णयान्वये पदे मंजूर करणेत आलेली आहेत. त्यानुसार पुढील प्रमाणे पदे भरणे आवश्यक आहे.

| Sr. No | Post and Pay – Scale | No of Post and Reservation | Age limit | Qualification |
|---|---|---|---|---|
| 1 | Professor Medicine (Pay Scale 37400-67000-GP-10000) | 1 | Open – 50<br>Reserved Class – 55 | • M.D. (Medicine) / M.D. (General Medicine) / D.N.B (Medicine) from Recognized University<br>• Associate Professor in the subject for 3 years in a permitted / approved / recognized medical college / institution with 4 Research Publication during the tenure of Associate Professor as 1st Author or as corresponding author |
| 2 | Professor (Obstetrics and Gynecology) (Pay Scale 37400-67000-GP-10000) | 1 | Open – 50<br>Reserved Class – 55 | • M.D./ M.S. / D.N.B. (Obstetrics and Gynecology) from Recognized University<br>• Associate Professor in the subject for 3 years in a permitted / approved / recognized medical college / institution with 4 Research Publication during the tenure of Associate Professor as 1st Author or as corresponding author |
| 3 | Professor (Ear, Nose and Throat) (Pay Scale 37400-67000-GP-10000) | 1 | Open – 50<br>Reserved Class – 55 | • M.S. / D.N.B. (Ear Nose and Throat) from Recognized University<br>• Associate Professor in the subject for 3 years in a permitted / approved / recognized medical college / institution with 4 Research Publication during the tenure of Associate Professor as 1st Author or as corresponding author |
| 4 | Professor (Orthopedic) (Pay Scale 37400-67000-GP-10000) | 1 | Open – 50<br>Reserved Class – 55 | • M.S. / D.N.B. (Orthopedic) from Recognized University<br>• Associate Professor in the subject for 3 years in a permitted / approved / recognized medical college / institution with 4 Research Publication during the tenure of Associate Professor as 1st Author or as corresponding author |
| 5 | Professor (Pediatric) (Pay Scale 37400-67000-GP-10000) | 1 | Open – 50<br>Reserved Class – 55 | • M.D./ D.N.B. (Pediatric) from Recognized University<br>• Associate Professor in the subject for 3 years in a permitted / approved / recognized medical college / institution with 4 Research Publication during the tenure of Associate Professor as 1st Author or as corresponding author |
| 6 | Professor (Gen Surgery) (Pay Scale 37400-67000-GP-10000) | 1 | Open – 50<br>Reserved Class – 55 | • M.S./ D.N.B. (Gen. Surgery) from Recognized University<br>• Associate Professor in the subject for 3 years in a permitted / approved / recognized medical college / institution with 4 Research Publication during the |

| | | | | |
|---|---|---|---|---|
| | | | | tenure of Associate Professor as 1st Author or as corresponding author |
| 7 | Professor (Radiology) (Pay Scale 37400-67000-GP-10000) | 1 | Open – 50<br>Reserved Class – 55 | • M.D. / D.N.B. (Radiology) from Recognized University<br>• Associate Professor in the subject for 3 years in a permitted / approved / recognized medical college / institution with 4 Research Publication during the tenure of Associate Professor as 1st Author or as corresponding author |
| 8 | Professor (Psychiatry) (Pay Scale 37400-67000-GP-10000) | 1 | Open – 50<br>Reserved Class – 55 | • M.D. / D.N.B. (Psychiatry) from Recognized University<br>• Associate Professor in the subject for 3 years in a permitted / approved / recognized medical college / institution with 4 Research Publication during the tenure of Associate Professor as 1st Author or as corresponding author |
| 9 | Professor (Anesthesia) (Pay Scale 37400-67000-GP-10000) | 1 | Open – 50<br>Reserved Class – 55 | • M.D. / D.N.B. (Anesthesia) from Recognized University<br>• Associate Professor in the subject for 3 years in a permitted / approved / recognized medical college / institution with 4 Research Publication during the tenure of Associate Professor as 1st Author or as corresponding author |
| 10 | Professor (Pathology) (Pay Scale 37400-67000-GP-10000) | 1 | Open – 50<br>Reserved Class – 55 | • M.D./ D.N.B. (Pathology) from Recognized University<br>• Associate Professor in the subject for 3 years in a permitted / approved / recognized medical college / institution with 4 Research Publication during the tenure of Associate Professor as 1st Author or as corresponding author |
| 11 | Associate Professor (Medicine) (Pay Scale 37400-67000-GP-9000) | 1 | Open – 40<br>Reserved Class - 45 | • M.D. (Medicine) / M.D. (General Medicine) /D.N.B (Medicine) from Recognized University<br>• As Assistant Professor in the subject for 4 years in a permitted/approved/ recognized medical college/institution with 2 Research Publication in Indexed Journals as 1st Author or as corresponding author |
| 12 | Associate Professor (Obstetrics and Gynecology) (Pay Scale 37400-67000-GP-9000) | 2<br>1-Open<br>1-SC | Open – 45<br>Reserved Class – 50 | • M.D./M.S./D.N.B. (Obstetrics and Gynecology ) from Recognized University<br>• As Assistant Professor in the subject for 4 years in a permitted/approved/ recognized medical college/institution with 2 Research Publication in Indexed Journals as 1st Author or as corresponding author |

| | | | | |
|---|---|---|---|---|
| 13 | Associate Professor (Ear, Nose and Throat) (Pay Scale 37400-67000-GP-9000) | 1 | Open – 45 Reserved Class – 50 | • M.S. (Ear Nose and Throat) from Recognized University<br>• As Assistant Professor in the subject for 4 years in a permitted/approved/ recognized medical college/institution with 2 Research Publication in Indexed Journals as 1st Author or as corresponding author |
| 14 | Associate Professor (Orthopedic) (Pay Scale 37400-67000-GP-9000) | 2<br>1-Open<br>1-SC | Open – 45 Reserved Class – 50 | • M.S./ D.N.B. (Orthopedic) from Recognized University<br>• As Assistant Professor in the subject for 4 years in a permitted/approved/ recognized medical college/institution with 2 Research Publication in Indexed Journals as 1st Author or as corresponding author |
| 15 | Associate Professor (Pediatric) (Pay Scale 37400-67000-GP-9000) | 2<br>1-Open<br>1-SC | Open – 45 Reserved Class – 50 | • M.D./ D.N.B. (Pediatric) from Recognized University<br>• As Assistant Professor in the subject for 4 years in a permitted/approved/ recognized medical college/institution with 2 Research Publication in Indexed Journals as 1st Author or as corresponding author |
| 16 | Associate Professor (Gen Surgery) (Pay Scale 37400-67000-GP-9000) | 2<br>1-Open<br>1-SC | Open – 45 Reserved Class – 50 | • M.S./D.N.B.(Gen. Surgery) from Recognized University<br>• As Assistant Professor in the subject for 4 years in a permitted/approved/ recognized medical college/institution with 2 Research Publication in Indexed Journals as 1st Author or as corresponding author |
| 17 | Associate Professor (Radiology) (Pay Scale 37400-67000-GP-9000) | 2<br>1-Open<br>1-SC | Open – 45 Reserved Class – 50 | • M.D. / D.N.B. (Radiology) from Recognized University<br>• As Assistant Professor in the subject for 4 years in a permitted/approved/ recognized medical college/institution with 2 Research Publication in Indexed Journals as 1st Author or as corresponding author |
| 18 | Associate Professor (Psychiatry) (Pay Scale 37400-67000-GP-9000) | 1 | Open – 45 Reserved Class – 50 | • M.D. / D.N.B. (Psychiatry) from Recognized University<br>• As Assistant Professor in the subject for 4 years in a permitted/approved/ recognized medical college/institution with 2 Research Publication in Indexed Journals as 1st Author or as corresponding author |
| 19 | Associate Professor (Anesthesia) (Pay Scale 37400-67000-GP-9000) | 2<br>1-Open<br>1-SC | Open – 45 Reserved Class – 50 | • M.D./ D.N.B. (Anesthesia) from Recognized University<br>• As Assistant Professor in the subject for 4 years in a permitted/approved/ recognized medical college/institution with 2 Research Publication in Indexed Journals as 1st Author or as corresponding author |

| | | | | |
|---|---|---|---|---|
| 20 | Associate Professor (Pathology) (Pay Scale 37400-67000-GP-9000) | 1 | Open – 45<br>Reserved Class – 50 | • M.D./ D.N.B. (Pathology) from Recognized University<br>• As Assistant Professor in the subject for 4 years in a permitted/approved/ recognized medical college/institution with 2 Research Publication in Indexed Journals as 1st Author or as corresponding author |
| 21 | Asst. Professor (Medicine) (Pay Scale 15600-39100-GP-6000) | 5<br>3- Open<br>1- ST<br>1- VJ NT | Open – 45<br>Reserved Class – 50 | • M.D. / M.S.(Medicine) / D.N.B (Medicine) from Recognized University<br>• 3 years Junior Resident in a recognized medical college in the concerned subject and one year as Senior Resident in the concerned subject in a recognized medical college. |
| 22 | Asst. Professor (Obstetrics and Gynecology) (Pay Scale 15600-39100-GP-6000) | 3<br>2- Open<br>1- SC | Open – 45<br>Reserved Class – 50 | • M.D. / M.S. / D.N.B. (Obstetrics and Gynecology ) from Recognized University<br>• 3 years Junior Resident in a recognized medical college in the concerned subject and one year as Senior Resident in the concerned subject in a recognized medical college. |
| 23 | Asst. Professor (General Surgery) (Pay Scale 15600-39100-GP-6000) | 5<br>3- Open<br>1- SC<br>1- ST | Open – 45<br>Reserved Class – 50 | • M.S. / D.N.B (Surgery) from Recognized University<br>• 3 years Junior Resident in a recognized medical college in the concerned subject and one year as Senior Resident in the concerned subject in a recognized medical college. |
| 24 | Asst. Professor (Radiology) (Pay Scale 15600-39100-GP-6000) | 3<br>2-Open<br>1-SC | Open – 45<br>Reserved Class – 50 | • M.S. / M.D. / D.N.B (Radiology) from recognized university<br>• 3 years Junior Resident in a recognized medical college in the concerned subject and one year as Senior Resident in the concerned subject in a recognized medical college. |
| 25 | Asst. Professor (Pediatric) (Pay Scale 15600-39100-GP-6000) | 3<br>2-Open<br>1-ST | Open – 45<br>Reserved Class – 50 | • M.D./ D.N.B (Pediatric) from Recognized University<br>• 3 years Junior Resident in a recognized medical college in the concerned subject and one year as Senior Resident in the concerned subject in a recognized medical college. |
| 26 | Asst. Professor (Orthopedic) (Pay Scale 15600-39100-GP-6000) | 2<br>1-Open<br>1-SC | Open – 45<br>Reserved Class – 50 | • M.S. / D.N.B (Orthopedic) from Recognized University<br>• 3 years Junior Resident in a recognized medical college in the concerned subject and one year as Senior Resident in the concerned subject in a recognized medical college |

| | | | | |
|---|---|---|---|---|
| 27 | Asst. Professor (E.N.T.) (Pay Scale 15600-39100-GP-6000) | 1 | Open – 45 Reserved Class – 50 | • M.S / D.N.B. (E.N.T.) from Recognized University<br>• 3 years Junior Resident in a recognized medical college in the concerned subject and one year as Senior Resident in the concerned subject in a recognized medical college |
| 28 | Asst. Professor (Psychiatry) (Pay Scale 15600-39100-GP-6000) | 1 | Open – 45 Reserved Class – 50 | • M.D. / D.N.B (Psychiatry) from Recognized University<br>• 3 years Junior Resident in a recognized medical college in the concerned subject and one year as Senior Resident in the concerned subject in a recognized medical college |
| 29 | Asst. Professor (Pathology) (Pay Scale 15600-39100-GP-6000) | 1 | Open – 45 Reserved Class – 50 | • M.D. / D.N.B (Pathology) from Recognized University<br>• 3 years Junior Resident in a recognized medical college in the concerned subject and one year as Senior Resident in the concerned subject in a recognized medical college |
| 30 | Asst. Professor (Anesthesia) (Pay Scale 15600-39100-GP-6000) | 3<br>2-Open<br>1-SC | Open – 45 Reserved Class – 50 | • M.D./DNB (Anesthesia) from Recognized University<br>• 3 years Junior Resident in a recognized medical college in the concerned subject and one year as Senior Resident in the concerned subject in a recognized medical college |

**Terms and Conditions:**

- If candidatesare not available, age limit will be relaxed as required.The condition of the age relaxation will be according to the rules of the Medical Council of India.
- Above mentioned posts are on temporary basisfor 3 years period.
- Interested candidates should review the minimum qualification 1998 requirement for the post of teacher in any Medical institute as per the Medical Council of India with effect from June 2017).
- Candidates having private practicemay also apply for the above posts on contractual basis. Pay shall be as follow:

  For Assistant Professor Rs.60000/- (Less than 5years of teaching experience) or Rs.70000/- (5years or more teaching experience), Associate Professor Rs.90000/- and Professor will be paid Rs.110000/-
- Walk-in-Interview will be conducted every day except Holidays at YashwantraoChavan Memorial Hospital,SantTukaram Nagar,Pimpri, Pune from 10.00am to 3.00pm at Medical Superintendent Office from Dt. -08-2017.
- Candidates coming for interviewshould bring all documents, original and self-attested copies. (e.g. Academic Certificates, Caste Certificate, Experience Certificate, Participation Certificates etc.)
- It shall be obligatory for the selected candidate to work as per PCMC terms and conditions.
- Biometric attendance is compulsory.

तरी वरीलप्रमाणे पदे विहित अटी व शर्तीनुसार ०३ वर्षांचे कालावधीसाठी तात्पुरत्या स्वरुपात भरणेकरिता, मुंबई प्रांतिक महानगरपालिका अधिनियमातील कलम ५३(१) नुसार मान्यता देणेत येत आहे.

**मा.निर्मला कुटे** - मा.महापौर साहेब, सदर ठरावाला अनुमोदन देते.

**मा.वैशालीताई घोडेकर**-मा.महापौर साहेब,मा.आयुक्त साहेब,सन्मा.सभागृह,पत्रकार बंधू-भगिनी, याठिकाणी मा.आयुक्तसाहेब मी एक विचारेन की आपण हा जो विषय घेतलेला आहे तो अतिशय चांगला विषय आहे. आमचा या विषयाला विरोध नाही. पण वाय.सी.एम.च्या बेसिक गरजा तरी पूर्ण होत आहेत का. याठिकाणी आपण बघितले की पेशंटचा फ्लो इतका आहे. पण डॉक्टरांची संख्या खूप कमी आहे. इतका लोड येतोय. पदव्युत्तरसाठी हे लोक अपॉईंट करतोय तर हे लोक वायसीएम पण हँडल करणार आहे का. याठिकाणी मला हेच म्हणायचे आहे की, इथे डॉक्टर कमी पडत आहेत. आपल्याकडे सिस्टर्स नाहीत. याठिकाणी आपण लक्ष देत नाही. इतक्या वर्षांमध्ये मला एक गोष्ट समजलेली नाही की, आरोग्य विभाग हा आरोग्य समितीच्या अंडर का येत नाही. यात नक्की काय गौडबंगाल आहे. आरोग्य समिती का स्थापन होत नाही. आरोग्य समिती ही स्थापन झाली पाहिजे. आज सगळे प्रश्न हे आरोग्यविषयक प्रश्न आहेत. स्वच्छता असेल,वायसीएमचा प्रश्न असेल, हा शहराच्या जिव्हाळ्याचा प्रश्न आहे. या ठिकाणीही आरोग्य समिती ही स्थापन झाली पाहिजे. त्याच्या अंतर्गत वायसीएम असेल, आरोग्याचे प्रश्न हे हॅण्डल झाले पाहिजेत. मी असताना यासाठी खुप प्रयत्न केला होता. पण त्याठिकाणी माझ्या प्रयत्नांना अपयश आले होते. तर मी आत्ता नक्कीच नेत्यांना सांगेन की, आपण आरोग्य समिती गठण करावी. आमचे सगळ्यांचे विचार, आमच्या सगळ्यांच्या समस्या यातून दूर होतील. मा.आयुक्त साहेब,आपण वायसीएमकडे नक्की लक्ष देणे गरजेचे आहे. आपण म्हणताय आपण पदव्युत्तर कॉलेज सुरू करत आहात. परंतू यासाठीही तुम्हाला तीच यंत्रणा लागणार आहे. मग तुम्ही पदवीधर कॉलेज का सुरू करत नाही. दोन्हीही का सुरु करत नाही. कारण जी यंत्रणा पदवीधर कॉलेजसाठी लागणार आहे,तीच पदव्युत्तर कॉलेजसाठीही लागणार आहे. हे लोक वायसीएमची ओपीडीही सांभाळणार आहेत का. वाय.सी.एम साठी मदत करणार आहेत का, याचा देखील खुलासा झाला पाहिजे. मा.आयुक्त साहेब, आरोग्य समितीबाबत आपण नक्कीच लक्ष घालावे. कारण आत्ता आरोग्य समितीची अत्यंत गरज आहे. धन्यवाद!

**मा.योगेश बहल**-मा.महापौर साहेब,मा.आयुक्त साहेब,सन्मा.सभागृह,आमचा या विषयाला विरोध नाही. फक्त प्रशासनाची काय संकल्पना आहे आणि त्याचा भविष्यामध्ये आपल्याला कसा फायदा होणार आहे. यामध्ये मग आम्हाला प्रॉपर माहिती दिल्यानंतर याच्यामध्ये काही सूचना करता आली तर याच्यासाठी आपली एकंदर काय संकल्पना आहे ते सभागृहाला समजून सांगावे अशी विनंती आहे.

**मा.राहुल कलाटे**-मा.महापौरसाहेब,मा.आयुक्त साहेब,सन्मा.सर्व सभासद,पत्रकार बंधु,हा अतिशय चांगला विषय आहे. वाय.सी.एम.सारख्या ठिकाणी आपण आपल्या शहरातल्या नागरिकांची वैद्यकीय समस्या सोडवत असताना याठिकाणी आपण वैद्यकीय कॉलेज केल्यास निश्चितच आपल्या शहराला त्याचा फायदा होईल ज्याप्रमाणे मा.योगेश बहल यांनी सांगितले,त्याप्रमाणे सभागृहाला याची पूर्ण माहिती द्यावी. सप्टेंबर/ऑक्टोबर महिन्यात मंजूरीसाठी प्रस्ताव गेल्यानंतर ए.आय.सी.टी.ई.चे लोक

इथे व्हिजिटला येतील. त्यास आमची कुठलीही हरकत नाही. परंतु मा.योगेशजी बहल यांनी सांगितले त्याप्रमाणे याची माहिती सभागृहाला मिळावी. ही माहिती देत असताना खरेच साहेब, शिक्षण समितीची गरज कशाप्रकारे आहे. मा.आयुक्त साहेब, आपण आरोग्यविषयक समिती जर नेमली तर उद्या याचे मॉनिटरींग कसं करणार, एकच अधिकारी जो वर्षानुवर्षे तिथे बसला आहे. पुढे तोच अधिकारी हे कॉलेज चालवणार, या सर्व गोष्टींची स्पष्टता सभागृहाला असावी. धन्यवाद!

**मा.सचिन चिखले**-मा.महापौर साहेब,माआयुक्त साहेब,सर्व सन्मा.सभागृह, खरेतर हा खूपच चांगला विषय सभागृहासमोर ठेवण्यात आलेला आहे. आताच खूप महत्वाची सूचना मा.वैशालीताई घोडेकर यांनी दिली. आरोग्य समिती नेमणे आणि गठीत करणे खूप गरजेचे आहे. सन्मा.आयुक्त साहेब आणि सन्मा.महापौर साहेब, आपण पहातोय की, कमीत कमी गेल्या सात ते आठ महिन्यांपासून वेळोवेळी वायसीएमच्या विविध प्रश्नांवर प्रश्नचिन्ह या पिंपरी चिंचवड शहरात उभे राहतेय. आणि शहरातले सगळ्यात मोठे हॉस्पिटल याला पांढरा हत्ती म्हणून या शहरातील सर्व नागरिक ओळखतात. तिथली सुविधा सुधारणे खूप गरजेचे आहे आणि ताईंनी जो विषय मांडला तो खूप महत्त्वाचा विषय मांडला. त्याबद्दल मी त्यांचे धन्यवाद देतो आणि थांबतो. धन्यवाद!

**मा.महापौर**-मा.आयुक्तसाहेब,आपण याबाबतीत खुलासा करावा.

**मा.आयुक्त**-सन्मा.महापौर साहेब,सन्मा.सभागृह, आताच हा विषय पटलावरती ठेवण्यात आलेला आहे. त्याच्या अनुषंगाने मी खुलासा करु इच्छितो. पोस्टग्रॅज्युएट इन्स्टिटयूट वायसीएम येथे सुरु करण्याचा प्रस्ताव महानगरपालिकेत यापूर्वीच सुरु केलेला होता. त्याच्या अनुषंगाने केंद्रशासनाकडे यासंदर्भात पाठपुरावा करण्यात आलेला आहे. याच्यामध्ये पीजी इन्स्टिटयूट तयार करण्यासाठी जी काही पदभरतीची आवश्यकता आहे, त्याच्या अनुषंगाने १०३ पदांची निर्मीती करण्याची देखील कार्यवाही आपल्याकडे करण्यात येते आहे. पीजी इन्स्टिटयूट स्थापन करण्याच्या मागची भूमिका काय याच्याबाबतीत मला विचारणा करण्यात आलेली आहे. त्याचा खुलासा मी असा करतो की, पीजी इन्स्टिटयूट ही एक स्पेसिफीक इन्स्टिटयूट आहे. वैदयकीय क्षेत्रातले आपल्याइकडे नगरसदस्य आहेत. पीजी इन्स्टिटयूट आणि पदवीची जी इन्स्टिटयूट मेडीकल इन्स्टिटयूट जी असते याच्यातला मुलभूत फरक असा आहे की, एमबीबीएससाठी आपल्याला क्लासेस घ्यावे लागतात. क्लासरुम ट्रेनिंग करावे लागते आणि त्यामुळे प्राध्यापकांचे तिकडचे काम हे क्लासरुम कन्डक्ट करण्याचे जास्त काम राहते. तथापि पीजी इन्सिटिटयूट जर केलीतर तिथे क्लासरुम वर्क नगण्य असते. म्हणलेतर नाहीच असते. पण केवळ पूर्णपणे क्लिनिकल वर्क जे काही स्टुडंटस येतात,ते आपल्या येथे करतात आणि पूर्णपणे राऊंड सर्जीकल किंवा अन्य प्रकारचे काम करता-करताच त्यांची पीजी होत असते. ओपीडी करता करता, पेशंट पाहता-पाहता वरिष्ठ तज्ञ प्राध्यापकांच्या मार्गदर्शनाखाली पीजी कम्प्लिट करत असतात. आणि हयाच हेतूने पीजी इन्स्टिटयूट सुरु करण्याची भूमिका प्रशासनाने ठेवलेली आहे. पीजी इन्स्टिटयूटसाठी जे प्राध्यापक येतील वरिष्ठ प्राध्यापकापासून सहाय्यक सहयोगी प्राध्यापकांपर्यंत हे सर्वजण आपल्या येथे वैदयकीय कामच करतील आणि वैदयकीय काम करता-करता आपल्याकडे आलेले,जे ऑलरेडी एमबीबीएस असलेले विदयार्थी पीजीसाठी आलेले आहेत. विशेष क्षेत्रात पीजी करणारे विदयार्थी आहेत. त्यांना त्या-त्या शाखेमध्ये

हॅण्डओव्हर करतील. पर्यायाने आपल्याकडे मोठया प्रमाणामध्ये विदयार्थी धरुन डॉक्टरांची फौज वायसीएममध्ये उपलब्ध होणार आहे आणि याच्यावरचा हा खूप चांगला उपाय आहे. मला हे देखील नमुद करायचे आहे की, १०३ डॉक्टर्स जे की पदविधर पदव्यूत्तर प्रशिक्षण घेतलेले खूप चांगले प्राध्यापक आपल्याकडे येतील. आज वायसीएमएचमध्ये आपली जी समस्या आहे, ती केवळ डॉक्टरांची उपलब्धता हाच महत्वाचा प्रश्न आहे. काम खूप आहे. मला वाटते की, वायसीएम ही या शहराने, या महानगरपालिकेने निर्माण केलेली खरोखर चांगली संस्था आहे की, जी नागरीकांना सततस्वरुपी, निर्व्याज सेवा देत असते. त्याच्यात निश्चितपणे काही कमतरता असतील, उणिवा असतील त्या भरण्यासाठीच हा संपुर्णपणे प्रयत्न होतो आहे. जर आपण लवकरात लवकर ही प्रक्रिया पूर्ण केलीतर,वायसीएममधील डॉक्टरांची कमतरता हा प्रश्न कायमस्वरुपी मिटू शकेल. या वर्षीच्या कार्यक्रमातच आपण पीजी इन्सिटिटयूटचे सर्टिफिकेशन एमसीआयकडून करुन घेण्यासाठी प्रयत्नशील होतो. तथापि आपली भरती प्रक्रीया पुर्ण न झाल्यामुळे या वर्षात आपले सर्टिफिकेशन होणार नाही. आपण पुढील वर्षाच्या अभ्यासक्रमासाठी प्रयत्न करतो आहोत. जर आपल्याला पुढील वर्षात अभ्यासक्रमाची मान्यता घेवून, आपली इन्सिटिटयूट सुरु करायची असेलतर या वर्षात आपल्याला ही भरती पुर्ण करणे गरजेचे आहे. कारण एनसीआय पूर्ण भरती प्रक्रिया केल्याशिवाय इन्सपेक्शनसाठी येत नाही. आपल्याकडे डिपार्टमेंट क्रिएट करावी लागतील. आपल्या येथे त्यासाठीची लायब्ररी क्रिएट करावी लागेल. ज्या काही सुविधा पीजी इन्सिटिटयूटमध्ये आणणे आवश्यक आहेत,त्यांची देखील निर्मीती आपल्याला करावी लागेल. आणि त्यादृष्टिने प्रशासनाने पूर्ण प्रयत्न सुरु केलेले आहेत. वायसीएम हे महानगरपालिकेचे एक आदर्श उदाहरण आहे. मुंबई महानगरपालिकेच्या धर्तीवर नागरीकांच्या सेवेकरिता या महानगरपालिकेने निर्माण केलेले आहे आणि जर आपल्याला असेच चांगले काम करायचे असेलतर तज्ञ डॉक्टरांची फौज निर्माण करण्याचे हे प्रभावी साधन पीजी इन्सिटिटयूटचे आपल्याकडे आहे. या निमित्ताने महानगरपालिकेमध्ये येणा-या मोठया संख्येच्या पेशंटला अभ्यासून चांगले डॉक्टर्स देखील आपल्या येथे निर्माण होणार आहेत. हि देखील याची उपलब्धता राहणार आहे. या भूमिकेतून हा विषय सभागृहाच्या पटलावर ठेवण्यात आलेला आहे. सभागृहासमोर माझे निवेदन.

**मा.मंगलाताई कदम -** मा.महापौर साहेब,मा.आयुक्त साहेब,सर्व सन्मा.सभागृह,मा.आयुक्त साहेब, तुम्ही जसा पीजीचा खुलासा केला, त्याचबरोबरीने जसे आपल्याला हे डॉक्टर मिळणार आहेत, हेच डॉक्टर नर्सिंग कॉलेजला सुद्धा शिकवू शकतात. त्यामुळे ते सुद्धा जर तुम्ही घेतले. आपण मागच्या वेळेला प्रयत्न केलेत,शाळेला प्रस्ताव दिलेला आहे. आपण प्रस्ताव दिलेला आहे. ताराचंद हॉस्पिटल असेल, केईएम हॉस्पिटल असेल. याठिकाणी नर्सिंग कॉलेज असल्यामुळे. आज जर कामत सरांचे हॉस्पिटल घेतले असेलतर त्यांनी सुद्धा तिथे नर्सिंग कॉलेज सुरू केले आहे. तो सुद्धा स्टाफ तिथे वापरला जातो. आपल्याकडे नर्सिंगच्या ज्या मुली आहेत किंवा मुले असतील, तेसुद्धा वाय.सी.एम. मध्ये वापरता येतील. मग याच जोडीला तुम्ही तो पण प्रस्ताव करा. मग जर तुम्ही तो प्रस्ताव केलातर, दोन्ही पण आपल्याला उपलब्ध होतील. आमचा या प्रस्तावाला अजिबात विरोध नाही. हा प्रस्ताव झालाच पाहिजे, हे करायला पाहिजे. परंतु आमची इच्छा आहे पुढे जाऊन परत नंतर नर्सिंगची मान्यता घेण्यापेक्षा तुम्ही आत्ताच नर्सिंगची मान्यता घ्यावी अशी आमची विनंती आहे.

**मा.राहुल कलाटे**- मा.महापौर साहेब,मा.आयुक्त साहेब,सर्व सन्मा.सभागृह,याठिकाणी हा अतिशय चांगला विषय घेतलेला आहे. जेणेकरून नागरिकांच्या आरोग्याशी निगडित असणारे प्रश्न, याच्यामधून आपले दोन्हीही साध्य होईल. एम.बी.बी.एस. झालेले विद्यार्थी यांचे पी.जी.पण होईल. पण आपल्यालाही डॉक्टरांची उपलब्धता चांगल्या प्रकारे होईल. मा.मंगलाताई कदम यांनी सांगितले की, नर्सिंग किंवा असे विविध कोर्सेस जर आपल्याला त्यातून आत्ताच घेता आलेतर,पुढे जाऊन आपल्याला जेव्हा उकल होईल,आपण हे केलं असतं तर बर झालं असतं, त्यावर आपण त्यादृष्टीने विचार करावा. मुंबईचा किंगच्या धर्तीवर देखील आपण पी.जी. करतोय. आपल्याकडे जागेची उपलब्धता आहे. आपल्याकडे इन्फ्रास्ट्रक्चर आहे. जर आपण एम.बी.बी.एस. कॉलेज देखील सुरू केलंतर, ही देखील आज शहराची गरज आहे. पण पाहतो, मोठ-मोठ्या इन्स्टिट्युट करोडो रुपये डोनेशन घेतात. प्रत्येक सीटला आपणदेखील मुंबईच्या केईएमच्या धर्तीवर एमबीबीएस सारखे कॉलेजेस सुरु करू शकलो तर, आपलाच एमबीबीएस स्टूडंट,आपलेच पी.जी.इन्स्टिटयूट,आपल्या महानगरपालिकेचे कोर्सेस करायला आपल्याला फायदा होईल. धन्यवाद!

**मा.एकनाथ पवार**-सन्मा.महापौर,सन्मा.आयुक्त,सन्मा.सभागृह,वायसीएम आणि पीजी इन्स्टिट्युट च्या संदर्भामध्ये खरेतर खूप चांगला विषय याच्याअगोदर येणे गरजेचे होते. मा.योगेश बहल, मला वायसीएमच्या संदर्भामध्ये खूप बोलायचे आहे. कारण तुम्ही आणि मी एकत्रित बसून वायसीएमच्या संदर्भामध्ये बोललोतर ते खूप चांगले होईल. कारण मला वाटतं वायसीएमचा सगळ्यात जास्त अभ्यास तुमचा आहे. मी आता अभ्यासाचे एक-एक पान हातामध्ये घेतले आहे. आणि मला खरेतर या सभागृहाला एवढेच सांगायचे आहे की, ज्या पद्धतीने आरोग्याच्या संदर्भामध्ये चर्चा होत होत्या, वायसीएमचेही आरोग्य सुधारण्याची ख-या अर्थाने गरज आहे. खरेतर वायसीएममध्ये या शहरामधील नागरिकांना चांगली ट्रीटमेंट मिळाली पाहिजे. आम्ही महापालिकेमध्ये सत्तेत आल्यानंतर खरेतर हा एक प्रामाणिक प्रयत्न म्हणजे वायसीएमचं आरोग्य असेल. वायसीएमचं आरोग्य एवढ्यासाठीच म्हणतो की कारण वायसीएमचेही ब-यापैकी सर्जिकल स्ट्राईक करावे लागणार आहे. वायसीएमचेही ऑपरेशन करायची गरज आहे. त्याच्यामध्ये अनेक गोष्टी आहेत. मला वाटतं की, सुरुवातीला आपण पीजी इन्स्टिटयूट मधून चांगले डॉक्टर्स आणतोय. आणि गेल्या आठवड्यामध्ये आयुक्त साहेबांनी यासंदर्भामध्ये मिटिंग घेतली होती. वेगवेगळ्या प्रकारच्या डॉक्टर्सची गरज आहे, चांगल्या नर्सेसची, वॉर्डबॉयची गरज आहे. आजूबाजूच्या शहरांतील माणूस हा वायसीएममध्ये ट्रिटमेंट घेण्यासाठी येतो. त्यांना चांगल्या पद्धतीचे उपचार/सुविधा मिळाल्या पाहिजेत. मला वाटतेय की ही सुरवात आहे. आणि पुढच्या काळामध्ये वायसीएम संदर्भात आपण अनेक ऑपरेशन करू. खरेतर मा.आयुक्त साहेबांनी सांगितले की, केईएम सारखी चांगली संस्था आपण डोळ्यासमोर ठेवतो. पुण्यामध्येही काही चांगल्या गोष्टी आहेत हे लक्षात ठेवा. परंतु दुर्दैवाने यामध्ये वायसीएमच्या विषयात मा.महापालिका सभा घ्यावी लागणार आहे. परंतु याविषयी मी एवढंच सांगेन, जर आपल्याला एमसीएच्च्यासमोर जायचं असेलतर आपल्याला चांगले डॉक्टर्स घ्यावे लागतील. मला वाटतं की,हे खरेतर मैदानामध्ये उतरून शिकवणारे डॉक्टर्स आहेत. एखाद्या अभ्यासवर्गामध्ये जाऊन, एखाद्या रूममध्ये जाऊन,लेक्चर्स घेऊन आपला वेळ तिथेच घालवणारे डॉक्टर्स नाहीत. आणि मला वाटतेय की, हा विषय खूप चांगला आहे. हा विषय लवकरात लवकर

मंजूर करून आपल्या शहराला चांगल्या आरोग्य सुविधा मिळण्यासाठी निश्चितच मदत होईल. मी मा.महापौरांना विनंती करतो की, हा विषय मंजूर करून पुढील विषय घ्यावा.

**मा.योगेश बहल**-मा.महापौरसाहेब,मा.आयुक्त साहेब,सर्व सन्मा.सभागृह, मला मा.आयुक्त साहेबांना व आपल्याला सूचना करायची आहे. आत्ताच मा.पक्षनेत्यांनी सांगितले की, चांगले काम करायचे. अर्थातच सर्वांची हिच धारणा आहे. मा.आयुक्तसाहेब,आपण इन्स्टिटट्यूट चालू करत असताना १३० स्टूडंटस् आणि बाकी टिचिंग स्टाफ वगैरे जे सांगितले. याच विषयाबरोबर मंजुरी घेत असताना, यासाठी लागणारी लॅब,टिचिंग स्टाफ,क्लासरूम जे इथे असणार आहे. किंवा बाकी त्याच्या अनुषंगाने त्यांचं रेसिडेंस असणार आहे. या सर्व गोष्टींच सुद्धा कॅल्क्युलेशन करुन, त्याची सुद्धा मान्यता मा.महापालिका सभेकडून आत्ता किंवा पुढील मा.महापालिका सभेत घ्यावी. वाय.सी.एम.मध्ये ज्या-ज्या गोष्टींची आवश्यकता आहे. कारण ज्यावेळी लोक येतील, त्यावेळी लोकांची व्यवस्था कशी केली आहे. रेसिडेंट डॉक्टर्स येतील तेव्हा त्यांना कसे आणि कुठे अकोमोडेट करणार आहात. तुम्ही त्यांची व्यवस्था कशी केली आहे. आणि मग रेसिडेन्सी डॉक्टरही असतील, त्याअनुषंगाने जे बदल हवेत ते सुद्धा आपण करून घ्यावेत, अशा प्रकारची मी आपल्याला विनंती करतो.

**मा.महापौर** – हा विषय मंजूर करणेत येत आहे.

यानंतर सदर ठराव मतास टाकणेत आला असता -

अनुकूल-८१ प्रतिकूल- ०

अशी मते पडली व सदर ठराव सर्वानुमते मान्य झाल्याचे मा.महापौर यांनी प्रकट केले.

----------------

**मा.राजेंद्र गावडे -** मा.महापौर साहेब, विषय क्रमांक ४ वर मी पुढीलप्रमाणे ठराव मांडतो.

ठराव क्रमांक - ८७ विषय क्रमांक – ४

दिनांक- १६/१०/२०१७ विभाग- मा.आयुक्त

संदर्भ – १) मा.संतोष कोकणे, मा.अश्विनी जाधव यांचा प्रस्ताव –

२) मा.विधी समिती ठ.क्र.२८ दि.१५/९/२०१७

मा.आयुक्त,पिंपरी चिंचवड महानगरपालिका, यांचेकडील पत्र क्रमांक प्रशा/७/कावि/ ३३३/२०१७ दिनांक ३० जुलै २०१६ नुसार पिंपरी चिंचवड महापालिका अस्थापनेवरील विविध पदांचा आकृतीबंध व सेवानियम शासनाकडे मान्यतेकामी पाठविण्यात आले असून अद्याप शासन मान्यता प्राप्त झालेली नाही.

मा.महापालिका सभा ठराव क्रमांक ८६६ दिनांक २०/०५/२०१६ अन्वये पिंपरी चिंचवड महानगरपालिकेच्या आकृतीबंध आणि सेवा नियम यांस मा.महापालिका सभेने मान्यता दिली असून महापालिकेच्या सेवा नियमांमध्ये खालीलप्रमाणे अंशतः सुधारणा करणेस मान्यता देणेत येत आहे.

**<u>अ.क्र. ८०१ – “लॅब टेक्निशियन” -</u>** नेमणूकीची सुधारित अर्हता –

| अ.क्र. | पदनाम | नेमणूकीची पध्दत व टक्केवारी | नेमणूकीकरिता अर्हता व नेमणूकीच्या पध्दती |
|---|---|---|---|
| २०१ | लॅब टेक्निशियन | नामनिर्देशन २५% | 1) मान्यताप्राप्त विद्यापीठाची बी.एस्सी., ही पदवी<br>2) शासनमान्य संस्थेकडील डी.एम.एल.टी कोर्स उत्तीर्ण असणे आवश्यक<br>3) पिंपरी चिंचवड महानगरपालिकेच्या वैद्यकीय विभागाकडील व मनपाच्या रूग्णालयात किमान १० वर्षे प्रत्यक्ष कामकाजाचा अनुभव आवश्यक |
| | | २५% नामनिर्देशन | 1) मान्यताप्राप्त विद्यापीठाची बी.एस्सी., ही पदवी<br>2) शासनमान्य संस्थेकडील डी.एम.एल.टी कोर्स उत्तीर्ण असणे आवश्यक |
| | | ५०% पदोन्नती | 1) महानगरपालिका रूग्णालयातील लॅब असिस्टंट पदावरील किमान ३ वर्षाचा अनुभव आवश्यक |

याप्रमाणे सुधारित अर्हता निश्चित करून पिंपरी चिंचवड महानगरपालिकेच्या रूग्णालयांमध्ये १० वर्षापेक्षा जास्त कालावधीकरिता लॅब टेक्निशियन म्हणून सेवा केलेल्या खालील मानधनावरील कर्मचा-यांना उपलब्ध होणा-या २५% रिक्त जागांवर सरळ सेवेने विहीत कार्यपध्दतीचा अवलंब करून महापालिकेच्या सेवेमध्ये समाविष्ट करून घेतल्यास मनपास अनुभवी कर्मचारी उपलब्ध होणार असल्याने त्यास मान्यता देणेत येत आहे.

| अ.क्र. | मानधनावरील कर्मचा-याचे नांव | पदनाम | शैक्षणिक अर्हता | मनपा दवाखान्यातील प्रत्यक्ष कामकाज अनुभव कालावधी |
|---|---|---|---|---|
| १ | श्रीम.वैशाली सुशिलकुमार शिंदे | लॅब टेक्निशियन | बी.एस्सी., डी.एम.एल.टी., | १६ वर्षे |
| २ | श्रीम.स्नेहलता बन्यामिन मिसाळ | लॅब टेक्निशियन | बी.एस्सी., डी.एम.एल.टी., | १२ वर्षे |
| ३ | श्रीम.सुजाता संपत साखरे | लॅब टेक्निशियन | बी.एस्सी., डी.एम.एल.टी., | १० वर्षे |
| ४ | श्रीम.श्रीया पंजाबराव मोंढे | लॅब टेक्निशियन | बी.एस्सी., डी.एम.एल.टी., | १० वर्षे |

तरी आकृतीबंध व सेवा नियमात वरीलप्रमाणे दुरूस्ती करून त्याबाबतची अंमलबजावणी करणेकामीचे अधिकार आणि महापालिका आस्थापनेवरील विविध संवर्गातील अधिकारी, कर्मचारी सेवा निवृत्त झाल्यानंतर अनेक वर्षे विविध पदे रिक्त रहात असल्याने नागरिकांना देण्यात येणा-या सेवांवर परिणाम होत असल्याची बाब विचारात घेता महापालिका आस्थापनेवर सध्या कार्यरत असलेल्या अधिकारी व कर्मचारी यांच्या सेवा आवश्यकतेनुसार सक्षम समित्यांचे मान्यतेने महापालिका अस्थापनेवरील इतर समकक्ष पदांवर वर्ग करणेचे अधिकार मा.आयुक्त, पिंपरी चिंचवड महानगरपालिका, पिंपरी-१८ यांना प्रदान करणेस मान्यता देणेत आहे.

**मा.मोरेश्वर शेडगे** – मा.महापौर साहेब, ठरावाला अनुमोदन देतो.

**मा.मंगलाताई कदम**-मा.महापौर साहेब,मा.आयुक्त साहेब,सर्व सन्मा.सभागृह,हा जो विषय आहे, यात चारच लोकांचा हा विषय आलेला आहे. मा.विधी समितीकडून हा विषय आलेला आहे. परंतू माझ्या माहितीप्रमाणे वायसीएममध्ये अजून बारा लोक आहेत. त्यांनी तिथे दहा/ दहा वर्षे कामकाज केले आहे. मग चारच लोकांचा विषय कसा काय येऊ शकतो. मग काय होते, पुढे जाऊन तुम्हाला याला खोट बसणार आहे. मग उरलेले कोर्टात जाणार आहेत. मा.महापौर साहेब, संबंधितांना खुलासा करायला लावा. हे चार लोक घेतलेतर अजून जे १२ लोक आहेत, ते कुठे जाणार. यात अजून १२ लोक आहेत. हा विषय परत राहणार आहे. मा.आयुक्त साहेब, मी सांगू इच्छिते की,आज आरोग्य ही मुलभूत सुविधा आहे. आणि पिंपरी चिंचवड शहरात जिथे-जिथे ओपीडी आहेत, त्याठिकाणी लॅब टेक्नीशियनसुद्धा पाहिजे आहेत. ऑटोमॅटिक लॅबचे इन्स्ट्रुमेंट मिळतात आणि ते ठेवल्यानंतर जर तुम्ही एक स्टाफ दिलातर, वायसीएमवरील लोड कमी होईल. पिंपरी-चिंचवडमधील अनेक ज्येष्ठ नागरिक असतील किंवा महिला असतील यांना जर हिमोग्लोबिन चेक करायचे असेल तरीसुद्धा वायसीएमला जायचे असेलतर हे अजिबात योग्य नाही. उरलेल्या लोकांचं करणार काय तर परत मी सांगू इच्छिते की,मध्येसुद्धा मी ज्यावेळी विचारणा केली की,जर तुम्ही ओपीडी देतातर एखादी टेस्ट करण्यासाठी तुम्ही एखादी सिस्टर किंवा एखादा लॅब टेक्निशियन द्या. किंवा ज्यांना जी गोष्ट किंवा लॅब टेक्निशियन द्यायला पाहिजे तर, ते का देत नाहीयेत. माझ्या प्रभागातील ओपीडीत सहा महिने ते इन्स्ट्रूमेंट पडून होते. परंतु तिथे कर्मचारी दिला गेला नाही. कारण त्यांच्याकडे लोकच कमी आहेत. वायसीएमला लोक कमी आहेत आणि येताना जर चारच लोकांचा विषय आलातर बारा लोकांचा विषय का नाही घेतला, याचा खुलासा करावा. मा.रॉय सर तुम्ही हे सांगा. कारण उरलेले लोक कोर्टात जाणार आणि याला परत खो बसणार आणि आणखीन जर तुम्हाला लागतील तर भरती करा. कारण पिंपरी-चिंचवडच्या हॉस्पिटल्सची संख्या किती आहे आणि तेथे तुम्हाला अजून किती लॅब टेक्निशियन लागणार आहेत, ते walk in interview ने भरा. मा.महापौर साहेब,मा.आयुक्त साहेब, अजून याचा खुलासा करण्यात यावा.

**मा.महापौर** - हा सदस्य प्रस्ताव आहे. प्रशासन त्याचा अभ्यास करेल आणि त्याप्रमाणे करेल.

**मा.मंगलाताई कदम** - मा.महापौर साहेब, मी तेच सांगितलं. मा.विधी समितीमधून आलेला हा सदस्य प्रस्ताव आहे. हा सदस्य प्रस्ताव आहे म्हणून आम्ही कोणी नाही म्हटलेले नाही. आम्ही हा विषय मंजूरच करणार आहोत. उरलेल्या लोकांना पण इन्क्लूड करुन घ्या. उपसूचना घ्या.

नाहीतर हा विषय तहकूब ठेवा. विषय प्रशासनाकडून डायरेक्ट येऊ देत. मी पहिल्यांदाच सांगितले आहे की, या चारचाच विषय का केला गेला. सगळ्यांचाच करा. घेताय तर सगळ्यांनाच घ्या. शहरात लॅब टेक्निशियन हे कमीच आहेत. walk in interview ने घ्या. सरळसेवेत घेताच येणार नाहीत. जेवढे घेतले आहेत ते सगळेच घ्या. असे चारच कसे घेता येतील. मा.आयुक्त साहेब, आपण खुलासा करा.

**मा.योगेश बहल-**मा.महापौर साहेब, मा.आयुक्त साहेब, सर्व सन्मा.सभागृह, मा.मंगलाताई कदम यांचे जे म्हणणे आहे, कदाचित मा.सत्तारुढ पक्षनेते यांचे सुद्धा हेच म्हणणे असू शकते. हा सदस्य प्रस्ताव आहे. तो करताना त्या ठिकाणी मा.संतोष कोकणे पण आहेत आणि मा.अश्विनी ताई पण आहेत. अर्थातच विधी समितीने घेतलेला हा निर्णय आहे. आमची धारणा एवढीच आहे की, ऑलरेडी आपला जो काही नेमणूकीबाबतचा विषय आहे तो, शासन दरबारी प्रलंबित आहे. आपला आकृतिबंध मंजूर होऊन येणे अपेक्षित आहे. अशा पद्धतीने हा विषय करायचा की नाही करायचा हे करण्यापेक्षा कोणावरही अन्याय होणार नाही आणि या पद्धतीने आपण चुकीचा ठराव करत तर नाही, याची पण काळजी घ्यावी, एवढीच माझी विनंती आहे.

**मा.एकनाथ पवार**-सन्मा.महापौर साहेब,सन्मा.आयुक्त साहेब,सन्मा.सभागृह,खरेतर टेक्निशियनच्या संदर्भामध्ये हा सदस्य प्रस्ताव आहे. दहा/दहा वर्षे एखादा कर्मचारी त्याठिकाणी काम करतोय. खरेतर यामध्ये एवढेच म्हटले होते की, दहा वर्षे काम केल्यानंतर आपला आकृतीबंध आल्यानंतर दहा वर्षे काम करूनसुद्धा या कर्मचा-यांना नोकरी गमवावी लागेल. म्हणून यासंदर्भात पिंपरी-चिंचवड महानगरपालिकेच्या वैद्यकीय विभागात किमान दहा वर्षे इथे तो असला पाहिजे. प्राधान्याने जेव्हा नवीन आकृतिबंध होईल त्या वेळेस प्राधान्याने 25% आहे या कर्मचा-यांना संधी मिळाली पाहिजे. असा खरा विषय आहे. मला असे वाटते की, वायसीएमच्या संदर्भात सगळ्या सभासदांच्या मनामध्ये खूप पॉझिटिव्ह एनर्जी आहे की,वायसीएम सुधारले पाहिजे. मला असे वाटते की, मा.योगेशभाई बहल, आपल्या सगळ्यांची दिशा एक असेल तर शंभर टक्के सर्वसामान्य माणसाला चांगल्या पद्धतीची सुविधा मिळू शकते. मा.मंगलाताई कदम तुमचे म्हणणे खरे आहे. तुम्ही हा विषय नीट वाचलात तर तुमच्या लक्षात येईल की, यात आत्ता जे काम करतो आहोत, नवीन भरती प्रक्रिया झालीतर नवीन जाहीरात काढलीतर, गेले दहा/पंधरा वर्षांपासून हे कर्मचारी काम करुनसुद्धा त्यांना वंचित रहावे लागेल. आत्ता हे जे कर्मचारी काम करत आहेत, त्यांना या भरती प्रक्रियेमध्ये किमान २५ टक्के तरी प्राधान्य असले पाहीजे. तुम्ही विषय नीट वाचला असता. मला असे वाटतेय की, या विषयासंदर्भात अधिक ऊहापोह न करता, चर्चा न करता हा विषय मंजूर करुन पुढील विषय घेण्यात यावा.

**मा.दत्तात्रय साने-**मा.महापौर साहेब, मला आपल्याला एक विनंती करायची आहे. हा सदस्य प्रस्ताव आहे. जसे आपल्या लोकांनी सांगितले की, आणखीही लोक यात आहेत. हा सदस्य प्रस्ताव असल्यामुळे तो इंप्लीमेंट होणार आहे का. यात अजून दहा/बारा लोक आहेत. त्यांचे व यांचे कॉम्बिनेशन करुन होणार असेलतर ठिक. पण विषय होणार नसेलतर सभागृहाचा वेळ कशासाठी वाया घालवताय. मा.आयुक्त साहेब, आपण याबाबतीत खुलासा करावा. दोन मिनिटांत

हा विषय संपून जाईल. असा कोणीही काहीही प्रस्ताव आणत असेलतर आम्ही सुद्धा असा प्रस्ताव आणू शकतो. आमच्याकडेही दहा पंधरा वर्षे काम केलेले असे लोक आहेत. त्यांना कुठेही अशा पद्धतीने घेतलेले नाही. आम्ही सदस्य प्रस्ताव मांडतो. नियमांत बसत असेलतर आपण सांगावे. आमचा विषय मंजूर करायला विरोध नाही.

**मा.महापौर** – काका, तुम्ही फक्त बोला. विषय मंजूर करायचा का नाही ते माझ्या हातात आहे.

**मा.दत्तात्रय साने-**मा.महापौर साहेब, हो, तुमच्याच हातात आहे. आम्हाला फक्त मा.आयुक्त साहेबांनी खुलासा करुन द्यावा.

**मा.महापौर** – मा.आयुक्त साहेब, आपण या विषयासंदर्भात खुलासा करावा.

**मा.आयुक्त**- सन्मा.महापौर साहेब,सन्मा.सभागृह,आत्ता ज्या विषयासंदर्भात चर्चा होते आहे, त्यासंदर्भात दोन भाग आहेत. एक आमच्याकडून शासनाकडे जो आकृतिबंध प्रलंबित आहे यामध्ये जी प्रस्तावित बाब आहेत त्याच्यामध्ये सुधारणा करण्यासाठी हा विषय ठेवण्यात आलेला आहे. मात्र याच्यातील जो पर्यायी अर्धा भाग आहे, त्यात या चार जणांना नियुक्ती देता येईल किंवा कसे. दहा वर्षे प्रत्यक्ष कामकाजाचा अनुभव आवश्यक, या अटीमध्ये सुधारणा करून दिलेली आहे. हा दहा वर्षांचा प्रत्यक्ष अनुभव योग्य आहे/अयोग्य आहे हा प्रत्येक कँडीडेटच्याबाबतीत पडताळणी केल्यानंतर निश्चित करता येऊ शकेल. आधी हा सेवाप्रवेश नियम मंजूर झाल्यानंतर त्याची अंमलबजावणी होणार आहे. दुसरी गोष्ट, जे लॅब टेक्निशियन कंत्राटी होते, कंत्राटी नियुक्तीसंदर्भात सन्मा.हाय कोर्टाच्या समोर केस असल्यामुळे याबाबतीत आत्ता मी भाष्य करू शकणार नाही. तथापि, याबाबतीत निश्चित सविस्तर कायदेशीर बाबींची पडताळणी केल्याशिवाय, उत्तर कोणाला अपॉईंट करता येईल का नाही याचे निश्चित असं उत्तर आज देता येणार नाही.

**मा.महापौर** – हा विषय मंजूर करण्यात येत आहे.

यानंतर सदर ठराव मतास टाकणेत आला असता -

अनुकूल-८१ प्रतिकूल- ०

अशी मते पडली व सदर ठराव सर्वानुमते मान्य झाल्याचे मा.महापौर यांनी प्रकट केले.

-------

**मा.कोमल मेवानी -** मा.महापौर साहेब, विषय क्रमांक ५वर मी पुढीलप्रमाणे ठराव मांडते.

ठराव क्रमांक - ८८ विषय क्रमांक – ५

दिनांक- १६/१०/२०१७ विभाग- मा.आयुक्त

संदर्भ – १) मा.महापालिका आयुक्त यांचे पत्र क्र.पापु/बक्षेका/टे.क्र.६४५५/७१/२०१७, दि.१०/०९/२०१७

२) मा.विधी समितीकडील ठ.क्र. ३१ दि.६/१०/२०१७

JNNURM अंतर्गत ताथवडे गावाची पाणीपुरवठा योजना राबविणेकामी पाईपलाईन टाकणेचे काम प्रगतीत आहे. सद्यस्थितीत पाईपलाईन टाकणेचे काम ८०% पूर्ण झालेले आहे. उर्वरीत २०% काम चालु आहे. सदरचे २०% काम ऑगस्ट २०१७ अखेरीस पूर्ण होणार आहे. JNNURM अंतर्गत ताथवडे गावाची पाणीपुरवठा योजना राबविणेबाबत ऑटो क्लस्टर, चिंचवड येथे मा.आयुक्त, पिं.चिं.मनपा यांचे अध्यक्षतेखाली दि.१०/०६/२०१७ रोजी सकाळी ११.०० वा. बैठक घेण्यात आली. सदर बैठकीत मा.आयुक्त सो. यांनी JNNURM अंतर्गत ताथवडे गावाची पाणीपुरवठा योजना राबविणेकामी टाकण्यात येणा-या पाईपलाईनच्या रस्ता खोदाईबाबत विशेष परवानगी घेवून दि.३१/०८/२०१७ पर्यंत काम पूर्ण करण्याचे आदेश दिले आहेत. ताथवडे गावाचा विकास आराखडा ६ जानेवारी २०१७ रोजी शासनाने मंजुर केलेला आहे. सदर मंजुर आराखड्यानुसार अद्यापही काही रस्ते मनपाच्या ताब्यात अद्यापपर्यंत न आल्यामुळे व तेथील शिल्लक पाईपलाईन दुसरीकडे टाकावी लागणार आहे. सदरचा प्रभाग क्र.२५ मध्ये निवासी असलेल्या पण वितरण नलिका नसलेल्या ठिकाणी पाईपलाईन टाकणे शक्य आहे. ताथवडे गावातील मंजुर विकास आराखड्याप्रमाणे पण ताब्यात न आलेल्या रस्त्यातील शिल्लक पाईपलाईन सध्याचा प्रभाग क्र.२५ मधील निवासी भागात वितरण नलिका नसलेल्या ठिकाणी दि.३१/०८/२०१७ पर्यंत टाकून काम पूर्ण करणे आवश्यक आहे. तरी JNNURM अंतर्गत ताथवडे गावाची पाणीपुरवठा योजना राबविणेकामी टाकण्यात येणा-या पाईपलाईनच्या कामाची व्याप्ती कमी करुन प्रभाग क्र.२५ मधील निवासी असलेल्या पण वितरण नलिका नसलेल्या ठिकाणी सदरची शिल्लक राहिलेली पाईपलाईन टाकणेस मान्यता देणेत येत आहे.

**मा.नानी उर्फ हिराबाई घुले** – मा.महापौर साहेब, ठरावाला अनुमोदन देते.

यानंतर सदर ठराव मतास टाकणेत आला असता -

अनुकूल-८१ प्रतिकूल- ०

अशी मते पडली व सदर ठराव सर्वानुमते मान्य झाल्याचे मा.महापौर यांनी प्रकट केले.

-------

**मा.शारदा सोनवणे -** मा.महापौर साहेब, विषय क्रमांक ६वर मी पुढीलप्रमाणे ठराव मांडते.

विषय क्रमांक – ६

दिनांक- १६/१०/२०१७ विभाग- मा.आयुक्त

संदर्भ –१) मा.महापालिका आयुक्त यांचे पत्र क्र.प्रशा/११/कावि/८७०/२०१७, दि.०६/१०/२०१७

२) मा.विधी समितीकडील ठ.क्र. ३७ दि.६/१०/२०१७

महाराष्ट्र शासन वित्त विभागाकडील निर्णय क्रमांक:वाहन/१००२/प्र.क्र.७५/२००२ विनियम,दिनांक १३/०३/२००३ व क्रमांक:वाहन-१००५/प्र.क्र.१३/२००५,विनियम, दि.२५ मे २००५ नुसार शासकीय अधिका-यांना स्वत:चे खाजगी वाहन शासकीय कामकाजासाठी वापर अनुज्ञेय करण्याच्या अनुषंगाने प्रशासनाकडून यापूर्वी पेट्रोल,डिझेल वाहन वापरासाठी वाहन

वापर धोरणानुसार प्रतिपूर्ती करण्याबाबत आदेश निर्गत करण्यात आलेले आहेत. तथापि वित्त विभागाकडील शासन निर्णय क्रमांक:वाहन-१००७/प्र.क्र.४८/२००७/विनियम,दि.३१ डिसेंबर २००७ अन्वये सदरची योजना शासनाने बंद केलेली आहे. तथापि महाराष्ट्र शासनाकडील दि. २५ मे २००५ च्या शासन निर्णयानुसार शासकीय अधिका-यांना स्वत:चे खाजगी वाहन शासकीय कामकाजासाठी वापर अनुज्ञेय करणेबाबतची योजना ही पिंपरी चिंचवड महानगरपालिकेच्या दृष्टीने आर्थिक हिताची असल्याने सदर योजनेची महापालिका स्तरावर अंमलबजावणी करावयाची झाल्यास सक्षम प्राधिकरणाच्या मान्यतेने त्याबाबतचे धोरण निश्चित करावे लागणार आहे. पिंपरी चिंचवड महानगरपालिका प्रशासन विभागाकडील वाहन वाटप धोरणानुसार ज्या वर्ग १ व २ च्या अधिका-यांना आणि पदाधिका-यांना मनपाचे वाहन अनुज्ञेय करण्यात आलेले आहे, त्यांना महानगरपालिकेच्या वाहनाऐवजी स्वत:चे खाजगी वाहन ऐच्छिक पध्दतीने शासकीय कामकाजासाठी वापरण्यास व त्यासाठी निश्चित केलेल्या सोबतच्या परिशिष्ट 'अ'प्रमाणे प्रतिपूर्तीची रक्कम अदा करण्याबाबतचे धोरण निश्चित करणेस मान्यता देणेत यावी.

**मा.अनुराधा गोरखे** – मा.महापौर साहेब, ठरावाला अनुमोदन देते.

**मा.आशा धायगुडे-शेंडगे** – मा.महापौर साहेब,मी पुढीलप्रमाणे उपसूचना मांडते - वाहनचालकाचे वेतन,दुरुस्ती,विमा,इंधनखर्च,यामध्ये दरवर्षी दहा ते बारा टक्क्यांची वाढ अपेक्षीत आहे. मात्र ती प्रशासनाचे प्रस्तावात दर्शविण्यात आलेली नाही. तरी दरवर्षी मंजूर वाहन भत्यावर आठ टक्क्यांनी वाढ मंजूर करावी. कार्यालयीन बैठकी वा इतर कार्यालयीन कामाने बाहेरगावी वाहन नेल्यास जादा खर्च होतो. मात्र याबाबत प्रस्तावात उल्लेख नाही, तरी बाहेरगावी वाहन नेल्यास प्रति कि.मी. र.रु.९/- प्रमाणे भत्ता देण्यास व पुढे शासकीय नियमानुसार या भत्त्यात वाढ मंजूर करण्यात यावी. त्याचप्रमाणे प्रस्तावात नमूद वाहनचालकाचे वेतन रु.१५,०००/- दरमहा इतके आहे. शासनाच्या अधिसुचनेनुसार वाढीव दर विचारात घेऊन किमान वेतन दरानुसार वाहनचालकाचे वेतन लागू करण्यात यावे. तसेच वेळोवेळी शासनाच्या निर्देशाप्रमाणे त्यात वाढ करुन ती वेळोवेळी लागू करण्यास मान्यता देण्यात यावी.

**मा.उषा मुंढे** – मा.महापौर साहेब, उपसूचनेला अनुमोदन आहे.

**मा.शारदा सोनवणे** - मा.महापौर साहेब, उपसूचना स्विकारली आहे.

**मा.महापौर** – हा विषय उपसूचनेसहीत मंजूर करण्यात येत आहे.

यानंतर उपसूचनेप्रमाणेचा ठराव मतास टाकणेत आला असता -

ठराव क्रमांक - ८९ विषय क्रमांक – ६

दिनांक- १६/१०/२०१७ विभाग- मा.आयुक्त

संदर्भ –१) मा.महापालिका आयुक्त यांचे पत्र क्र.प्रशा/११/कावि/८७०/२०१७, दि.०६/१०/२०१७

२) मा.विधी समितीकडील ठ.क्र. ३७ दि.६/१०/२०१७

महाराष्ट्र शासन वित्त विभागाकडील निर्णय क्रमांक : वाहन/१००२/प्र.क्र.७५/२००२ विनियम,दिनांक १३/०३/२००३ व क्रमांक:वाहन-१००५/प्र.क्र.१३/२००५,विनियम,दि.२५ मे २००५ नुसार शासकीय अधिका-यांना स्वत:चे खाजगी वाहन शासकीय कामकाजासाठी वापर अनुज्ञेय करण्याच्या अनुषंगाने प्रशासनाकडून यापूर्वी पेट्रोल, डिझेल वाहन वापरासाठी वाहन वापर धोरणानुसार प्रतिपूर्ती करण्याबाबत आदेश निर्गत करण्यात आलेले आहेत. तथापि वित्त विभागाकडील शासन निर्णय क्रमांक:वाहन-१००७/प्र.क्र.४८/२००७/विनियम,दि.३१ डिसेंबर २००७ अन्वये सदरची योजना शासनाने बंद केलेली आहे. तथापि महाराष्ट्र शासनाकडील दि.२५ मे २००५ च्या शासन निर्णयानुसार शासकीय अधिका-यांना स्वत:चे खाजगी वाहन शासकीय कामकाजासाठी वापर अनुज्ञेय करणेबाबतची योजना ही पिंपरी चिंचवड महानगरपालिकेच्या दृष्टीने आर्थिक हिताची असल्याने सदर योजनेची महापालिका स्तरावर अंमलबजावणी करावयाची झाल्यास सक्षम प्राधिकरणाच्या मान्यतेने त्याबाबतचे धोरण निश्चित करावे लागणार आहे. पिंपरी चिंचवड महानगरपालिका प्रशासन विभागाकडील वाहन वाटप धोरणानुसार ज्या वर्ग १ व २ च्या अधिका-यांना आणि पदाधिका-यांना मनपाचे वाहन अनुज्ञेय करण्यात आलेले आहे, त्यांना महानगरपालिकेच्या वाहनाऐवजी स्वत:चे खाजगी वाहन ऐच्छिक पध्दतीने शासकीय कामकाजासाठी वापरण्यास व त्यासाठी निश्चित केलेल्या सोबतच्या परिशिष्ट “अ” प्रमाणे प्रतिपूर्तीची रक्कम अदा करण्याबाबतचे धोरण निश्चित करणेस मान्यता देणेत येत आहे. तसेच वाहनचालकाचे वेतन, दुरुस्ती, विमा, इंधनखर्च, यामध्ये दरवर्षी दहा ते बारा टक्क्यांची वाढ अपेक्षीत आहे. मात्र ती प्रशासनाचे प्रस्तावात दर्शविण्यात आलेली नाही. तरी दरवर्षी मंजूर वाहन भत्यावर आठ टक्क्यांनी वाढ मंजूर करणेस मान्यता देणेत येत आहे. कार्यालयीन बैठकी वा इतर कार्यालयीन कामाने बाहेरगावी वाहन नेल्यास जादा खर्च होतो. मात्र याबाबत प्रस्तावात उल्लेख नाही, तरी बाहेरगावी वाहन नेल्यास प्रति कि.मी. र.रु.९/- प्रमाणे भत्ता देण्यास व पुढे शासकीय नियमानुसार या भत्त्यात वाढ मंजूर करण्यास मान्यता देणेत येत आहे. त्याचप्रमाणे प्रस्तावात नमूद वाहनचालकाचे वेतन रु.१५,०००/- दरमहा इतके आहे. शासनाच्या अधिसुचनेनुसार वाढीव दर विचारात घेऊन किमान वेतन दरानुसार वाहनचालकाचे वेतन लागू करण्यास मान्यता देणेत येत आहे तसेच वेळोवेळी शासनाच्या निर्देशाप्रमाणे त्यात वाढ करुन ती वेळोवेळी लागू करण्यास मान्यता देण्यात येत आहे.

अनुकूल-८१ प्रतिकूल- ०

अशी मते पडली व सदर ठराव सर्वानुमते मान्य झाल्याचे मा.महापौर यांनी प्रकट केले.

-------

**मा.नम्रता लोंढे -** मा.महापौर साहेब,विषय क्रमांक ७वर मी पुढीलप्रमाणे ठराव मांडते.

विषय क्रमांक – ७

दिनांक- १६/१०/२०१७ विभाग- मा.आयुक्त

संदर्भ- १) मा.महापालिका आयुक्त यांचे पत्र क्र.नरवि/कावि/१८/१७५/२०१७, दि.२५/०९/२०१७

२) मा.शहर सुधारणा समितीकडील ठ.क्र.२३ दि.५/१०/२०१७

पिंपरी चिंचवड महानगरपालिकेच्या मंजूर विकास योजनेतील मौजे किवळे येथील स.नं.७१ व ७२ येथील आरक्षण क्र.४/११७-उद्यान या प्रस्तावित आरक्षणाचा विकास करणेकामी मा.नगरसदस्य यांची मागणी आहे. सदरचे उद्यानाचा विकास केल्याने गावातील नागरिक, जेष्ठ नागरिक, महिला व मुलांच्या आरोग्यासाठी सदरचे उद्यान विकसित होणे गरजेचे आहे. मा.नगरसदस्य यांनी मागणी केलेले आ.क्र.४/११७ उद्यान हे विकास नगर, किवळे या परिसरात असून सदर भागात अद्यापि एकही उद्यान विकसित करणेत आलेले नाही. सबब मा.नगररसदस्य यांचे मागणीचे अनुषंगाने नागरिकांचे हितार्थ विकासनगर, किवळे स.नं. ७१ व ७२ मधील आरक्षण क्र.4/117 उद्यान या आरक्षणाखालील जमिनीचे भूसंपादन नविन भूसंपादन अधिनियम २०१३ अन्वये संपादन करणेस मान्यता देणेत यावी.

**मा.माधुरी कुलकर्णी** – मा.महापौर साहेब, ठरावाला अनुमोदन देते.

**मा.निलेश बारणे-**मा.महापौर साहेब,मा.आयुक्त साहेब,सन्मा.सभागृह,मा.पत्रकार,मा.नगरसचिव,ही जागा आज आपण ताब्यात घेत आहोत. ही जागा ताब्यात घेत असताना तरस कुटुंबाचा हा विषय कोर्टामध्ये आहे. मा.महापौर साहेब,हा विषय कोणाच्या अट्टाहासासाठी चालला आहे हे माहित नाही. मला तर असे वाटते की, कुठल्यातरी बिल्डरच्या ठराविक मागणीनुसार, बिल्डरला जायला रोड पाहिजे, त्यासाठी हे आरक्षण ताब्यात घेऊन या रोडची अंमलबजावणी होते आहे. तुम्ही शेतक-यांशी बोलत नाही. शेतक-यांची कोर्टात केस चालू असताना हा कुठला अट्टाहास धरता. मा.महापौर साहेब, माझा या विषयाला विरोध असून मला मतदान हवे आहे. शिवसेना पक्षाच्यावतीने विरोधात मला मतदान हवे आहे. मा.महापौर साहेब, मतदान घ्यावे अशी मी मागणी करतो. भूसंपादन होत नाही. कोर्टामध्ये केस चालू आहे. बहिणीचा आणि भावाचा वाद चालू आहे.

**मा.महापौर** - तुमचे म्हणणे मांडा. मी बोलतो.

**मा.निलेश बारणे-**मा.महापौर साहेब, माझी मागणी मान्य करा, मी खाली बसतो. मतदान घ्या. तुम्हाला विषय मंजूर करायचा आहे तर करा. आमचा या विषयाला विरोध आहे, आमच मतदान घ्या. माझा विरोध नोंदवून घ्या.

**मा.महापौर-** पहिल्यांदा या विषयाचा खुलासा करावा. परिस्थिती काय आहे ती सांगा.

**मा.सिमा सावळे-**सन्मा.महापौर साहेब, आत्ता मला एकच सांगा, त्यांचे आपापसांत कोर्ट मॅटर आहे, त्याच्याशी आपल्याला देणे घेणे नाही. यामध्ये महापालिकेला पार्टी केले आहे का नाही एवढे तुम्ही आम्हाला सांगा.

**मा.ठाकूर (उपसंचालक नगररचना)**- मा.महापौर साहेब,मा.आयुक्त साहेब,सन्मा.सभागृह,सदस्यांनी आत्ता जो प्रश्न उपस्थित केला आहे,आरक्षण क्र.४/११७ उद्यान किवळे इथले दोन हेक्टर क्षेत्र हे विकास योजनेत आरक्षित आहे. त्याचे मा.जिल्हाधिकारी यांच्यामार्फत भूसंपादन करु इच्छितो. कंपल्सरी ॲक्विझिशन असताना कोर्टाचा काही विषय असेलतर सध्यातरी बांधा येणार नाही. मा.कोर्टाच्या आदेशानुसार जी काही पुढची कारवाई होईल ती करण्यात येईल.

**मा.सिमा सावळे-** संबंधित महापालिकेच्या विरोधात कोर्टात आहेत का ते सांगा.

**मा.ठाकूर (उपसंचालक नगररचना)** - ही बाब तपासावी लागेल. सध्या आपल्याला माहित नाही. कुठली स्थगिती नाही.

**मा.निलेश बारणे-** मा.महापौर साहेब, विषय मंजूर करण्याबद्दल वाद नाही. फक्त माझा विरोध नोंदवून घेण्यात यावा.

**मा.महापौर** - मा.निलेश बारणे यांचा विषयाला विरोध नोंदवून घेण्यात येत आहे.

**मा.राहूल जाधव** – मा.महापौर साहेब, मी पुढीलप्रमाणे उपसूचना मांडतो आहे - १) प्रभाग क्रं. २ चिखली मोशी मधील गट नं.५०७ ते गट नं.२४७ हा ३० मी. असलेल्या रोडची भूसंपादन प्रक्रीया करणेस मान्यता देणेत यावी. २) प्रभाग क्र. २ चिखली मोशी मधील रोड मध्ये बाधीत असलेल्या १८ मी. रोडसाठी गट नं. ५२४ ते ६५० गट नं. पर्यंत भूसंपादन प्रक्रीयेस मान्यता देण्यात यावी.

**मा.सागर गवळी** – मा.महापौर साहेब, उपसूचनेला अनुमोदन आहे.

**मा.आशा धायगुडे-शेंडगे**-मा.महापौर साहेब,मा.आयुक्त साहेब,सन्मा.सभागृह, मी पुढीलप्रमाणे उपसूचना मांडते आहे- पिंपरी चिंचवड महानगरपालिकेतील प्रभाग क्र.३० मधील दापोडी परिसरातील अनेक आरक्षणे अविकसीत आहेत. अविकसीत परिसरामुळे तेथे राहणा-या नागरिकांना सुखसुविधांपासून वंचित रहावे लागत आहे. प्रभागातील करदात्या नागरिकांना जास्तीत जास्त सुविधा देण्यासाठी खालील आरक्षनाचे भूसंपादन करुन विकसीत करण्यात यावे.

१) आरक्षण क्रमांक ३/२७ अग्निशामक दलचे

२) आरक्षण क्रमांक ३/५ खेळाचे मैदान

तसेच पिंपरी चिंचवड महानगरपालिका प्रभाग क्र.२० मध्ये कासारवाडी मधील रेल्वेलाईनच्या पुर्वेकडील भागाचा समावेश आहे. सदर भागात असणारे रस्ते अत्यंत कमी रुंदीचे

असल्याने तेथे नेहमी वाहतुकीची समस्या उद्भवत असते तरी सदर भागातील विकास आराखडयातील खालील रस्ते तातडीने भूसंपादन कार्यवाही होऊन विकसित करणेत यावी.

१) पार्श्वनाथ सोसायटी ते मिलिटरी कडेने महाराष्ट्र चौकापर्यंत- रुंदी १२ मी.

२) माजी नगरसदस्या श्रीमती सुरेखा लांडगे यांच्या घराकडे जाणारा रस्ता- रुंदी ७.५० मी.

उपरोक्त रस्ते त्वरीत भूसंपादन करुन विकसित करणेस मान्यता मिळावी.

**मा.उषा मुंढे** – मा.महापौर साहेब, उपसूचनेला अनुमोदन आहे.

**मा.अजित गव्हाणे**-सन्मा.महापौर साहेब, सन्मा.आयुक्त साहेब, सन्मा.सभागृह, पत्रकार मित्र, याठिकाणी सगळ्यांनाच आपापल्या प्रभागांमधील जे डि.पी. रस्ते आहेत,ती आरक्षणे ताब्यात घेण्याची इच्छा असते. आणि त्या अनुषंगाने प्रत्येकजण या ठिकाणी हा ठराव मांडतो. प्रत्यक्षात ही महापालिकेचीच जबाबदारी आहे की, टप्प्याटप्प्याने लोकांच्या ज्या मागण्या असतील त्याप्रमामे टप्प्याटप्प्याने आरक्षणे आपल्या ताब्यात घेऊन ती विकसित केली पाहिजेत. अशा प्रकारची कारवाई खरेतर प्रशासनाच्या वतीने सुरू झाली पाहिजे. या कामासाठी सभागृहात येणे कितपत गरजेचं आहे हे मला माहीत नाही. परंतू मा.आयुक्तसाहेब, याच्यामधे आता एक दिसतेय की, सगळीकडची मागणी मोठ्याप्रमाणात येते आहे आणि मग भूसंपादनासाठी आपला नेमका निधी किती उपलब्ध आहे. आपले पुढचे सगळे विषय तसेच आहेत. या निधीमध्ये इतक्या मोठ्या प्रमाणात आपल्याला भू-संपादन करता येणे पुढील काळामध्ये शक्य आहे का. माझी यानिमित्ताने प्रशासन आणि मा.महापौर साहेब यांना विनंती असेल की, आपण क्रायटेरिया ठरवावा, प्राधान्यक्रम ठरवावा आणि या वर्षात प्रत्येक प्रभागांमधील किती आरक्षणे आपल्याला घेता येतील, किती घ्यायची आहेत आणि टप्प्याटप्प्याने पाच वर्षांमध्ये किती आरक्षणे आपल्याला ताब्यात घेता येतील यापद्धतीने विचार करावा. दुसरी गोष्ट मा.निलेश बारणे यांनी जो मुद्दा याठिकाणी उपस्थित केला. मा.आयुक्तसाहेब, अशी आरक्षणे ब-याच ठिकाणी आहेत आणि अनेक ठिकाणी वाद आहेत. हे वाद होत असताना नगरसेवकांची एवढीच इच्छा असते की, जो खरा जागामालक आहे त्याच्यावर कुठल्याही प्रकारचा अन्याय होऊ नये. मुळातच त्याच्या जागेवर आरक्षण पडल्यामुळे त्याच्यावर एक प्रकारचा अन्याय झालेला असतो. त्याच्यामुळे हे वादविवाद झालेले असतात. याच्यामुळे काय होणार आहे की, जे भूसंपादन आपण केले आहे, त्याच्या मनाने त्याने जर ताब्यात दिले असते तर त्याला जो जास्तीचा मोबदला मिळाला असता, तो या निमित्ताने त्याला मिळणार नाही. जर जागामालकाने महापालिकेला कुठल्याप्रकारची नोटीस पाठवली नसेल तर, भूसंपादन झाल्यावर ते पैसे ट्रेझरीत पडून राहतील. त्यामुळे माझी संबंधित नगरसेवकांना विनंती असेल की, कारण हा विषय किवळे भागातला आहे. त्यामुळे त्या भागातल्या नगरसेवकांना विनंती असेल की, तुम्ही जर त्या संबंधित जागा मालकाशी बोलणी केली, त्यांच्यात सेटलमेंट केलेतर, निश्चितपणे त्या जागा मालकांच्यामध्ये जो वाद असेल तो मिटू शकेल. त्याच्यातून मार्ग निघू शकतो आणि त्यांना जास्तीचा चांगला मोबदला मिळू शकतो. परंतू मा.आयुक्तसाहेब, नुसत्या या भूसंपादनाच्या निधीतून एवढ्या मोठ्या प्रमाणात आपला जो डी.पी. प्लॅन आहे, त्याची अंमलबजावणी आपल्याला लगेच करता येणार नाही. त्यामुळे तुम्हाला प्राधान्यक्रम ठरवावा लागेल. टीडीआरच्या बाबतीत आपण खूप चांगले धोरण राबवता आहात. प्रत्येक महिन्यामध्ये बैठका घेता आहात. त्याच्यामुळे सगळी प्रकरणे मार्गी लागत आहेत.

त्यामुळे येत्या काळात अशा कारवाईमुळे जर टीडीआरच्या मोबदल्यात मिळालं तर चांगलेच आहे. पण टिडीआर नसेलतर खाजगी वाटाघाटीने ताबा घेता येऊ शकतो. भूसंपादनाची प्रक्रिया मुळातच एवढी लेंदी आहे की, एका फाईलसाठी आपल्याला इतक्या वेळा त्याच्यासाठी पळायला लागते. आत्ताशी ही सुरुवात आहे परंतु हि आरक्षणे ताब्यात येण्यासाठी खूप वेळ लागणार आहे. त्या सदस्याला तो फॉलो-अप घेतल्याशिवाय हे लक्षात येणार नाही. म्हणून मा.आयुक्तसाहेब, याच्यामधे माझी सूचना आहे की, हे सगळं करत असताना तिथल्या शेतक-यावर, तिथल्या जागामालकावर कुठल्याही प्रकारचा अन्याय होऊ नये, अशा प्रकारचा मार्ग त्यातून काढावा ही विनंती.

**मा.नम्रता लोंढे** – मा.महापौर साहेब, उपसूचना स्विकारल्या आहेत.

**मा.एकनाथ पवार** – मा.महापौर साहेब, हा विषय मंजूर करण्यात यावा.

**मा.महापौर** - सदस्य मा.निलेश बारणे यांचा विरोध नोंदवून उपसूचनेसह हा विषय मंजूर करण्यात येत आहे.

यानंतर उपसूचनेप्रमाणेचा दुरुस्त ठराव मतास टाकणेत आला असता –

ठराव क्रमांक – ९० विषय क्रमांक – ७
दिनांक- १६/१०/२०१७ विभाग- मा.आयुक्त

संदर्भ- १) मा.महापालिका आयुक्त यांचे पत्र क्र.नरवि/कावि/१८/१७५/२०१७, दि.२५/०९/२०१७
२) मा.शहर सुधारणा समितीकडील ठ.क्र.२३ दि.५/१०/२०१७

पिंपरी चिंचवड महानगरपालिकेच्या मंजूर विकास योजनेतील मौजे किवळे येथील स.नं.७१ व ७२ येथील आरक्षण क्र.४/११७-उद्यान या प्रस्तावित आरक्षणाचा विकास करणेकामी मा.नगरसदस्य यांची मागणी आहे. सदरचे उद्यानाचा विकास केल्याने गावातील नागरिक, जेष्ठ नागरिक, महिला व मुलांच्या आरोग्यासाठी सदरचे उद्यान विकसित होणे गरजेचे आहे. मा.नगरसदस्य यांनी मागणी केलेले आ.क्र.४/११७ उद्यान हे विकास नगर, किवळे या परिसरात असून सदर भागात अद्यापि एकही उद्यान विकसित करणेत आलेले नाही. सबब मा.नगररसदस्य यांचे मागणीचे अनुषंगाने नागरिकांचे हितार्थ विकासनगर, किवळे स.नं. ७१ व ७२ मधील आरक्षण क्र.4/117 उद्यान या आरक्षणाखालील जमिनीचे भूसंपादन नविन भूसंपादन अधिनियम २०१३ अन्वये संपादन करणेस मान्यता देणेत येत आहे. तसेच १) प्रभाग क्रं. २ चिखली मोशी मधील गट नं.५०७ ते गट नं.२४७ हा ३० मी. असलेल्या रोडची भूसंपादन प्रक्रीया करणेस मान्यता देणेत येत आहे. २) प्रभाग क्र.२ चिखली मोशी मधील रोडमध्ये बाधीत असलेल्या १८ मी. रोडसाठी गट नं.५२४ ते ६५० गट नं. पर्यंत भूसंपादन प्रक्रीयेस मान्यता देणेत येत आहे. तसेच पिंपरी चिंचवड महानगरपालिकेतील प्रभाग क्र. ३० मधील दापोडी परिसरातील अनेक आरक्षणे अविकसीत आहेत. अविकसीत परिसरामुळे तेथे राहणा-या नागरिकांना

सुखसुविधांपासून वंचित राहवे लागत आहे. प्रभागातील करदात्यां नागरिकांना जास्तीत जास्त सुविधा देण्यासाठी खालील आरक्षनाचे भूसंपादन करुन विकसीत करण्यास मान्यता देणेत येत आहे.

१) आरक्षण क्रमांक ३/२७ अग्निशामक दलचे

२) आरक्षण क्रमांक ३/५ खेळाचे मैदान

तसेच पिंपरी चिंचवड महानगरपालिका प्रभाग क्र. २० मध्ये कासारवाडी मधील रेल्वेलाईनच्या पुर्वेकडील भागाचा समावेश आहे. सदर भागात असणारे रस्ते अत्यंत कमी रुंदीचे असल्याने तेथे नेहमी वाहतुकीची समस्या उद्भवत असते तरी सदर भागातील विकास आराखडयातील खालील रस्ते तातडीने भूसंपादन कार्यवाही होऊन विकसित करणेस मान्यता देणेत येत आहे.

१) पार्श्वनाथ सोसायटी ते मिलिटरी कडेने महाराष्ट्र चौकापर्यंत- रुंदी १२ मी.

२) माजी नगरसदस्या श्रीमती सुरेखा लांडगे यांच्या घराकडे जाणारा रस्ता- रुंदी ७.५० मी.

उपरोक्त रस्ते त्वरीत भूसंपादन करुन विकसित करणेस मान्यता देणेत येत आहे.

अनुकूल-८० प्रतिकूल- ०१

अशी मते पडली व सदर ठराव बहुमताने मान्य झाल्याचे मा.महापौर यांनी प्रकट केले.

-------

**मा.बाळासाहेब ओव्हाळ** – मा.महापौर साहेब, विषय क्रमांक ८वर मी पुढीलप्रमाणे ठराव मांडतो.

विषय क्रमांक – ८

दिनांक- १६/१०/२०१७ विभाग- मा.आयुक्त

संदर्भ- १) मा.महापालिका आयुक्त यांचे पत्रक्र.नरवि/कावि/१८/१७६/ २०१७, दि.२५/०९/२०१७

२) मा.शहर सुधारणा समितीकडील ठ.क्र.२४ दि.५/१०/२०१७

पिंपरी चिंचवड महानगरपालिकेच्या मंजूर विकास योजनेतील मौजे किवळे येथील स.नं. ४० येथील आ.क्र.४/१२२- दवाखाना व प्रसुतिगृह (DMH) या प्रस्तावित आरक्षणाचा विकास करणेकामी मा.नगरसदस्य यांची मागणी आहे. सदर आरक्षण क्र.४/१२२- दवाखाना व प्रसुतिगृह (DMH) या आरक्षणाचा विकास गावातील नागरिक, जेष्ठ नागरिक, महिला व मुलांच्या आरोग्यासाठी होणे गरजेचे आहे. मा.नगरसदस्य यांनी मागणी केलेले आरक्षण क्र.४/१२२ - दवाखाना व प्रसुतिगृह (DMH) हे आरक्षण विकास नगर, किवळे या परिसरात असून सदर भागात महानगरपालिकेतर्फे आरोग्य विषयक सुविधा विकसित करणेत आलेली नाही. सबब मा.नगररसदस्य यांचे मागणीचे अनुषंगाने नागरिकांचे हितार्थ विकासनगर, किवळे स.नं.४० मधील आरक्षण क्र. ४/१२२- दवाखाना व प्रसुतिगृह (DMH) या आरक्षणाखालील जमिनीचे भूसंपादन नविन भूसंपादन अधिनियम २०१३ अन्वये संपादन करणेस मान्यता देणेस तसेच मौजे बो-हाडेवाडी येथील खालील मंजूर विकास योजनेतील रस्ते व आरक्षणाचे भूसंपादन करणे आवश्यक आहे.

१) मौजे बो-हाडेवाडी हद्द ग.नं.१३३३ ते ग.नं.१३९० पर्यंत पुणे-नाशिक ६० मी. रस्त्यापर्यंतचा मंजूर विकास योजनेतील १८ मी. रस्ता भूसंपादन करणे.

२) मौजे बो-हाडेवाडी येथील ग.नं.१०७०, १०२२, १०६२, १०७७, १०७६, १०७८, १०७९, १०८०, १०५९, १०३३, १०२४, १०३५, १०७०, १०७१, १०७२, १०७३, १०७४, १०७५ येथील मंजूर विकास योजनेतील ७.५ मी. रस्ता व १२ मी.रस्ता भूसंपादन करणे.

३) मौजे बो-हाडेवाडी येथील संत सावतामाळी नगर येथील ग.नं.१०६२, १०२३, १०२६, १०२५, मधील १२ मी.रस्ता भूसंपादन करणे.

४) मौजे बो-हाडेवाडी येथील ग.नं.१२१८ पासून ते ग.नं. १२५१ पर्यंत मंजूर विकास योजनेतील १८ मी. रस्ता भूसंपादन करणे.

५) मौजे बो-हाडेवाडी हद्द ग.नं.१३२७ पासून ते ग.नं. १३९० पर्यंत पुणे-नाशिक ६० मी. रस्त्यापर्यंतचा मंजूर विकास योजनेतील २४ मी. रस्ता भूसंपादन करणे.

६) मौजे बो-हाडेवाडी मधील ग.नं.१३८८, ग.नं.१३८९ व ग.नं.१३७५ मधील मंजूर विकास योजनेतील आरक्षण क्रमांक १/१६६ उद्यान याचे भूसंपादन करणे.

७) मौजे बो-हाडेवाडी मधील ग.नं.१२३३, ग.नं.१२३२, ग.नं.१२२८ व ग.नं.१२२४ मधील मंजूर विकास योजनेतील आरक्षण क्रमांक १/१५४ प्राथमिक शाळा याचे भूसंपादन करणे.

८) मौजे बो-हाडेवाडी मधील ग.नं.१२७४, ग.नं.१२७३, ग.नं.१२७०, ग.नं.१२६९, ग.नं.१२६८, व ग.नं.१२७२ मधील मंजूर विकास योजनेतील आरक्षण क्रमांक १/१५५ उद्यान याचे भूसंपादन करणे.

९) मौजे बो-हाडेवाडी मधील ग.नं.७७५, ग.नं.७७४, ग.नं.७७३ व ग.नं.७७६ मधील मंजूर विकास योजनेतील आरक्षण क्रमांक १/१८२ प्राथमिक शाळा याचे भूसंपादन करणे.

१०) मौजे बो-हाडेवाडी मधील ग.नं.१३८७, मधील मंजूर विकास योजनेतील आरक्षण क्रमांक १/१६७ प्राथमिक शाळा याचे भूसंपादन करणे.

११) प्रभाग क्र.२७ तापकीरनगर, रहाटणी भागातील स.नं.१२३, १२४, व १२५ मधील उद्यानाचे आरक्षणाचे भूसंपादन करणे.

उपरोक्त प्रस्तावित प्रयोजनाखालील जमीन महाराष्ट्र प्रादेशिक व नगररचना अधिनियम व नविन भूसंपादन अधिनियम २०१३ अन्वये संपादन करणेकामी सदर आरक्षणांचा भूसंपादन प्रस्ताव मा.जिल्हाधिकारी, पुणे यांचेकडे पाठविणेकरीता मा.महापालिका सभेची मान्यता घेणे आवश्यक आहे. तरी प्रस्तुत जमिनीचे महाराष्ट्र प्रादेशिक व नगररचना अधिनियम १९६६ चे कलम १२६ व भूसंपादन पुनर्वसन व पुनर्वसाहत करताना वाजवी नुकसान भरपाई मिळण्याचा आणि पारदर्शकता राखण्याचा हक्क अधिनियम-२०१३ (नविन भूसंपादन कायदा २०१३) अन्वये तातडीने संपादन करणेकामी मा.महापालिका सभेची मान्यता घेणे आवश्यक असल्याने सदर भूसंपादन प्रस्ताव मा.जिल्हाधिकारी,यांचेकडे पाठविणेकरीता व सदर भूसंपादनास येणा-या खर्चास मान्यता व अदा करणेकामी मा.आयुक्त यांना अधिकार प्रदान करणेस मान्यता देणेत येत आहे.

**मा.बाबू नायर** – मा.महापौर साहेब, ठरावाला अनुमोदन देतो.

**मा.आशा धायगुडे-शेंडगे**-मा.महापौर साहेब,मा.आयुक्त साहेब,सन्मा.सभागृह,मी पुढीलप्रमाणे उपसूचना मांडते आहे - पिंपरी चिंचवड मनपाच्या विकास आराखडयातील तिरुपती चौक ते पुणे-नाशिक महामार्ग जोडणारा सर्वे नं. ९४,९५ च्या मनपाच्या हद्दीतील (अंदाजे ३५० मी.) रस्ता विकसीत करण्यासाठी आवश्यक असणा-या जागेचे भूमीसंपादन करणेस मान्यता देणेत यावी. तसेच पिंपरी चिंचवड शहराच्या जुन्या हद्दीच्या सुधारित मंजूर विकास योजना यामधील मुंबई-पुणे लोहमार्ग व इंडीयन कार्ड क्लोथींग लि.कंपनी यांच्या मधील १२.०० मी. रुंद रस्ता हा मुंबई- पुणे महामार्गावर सुरु असलेल्या पुणे मेट्रो प्रकल्पामुळे दररोज होणा-या वाहतूक कोंडीसाठी पर्यायी रस्ता म्हणून विकसीत करणे आवश्यक आहे. तरी मौजे पिंपरी वाघेरे येथील स.नं.१८९ पै.,१९० पै.,१९१ पै. यासी सिस.नं.४८५६/१ पै., ४८५६ पै. व ४८५४ पै. या मिळकतीमधून जाणारा सदरचा १२.०० मी.रुंद रस्त्याचे भूसंपादन नविन भूसंपादन २०१३ चे कायदयान्वये करणेस मान्यता देणेत यावी. तसेच प्रभाग क्र.१ चिखली येथील मंजूर विकास योजनेत विविध आरक्षणे आहेत. सदर आरक्षणे नागरिकांना सोईसुविधा देणेकरीता मनपाच्या ताब्यात घेणे आवश्यक असल्याने खालील डिपी रस्त्यांच्या जागा ताब्यात घेणेची कार्यवाही प्रस्तावीत करणेत यावी.

| अ.क्र. | कामाचे नाव |
|---|---|
| १ | प्रभाग क्र. १ चिखली येथील साने चौक ते चिखली चौक ३०/२४ मी. डि.पी. रस्ता विकसीत करणे. |
| २ | प्रभाग क्र. १ चिखली येथील सोनवणेवस्ती ते चिखली चौक २४ मी. डि.पी.रस्ता विकसीत करणे. |
| ३ | प्रभाग क्र. १ चिखली येथील अनाथ आश्रम ते देहु आळंदी रस्त्याला मिळणारा ३० मी. डि.पी.रस्ता विकसीत करणे. |
| ४ | प्रभाग क्र. १ चिखली मध्ये चिखली चौक ते स्मशानभूमीकडे जाणारा २४ मी. डि.पी.रस्ता विकसीत करणे. |
| ५ | प्रभाग क्र. १ चिखली येथील देहु आळंदी रस्ता ते धर्मराजनगरकडे जाणारा १८.०० मी.डि.पी. रस्ता विकसीत करणे. |
| ६ | प्रभाग क्र. १ तळवडे, चिखली – तळवडे हद्दीवरील २४ मी. शिवेचा डि.पी.रस्ता विकसीत करणे. |

तरी उपरोक्त प्रस्तावित प्रयोजनाखालील जमिन महाराष्ट्र प्रादेशिक व नगररचना अधिनियम १९६६ चे कलम १२६ व भूमीसंपादन पुनर्वसन व पुनर्वसाहत करताना वाजवी नुकसान भरपाई मिळण्याचा आणि पारदर्शकता राखण्याचा हक्क अधिनियम २०१३ (नविन भूसंपादन कायदा २०१३) अन्वये तातडीने भूसंपादन करणेस मान्यता देणेत यावी. सदर भूसंपादन प्रस्ताव मा. जिल्हाधिकारी पुणे यांचेकडे पाठविणेकरिता व सदर भुसंपादनास येणा-या खर्चास मान्यता व अदा करणेकामी मा.आयुक्त यांना अधिकार प्रदान करणेस मान्यता देणेत यावी.

**मा.उषा मुंढे** - मा.महापौर साहेब, उपसूचनेला अनुमोदन आहे.

**मा.सारीका लांडगे**-मा.महापौर साहेब,मा.आयुक्त साहेब, मा.नगरसचिव,सर्व नगरसेवक नगरसेविका आणि अधिकारी,माझ्या प्रभाग क्र.०६ मध्ये, २००७ मध्ये जी व्यायाम शाळा बांधलेली आहे, महापालिकेने ही व्यायामशाळा अजूनही ताब्यात घेतलेली नाही. याचा खुलासा करावा. ही व्यायामशाळा त्या जागामालकाकडून अजूनही ताब्यात का घेण्यात आलेली नाही याचा खुलासा करावा.

**मा.महापौर** – आत्ता तो विषय नाही. पण या विषयाची चौकशी करायला सांगतो.

**मा.दत्तात्रय साने**– सन्मा.महापौर साहेब, सन्मा.आयुक्त साहेब, सन्मा.सभागृह,पत्रकार मित्र, मा.आशा धायगुडे-शेंडगे यांनी,चिखली संदर्भात जी उपसूचना वाचली आहे. तसेच प्र.क्र.१ बाबत दोन/तीन उपसूचना वाचल्या आहेत. त्या सविस्तर वाचाव्यात.

**मा.पंकज भालेकर** – मा.महापौर साहेब, मा.आयुक्त साहेब, सर्व सन्मा.सभागृह, विषय क्रमांक ८ साठी मी पुढीलप्रमाणे उपसूचना मांडतो – देहू ते आळंदी या ३० मी. जोडणा-या विकास आराखडयातील रस्त्यावरील वाहतुक वाढली असून त्यामुळे तळवडे चौक व गावठाण परिसरामध्ये दररोज वाहतूक कोंडी होत आहे. त्यामुळे तळवडे व चिखली या दोन्ही गावच्या शिवेवरील २४ मी. रस्ता व पुढे नदीकडेने १२ मी.रस्त्याने वाहतूक वळवुन चाकण/तळेगाव रस्त्याकडे जोडणा-या पुलापर्यंत रस्ता करणे आवश्यक आहे. तरी देहू आळंदी रस्ता गट नं. ६० पासुन गट नं. २५ पर्यंत २४ मी. व पुढे गट नं. २५ पासून गट नं. १३, १४, १६, १८, ते २४, २५ पर्यंत जोडणा-या १२ मी. रस्त्याचे भूसंपादन नवीन भूसंपादन २०१३ चे कायदयान्वये करणेस मान्यता देणेत यावी.

**मा.प्रविण भालेकर**- मा.महापौर साहेब, उपसूचनेला अनुमोदन आहे.

**मा.बाळासाहेब ओव्हाळ-**मा.आशा धायगुडे-शेंडगे आणि मा.पंकज भालेकर यांनी मांडलेली उपसूचना स्विकारली आहे.

**मा.राहूल कलाटे-**मा.महापौर साहेब,मा.आयुक्त साहेब, विषय क्र.७ आणि ८, हे दोन्ही जवळजवळ भूसंपादनाचेच विषय आहेत. सध्या शहरातील टीडीआरची परिस्थिती पाहता भूसंपादनाचे विषय वाढत आहेत. आणि हे वाढत असताना साहेब, आपण आता केएसबी चौक ते हिंजवडी बी.आर.टी. रोडवर फेज करतोय. शेतक-यांचे पैसे अजूनही भूसंपादन विभागाकडून दिले जात नाही आहेत. तुम्ही स्वतः फॉलोअप करताय,आम्हीही फॉलोअप करतोय. असे असताना आपण एवढ्या मोठ्या प्रमाणावर भूसंपादन करताय. निश्चितच भूसंपादन केल्यामुळे शेतकरी पुढे येतील किंवा जर त्यातला दृष्टीकोन वेगळा असेलतर,त्यामुळे शहरातील आरक्षणे विकसित होतील. आणि त्यामुळे महानगर पालिकेतील सर्वात जास्त आरक्षणे डेव्हलप होत आहेत. फक्त हे करत असताना आपण शेतक-यांना टीडीआरच्या बदल्यात असेल किंवा भूसंपादनाच्या बदल्यात पैसे दिलेतर जमिनीचे रेट पाहता आपण डबल देतो. एवढ्या मोठ्या प्रमाणात निधी उपलब्ध करून आपण ती पुढची प्रक्रिया सुरळीत करावी. संत तुकारामनगरमध्ये गेल्यानंतर एक-एक शेतकरी तिथे दहा-दहा दिवस बसतो. पुण्यात भूसंपादन

अधिकारी तानाजी गटकेचे काय झाले. ज्याची जमीन जातेय,त्याचे भूसंपादनाचे पैसे येत आहेत. त्याच्याकडेच जर आपण अशाप्रकारे पैशांची मागणी करत असाल. भ्रष्टाचार निर्मूलनच्या अधिका-यांनी त्याला पकडला देखील. कुठल्याही माणसाला आपली जागा आरक्षणात जावी असे वाटत नाही. तरीदेखील आपण भूसंपादनाचा प्रस्ताव करताय. आपण त्या शेतक-यांना विश्वासात घ्या आणि ही प्रक्रिया सुरळीत करा. एवढेच मी याठिकाणी सभागृहात व्यक्त करतो.

**मा.महापौर**-मा.लांडगे ताई,आपण मांडलेल्या विषयासंदर्भातील माहिती आत्ता अधिका-यांकडे उपलब्ध नाही. मा.आशाताई धायगुडे-शेंडगे यांनी मांडलेल्या उपसूचनेसह विषय मंजूर करण्यात येत आहे.

**मा.दत्तात्रय साने**-मा.महापौर साहेब, माझ्या वॉर्डातला विषय आहे. उपसूचना वाचू द्यात.

**मा.महापौर** – तुम्ही वाचलेलं ऐकल नाही का, आम्ही ऐकलय.

**मा.दत्तात्रय साने**-मा.महापौर साहेब, माझा विरोध नोंदवून घ्या.

**मा.महापौर** – सदस्य मा.दत्ता काका साने यांचा विरोध नोंदवून हा विषय मंजूर करण्यात येत आहे.

यानंतर उपसूचनेप्रमाणेचा ठराव मतास टाकणेत आला असता –

ठराव क्रमांक – ९१ विषय क्रमांक – ८
दिनांक- १६/१०/२०१७ विभाग- मा.आयुक्त

संदर्भ- १) मा.महापालिका आयुक्त यांचे पत्र क्र.नरवि/कावि/१८/१७६/२०१७, दि.२५/०९/२०१७
२) मा.शहर सुधारणा समितीकडील ठ.क्र.२४ दि.५/१०/२०१७

पिंपरी चिंचवड महानगरपालिकेच्या मंजूर विकास योजनेतील मौजे किवळे येथील स.नं. ४० येथील आ.क्र. ४/१२२ – दवाखाना व प्रसुतिगृह (DMH) या प्रस्तावित आरक्षणाचा विकास करणेकामी मा.नगरसदस्य यांची मागणी आहे. सदर आरक्षण क्र.४/१२२- दवाखाना व प्रसुतिगृह (DMH) या आरक्षणाचा विकास गावातील नागरिक, जेष्ठ नागरिक, महिला व मुलांच्या आरोग्यासाठी होणे गरजेचे आहे. मा.नगरसदस्य यांनी मागणी केलेले आरक्षण क्र.४/१२२ - दवाखाना व प्रसुतिगृह (DMH) हे आरक्षण विकास नगर, किवळे या परिसरात असून सदर भागात महानगरपालिकेतर्फे आरोग्य विषयक सुविधा विकसित करणेत आलेली नाही. सबब मा.नगरररसदस्य यांचे मागणीचे अनुषंगाने नागरिकांचे हितार्थ विकासनगर, किवळे स.नं.४० मधील आरक्षण क्र. ४/१२२ – दवाखाना व प्रसुतिगृह (DMH) या आरक्षणाखालील जमिनीचे भूसंपादन नविन भूसंपादन अधिनियम २०१३ अन्वये संपादन करणेस मान्यता देणेस तसेच

मौजे बो-हाडेवाडी येथील खालील मंजूर विकास योजनेतील रस्ते व आरक्षणाचे भूसंपादन करणे आवश्यक आहे.

१) मौजे बो-हाडेवाडी हद्द ग.नं.१३३३ ते ग.नं.१३९० पर्यंत पुणे-नाशिक ६० मी. रस्त्यापर्यंतचा मंजूर विकास योजनेतील १८ मी. रस्ता भूसंपादन करणे.

२) मौजे बो-हाडेवाडी येथील ग.नं.१०७०, १०२२, १०६२, १०७७, १०७६, १०७८, १०७९, १०८०, १०५९, १०३३, १०२४, १०३५, १०७०, १०७१, १०७२, १०७३, १०७४, १०७५ येथील मंजूर विकास योजनेतील ७.५ मी. रस्ता व १२ मी.रस्ता भूसंपादन करणे.

३) मौजे बो-हाडेवाडी येथील संत सावतामाळी नगर येथील ग.नं.१०६२, १०२३, १०२६, १०२५, मधील १२ मी.रस्ता भूसंपादन करणे.

४) मौजे बो-हाडेवाडी येथील ग.नं.१२१८ पासून ते ग.नं. १२५१ पर्यंत मंजूर विकास योजनेतील १८ मी. रस्ता भूसंपादन करणे.

५) मौजे बो-हाडेवाडी हद्द ग.नं.१३२७ पासून ते ग.नं. १३९० पर्यंत पुणे-नाशिक ६० मी. रस्त्यापर्यंतचा मंजूर विकास योजनेतील २४ मी. रस्ता भूसंपादन करणे.

६) मौजे बो-हाडेवाडी मधील ग.नं.१३८८, ग.नं.१३८९ व ग.नं.१३७५ मधील मंजूर विकास योजनेतील आरक्षण क्रमांक १/१६६ उद्यान याचे भूसंपादन करणे.

७) मौजे बो-हाडेवाडी मधील ग.नं.१२३३, ग.नं.१२३२, ग.नं.१२२८ व ग.नं.१२२४ मधील मंजूर विकास योजनेतील आरक्षण क्रमांक १/१५४ प्राथमिक शाळा याचे भूसंपादन करणे.

८) मौजे बो-हाडेवाडी मधील ग.नं.१२७४, ग.नं.१२७३, ग.नं.१२७०, ग.नं.१२६९, ग.नं.१२६८, व ग.नं.१२७२ मधील मंजूर विकास योजनेतील आरक्षण क्रमांक १/१५५ उद्यान याचे भूसंपादन करणे.

९) मौजे बो-हाडेवाडी मधील ग.नं.७७५, ग.नं.७७४, ग.नं.७७३ व ग.नं.७७६ मधील मंजूर विकास योजनेतील आरक्षण क्रमांक १/१८२ प्राथमिक शाळा याचे भूसंपादन करणे.

१०) मौजे बो-हाडेवाडी मधील ग.नं.१३८७, मधील मंजूर विकास योजनेतील आरक्षण क्रमांक १/१६७ प्राथमिक शाळा याचे भूसंपादन करणे.

११) प्रभाग क्र.२७ तापकीरनगर, रहाटणी भागातील स.नं.१२३, १२४, व १२५ मधील उद्यानाचे आरक्षणाचे भूसंपादन करणे.

उपरोक्त प्रस्तावित प्रयोजनाखालील जमीन महाराष्ट्र प्रादेशिक व नगररचना अधिनियम व नविन भूसंपादन अधिनियम २०१३ अन्वये संपादन करणेकामी सदर आरक्षणांचा भूसंपादन प्रस्ताव मा.जिल्हाधिकारी, पुणे यांचेकडे पाठविणेकरीता मा.महापालिका सभेची मान्यता घेणे आवश्यक आहे. तरी प्रस्तुत जमिनीचे महाराष्ट्र प्रादेशिक व नगररचना अधिनियम १९६६ चे कलम १२६ व भूसंपादन पुनर्वसन व पुनर्वसाहत करताना वाजवी नुकसान भरपाई मिळण्याचा आणि पारदर्शकता राखण्याचा हक्क अधिनियम–२०१३ (नविन भूसंपादन कायदा २०१३) अन्वये तातडीने संपादन करणेकामी मा.महापालिका सभेची मान्यता घेणे आवश्यक असल्याने सदर भूसंपादन प्रस्ताव मा.जिल्हाधिकारी, यांचेकडे पाठविणेकरीता व सदर भूसंपादनास येणा-या खर्चास मान्यता व अदाकरणेकामी मा.आयुक्त यांना अधिकार प्रदान करणेस मान्यता देणेत येत आहे. तसेच पिंपरी चिंचवड मनपाच्या विकास आराखडयातील तिरुपती चौक ते पुणे-नाशिक महामार्ग जोडणारा सर्वे नं.९४,९५ च्या मनपाच्या हद्दीतील (अंदाजे ३५० मी.) रस्ता विकसीत

करण्यासाठी आवश्यक असणा-या जागेचे भूमीसंपादन करणेस मान्यता देणेत येत आहे. तसेच पिंपरी चिंचवड शहराच्या जुन्या हद्दीच्या सुधारित मजूर विकास योजना यामधील मुंबई-पुणे लोहमार्ग व इंडीयन कार्ड क्लोथींग लि.कंपनी यांच्या मधील १२.०० मी. रुंद रस्ता हा मुंबई-पुणे महामार्गावर सुरु असलेल्या पुणे मेट्रो प्रकल्पामुळे दररोज होणा-या वाहतूक कोंडीसाठी पर्यायी रस्ता म्हणून विकसीत करणे आवश्यक आहे. तरी मौजे पिंपरी वाघेरे येथील स.नं. १८९ पै.,१९० पै.,१९१ पै यासी सिस.नं.४८५६/१ पै., ४८५६ पै. व ४८५४ पै. या मिळकतीमधून जाणारा सदरचा १२.०० मी.रुंद रस्त्याचे भूसंपादन नविन भूसंपादन २०१३ चे कायदयान्वये करणेस मान्यता देणेत येत आहे. तसेच प्रभाग क्र. १ चिखली येथील मंजूर विकास योजनेत विविध आरक्षणे आहेत सदर आरक्षणे नागरिकांना सोईसुविधा देणेकरीता मनपाच्या ताब्यात घेणे आवश्यक असल्याने खालील डिपी रस्त्यांच्या जागा ताब्यात घेणेची कार्यवाही प्रस्तावीत करणेस मान्यता देणेत येत आहे.

| अ.क्र. | कामाचे नाव |
|---|---|
| १ | प्रभाग क्र. १ चिखली येथील साने चौक ते चिखली चौक ३०/२४ मी. डि.पी. रस्ता विकसीत करणे. |
| २ | प्रभाग क्र. १ चिखली येथील सोनवणेवस्ती ते चिखली चौक २४ मी. डि.पी.रस्ता विकसीत करणे. |
| ३ | प्रभाग क्र. १ चिखली येथील अनाथ आश्रम ते देहु आळंदी रस्त्याला मिळणारा ३० मी. डि.पी.रस्ता विकसीत करणे. |
| ४ | प्रभाग क्र. १ चिखली मध्ये चिखली चौक ते स्मशानभूमीकडे जाणारा २४ मी. डि.पी.रस्ता विकसीत करणे. |
| ५ | प्रभाग क्र. १ चिखली येथील देहु आळंदी रस्ता ते धर्मराजनगरकडे जाणारा १८.०० मी.डि.पी. रस्ता विकसीत करणे. |
| ६ | प्रभाग क्र. १ तळवडे, चिखली – तळवडे हद्दीवरील २४ मी. शिवेचा डि.पी.रस्ता विकसीत करणे. |

तरी उपरोक्त प्रस्तावित प्रयोजनाखालील जमिन महाराष्ट्र प्रादेशिक व नगररचना अधिनियम १९६६ चे कलम १२६ व भूमीसंपादन पुनर्वसन व पुनर्वसाहत करताना वाजवी नुकसान भरपाई मिळण्याचा आणि पारदर्शकता राखण्याचा हक्क अधिनियम २०१३ (नविन भूसंपादन कायदा २०१३) अन्वये तातडीने भूसंपादन करणेस मान्यता देणेत येत आहे सदर भूसंपादन प्रस्ताव मा. जिल्हाधिकारी पुणे यांचेकडे पाठविणेकरिता व सदर भुसंपादनास येणा-या खर्चास मान्यता व अदा करणेकामी मा.आयुक्त यांना अधिकार प्रदान करणेस मान्यता देणेत येत आहे. तसेच देहू ते आळंदी या ३० मी. जोडणा-या विकास आराखडयातील रस्त्यावरील वाहतुक वाढली असून त्यामुळे तळवडे चौक व गावठाण परिसरामध्ये दररोज वाहतूक कोंडी होत आहे. त्यामुळे तळवडे व चिखली या दोन्ही गावच्या शिवेवरील २४ मी. रस्ता व पुढे नदीकडेने १२ मी.रस्त्याने वाहतूक वळवुन चाकण/तळेगाव रस्त्याकडे जोडणा-या पुलापर्यंत रस्ता करणे आवश्यक आहे. तरी देहू आळंदी रस्ता गट नं. ६० पासुन गट नं. २५ पर्यंत २४ मी. व पुढे गट नं. २५ पासून गट नं. १३, १४, १६, १८, ते २४, २५ पर्यंत जोडणा-या १२ मी. रस्त्याचे भूसंपादन २०१३ चे कायदयान्वये करणेस मान्यता देणेत येत आहे.

अनुकूल-८०                                                    प्रतिकूल- ०१

अशी मते पडली व सदर ठराव बहुमताने मान्य झाल्याचे मा.महापौर यांनी प्रकट केले.

-------------

**मा.सारीका लांडगे** - मा.महापौर साहेब,विषय क्रमांक ९वर मी पुढीलप्रमाणे ठराव मांडते.

ठराव क्रमांक - ९२                                    विषय क्रमांक – ९

दिनांक- १६/१०/२०१७                                  विभाग- मा.आयुक्त

संदर्भ- १) मा.महापालिका आयुक्त यांचेकडील मभा/३/कावि/९८९/२०१७ दि.२०/०९/२०१७

मा.महानगरपालिका मुख्य सभा ठराव क्रमांक ९७२ दिनांक ०६/०१/२०१७ अन्वये पी.एम.पी.एम.एल. साठी फायनान्स मेकॅनिझम पध्दतीने एकूण ८०० बसेस खरेदीपोटी मनपाकडून दायित्वानुसार ४०% निधी थेट बस पुरवठाधाकास देणे कामी मान्यता प्राप्त आहे.

मा.अध्यक्ष व व्यवस्थापकीय संचालक पी.एम.पी.एम.एल. यांचे मा.आयुक्त यांना दिनांक १५/५/२०१७ रोजीचे अर्धशासकीय पत्रान्वये महामंडळास ८०० बसेस सक्षम संचलनासाठी आवश्यक असून यासर्व बसेस स्वतंत्र निविदा प्रक्रीया राबवून खरेदी करणे आवश्यक आहे. यास्तव दोन्ही महानगरपालिकांनी ८०० बस खरेदीसाठी लागणारा अंदाजे ४०० कोटीचा निधी त्यांच्या ६०:४० च्या आर्थिक दायित्वानुसार महामंडळास उपलब्ध करुन देणेचे मान्य केल्यास सदरच्या बसेस निविदा प्रक्रियेच्या माध्यमातून खरेदी करण्याची कार्यवाही तात्काळ सुरु करण्यात येईल, महामंडळास ८०० बसेस खरेदीकामी लागणा-या निधीचे आर्थिक दायित्वाच्या ६०:४० प्रमाणानुसार निधी उपलब्ध करुन देणेबाबत पी.एम.पी.एम.एल.ला निर्णय कळविण्यास विनंती केली.

त्यानुसार पी.एम.पी.एम.एल करीता ८०० बसेस खरेदीसाठी लागणा-या अंदाजे ४०० कोटी निधी पैकी ४०%च्या आर्थिक दायित्वानुसार रक्कम रुपये १६० कोटी पी.एम.पी.एम.एल.ला उपलब्ध करुन देणेस, त्यापैकी सन २०१७-१८ या अंदापत्रकातील र.रु.२८ कोटी व्यतिरीक्त उर्वरित रक्कम आवश्यकतेनुसार वर्गीकरणाने उपलब्ध करुन देणेस मान्यता देणेत येत आहे.

**मा.सुवर्णा बुर्डे** - मा.महापौर साहेब,ठरावाला अनुमोदन आहे.

**मा.संदीप वाघेरे**-मा.महापौर साहेब,मा.आयुक्त साहेब,सर्व सन्मा.सभागृह, आज आपण पीएम पीएमएलला ६०:४० प्रमाणे पैसे देणार आहोत. ४०% आपण आणि ६०% पुणे महानगरपालिका. १९७४ साली पीसीएमटी सुरू झाली होती, त्यावेळी ८ बसेस होत्या. नंतर २००७ ला १०० बसेस आणि मग वाढत-वाढत ते भरपूर मोठ्या प्रमाणात वाढत गेले. आज पीएमपीला आपण जे पैसे देतोय त्या हिशोबाने किंवा त्याअनुषंगाने एक लाख लोकांमागे ५१ बसेस पाहिजेत. आज पीएमपीएलची परिस्थिती अशी आहे की, पिंपरी चिंचवडला दुजाभावाची वागणूक दिली जाते. त्यांची पुणे दर्शन बस आहे. आमची पिंपरी-चिंचवड दर्शन बस कधी चालू करणार आहेत. आज आमचे १७५ कर्मचारी पीएमपीएलमध्ये वर्ग झाले आहेत. काही आपण आस्थापनावर येथे घेतले होते. आज पीएमपीएलचे

अधिकारी श्री.मुंढे साहेब आहेत, ते त्या लोकांना हडपसर डेपोस,कात्रज डेपो,फुरसुंगी डेपो नाही ते तिकडे डेपो दाखवतात. तिथे पाठवून आपल्या कर्मचा-यांवर अन्याय करतात. ते आपले पीसीएमटीचे कर्मचारी होते. ज्यावेळेला विलीनीकरण झाले, त्या वेळेला आपण आपल्या कर्मचा-यांची काळजी घेण्यासाठी, आणि ते एक्स्ट्रा होत होते म्हणून वर्गीकरण करून घेतले. नंतर त्यांनी त्यांचे कर्मचारी मागितले. आपल्या १७५ कर्मचा-यांना आज ते दुजाभावाची वागणूक देत आहेत. म्हणजे पैसे आमचे, आम्ही त्यांना सर्व गोष्टी पुरवायच्या. आणि त्यांनी आम्हाला अशी वागणूक द्यायची. आज आपण चांगलं करतोय, आपण त्यांना मदत करतोय. आपण पीएमपीएमएलला १६० कोटी देणार आहोत. त्याच्याबदल्यात आपण ५० लाखाप्रमाणे ८०० बसेस घेणार आहोत. पिंपरी चिंचवडकरांसाठी पीएमपीएल काय करणार आहे. स्वतः श्री.तुकाराम मुंढे साहेब हे अधिकारी आपल्या सभागृहात आजपर्यंत कधी आलेले नाहीत. कधी सभागृहाला किंवा आपल्या नगरसेवकांना काडीची किंमत देत आहेत का, याचा विचार आपण कुठेतरी केला पाहिजे. आपण त्यांच्या प्रत्येक शब्दाला मान द्यायचा. आणि ठीक आहे तुम्हाला एवढे पैसे लागतात तर आम्ही देऊ. पण पैसे देणारा बॉस असतो, घेणारा याचक आहे, देणारा दाता आहे, या हिशोबाने तर राहिलं पाहिजे. एवढे बोलून थांबतो. जयहिंद, जय महाराष्ट्र!

**मा.दत्तात्रय साने-**सन्मा.महापौर साहेब,सन्मा.आयुक्त साहेब,सन्मा.सभागृह, हा पीएमपीएमएलचा विषय, आपण चाळीस टक्यांप्रमाणे १६० कोटी रुपये देण्याचा विषय आला आहे. मा.महापौर साहेब, माझी आपल्याला नम्र विनंती आहे. आत्ताच मा.संदीप वाघेरे हे सुद्धा बोलले आहेत. जे आपले १६५ कर्मचारी आपल्या महानगरपालिकेतून पीएमपीएमएलमध्ये घेतलेले आहेत, तो कर्मचारी वर्ग आपल्याकडे वेगवेगळ्या विभागांमध्ये,कुणी स्थापत्य विभागात, कुणी उद्यान विभागात होते. हे कर्मचारी अनेक वेळेला येऊन, पक्षनेत्यांना असतील, स्टँडिंग चेअरमन असतील किंवा तुम्हालाही अनेक वेळेला हे लोक भेटले असतील. माझी आपल्याला विनंती आहे. मा.आयुक्त साहेबांना विनंती आहे, स्टँडिंग चेअरमनना सुद्धा विनंती आहे. जर आपल्या लोकांची, आपल्या शहरातल्या कामगारांची त्यांना त्या ठिकाणी नेऊन ससेहोलपट करत असतील,आपल्या लोकांना त्रास होत असेल, आपल्या कर्मचा-यांना हॅरेसमेन्ट होत असेल, आपल्या कर्मचा-यांना वेगवेगळ्या माध्यमांतून जर त्रास होत असेल तर, आपला कामगार या नात्याने त्यांची काही जबाबदारी आपण घ्यावी अशी मा.महापौरसाहेब मी आपल्याला विनंती करतो. जसे ते कर्मचारी आपल्याकडे होते. जरी समजा हाच इथला कर्मचारी हडपसरला ड्युटी करत असेल किंवा अजून कात्रजला ड्युटी करत असेल, जर आपला इथला कर्मचारी त्या वेगवेगळ्या ठिकाणी जात असेल, जाण्यायेण्यात त्याचा मधला वेळ जात असेल, या मानसिकतेमध्ये तो पीएमपीच्या माध्यमातून काम करत असेल तर, मला असं वाटतं की, आपण त्यांना ४० टक्यांचा जो हिस्सा देतोय, तो सध्या थांबवला तरी चालेल, असे मा.महापौर साहेब आम्हाला वाटते आहे. ज्या कर्मचा-यांच्या जीवावर पीएमपीएमएल चालू आहे,या पीएमपीएलच्या आपल्याच कर्मचा-यांना जर तिथे वेगवेगळ्या पद्धतीने त्रास होत असेल तर, मा.महापौरसाहेब आपण त्यांना पैसे देणे थांबवावे. आणि तिथले जे श्री.तुकाराम मुंढे हे त्या व्यवस्थापनाचे जे मेनहेड आहेत, त्यांना जरा सभागृहात येऊन बोलू द्या ना. ज्या-ज्या वेळेस आपण त्यांनी जे मागितलं ते त्यांना देतोय तर ते कर्मचारी पुन्हा आपल्या सेवेत घेता येतील का किंवा त्यांना जो मानसिक त्रास होतो आहे तो आपल्याला कमी करता येईल का. जर समजा तसं करता आले नाहीतरी त्या कर्मचा-यांना

आपल्या पिंपरी-चिंचवड शहरामध्ये ड्युटी दिल्यातरी, तोही एखादा मार्ग बोलून त्याप्रमाणे केलेतरी मा.महापौर साहेब,आपल्याला आपल्या कर्मचा-यांसाठी आपण काहीतरी केलं असं नक्की वाटतय. तुम्ही काल बघितले असेल की,आपल्या कर्मचा-यांना किंवा त्यांच्या कर्मचा-यांना बोनस देणार नाहीत. तुम्ही पेपरला बातमी वाचली असेलच. जर एवढी सगळी हिटलरशाही त्याठिकाणी चालली असतानासुद्धा आपले कर्मचारी तिथे आहेत. आपल्या ठिकाणी पण बस चालल्या पाहिजेत. मा.महापौर साहेब, यापूर्वीसुद्धा सभागृहात पीएमपीएमएलचे विषय झालेले आहेत. नवीन बस पुण्यामध्ये आणि जुन्या बस आपल्या इथे. अनेक वेळा प्रत्येक रूट वर या बसेस बंद पडल्या आहेत. त्या बस किती ठिकाणी बंद पडलेल्या आहेत. आपल्या रूटवर जाणा-या जवळपास ७० ते ८० टक्के बसेस या जुन्या बसेस आपल्याला दिल्या जातात. पिंपरी चिंचवड महानगरपालिकेला तिथेसुद्धा सवतीची वागणूक मिळते, असे मा.महापौर साहेब मी आपल्याला सांगू इच्छितो. आपण ज्या गाड्या दिलेल्या आहेत तर इकडे सर्व बाद झालेल्या गाडया आपल्या शहराला दिलेल्या आहेत. आपण या सभागृहात त्याविषयी अनेकवेळा चर्चा केली आहे. त्यांचा कोणी अधिकारी इथे आलेला आहे का. आमचे म्हणणे ऐकायला त्यांच्याकडून कोणीतरी पाहीजेच ना. जेव्हा कधी काही रूट मागितले जातात किंवा या-या रूटवर ही बस पाहिजे,या-या रुटवर बस चालली गेली पाहीजे,अशी मागणी जरी केली,आम्ही पत्र दिलतरी त्यांच साधं उत्तर देखील येत नाही. या रूटमध्ये वाहतुकीला आपल्याला फायदा होणार आहे असं सजेशन जरी आपण त्यांना दिलं तरीसुद्धा ते पीएमपीएलच्या माध्यमातून ऐकत नाहीत किंवा त्यांच साध नुसतं उत्तर सुद्धा येत नाही. मा.संदीप वाघेरे यांनी सांगितल्याप्रमाणे, जे आपले कर्मचारी आहेत त्यांना आपल्या भागात यावे किंवा आपल्या भागामध्ये त्यांना ड्युटी द्याव्यात. अन्यथा जे कर्मचारी तिकडे गेलेले आहेत, त्यांना आपण आपल्या सेवेमध्ये रुजू करून घ्यावे असे मी सांगतो. मा.महापौरसाहेब, यापूर्वीसुद्धा अनेक वेळा बसेस घेतलेल्या आहेत. या बस कुठल्या रूटवर आहेत, किती बस बंद पडलेल्या आहेत, किती बस चालू आहेत. सन २०१४, २०१५ आणि २०१६ या वर्षी बीआरटी बसेस घेतल्या आहेत. मा.महापौरसाहेब, याची पण माहिती मिळालीतर बरे होईल. आता आपण ८०० बसेस घेतोय. त्यावेळी पण आपण २६०/२७० बसेस घेतल्या होत्या, त्या रुट वर आहेत का. त्या बसेसचे मेंटेनन्स चालू आहे का, त्या रूटवर वाहतात का. स्पाईन रोडवर मध्ये या नवीन बसेस लावल्या होत्या. पण पेपरवाल्यांनी मध्ये बातमी दिली होती की, त्या बस गायब झालेल्या आहेत. मग आता त्या बसेस तिथे आहेत का नक्की कुठे ठेवलेल्या आहेत, याची सुद्धा माहिती आपल्याला मिळावी. मा.महापौरसाहेब,आपल्या सभागृहाने आपल्या कर्मचा-यांसाठी चांगला,योग्य तो विचार करावा अशी आग्रहाची आणि कळकळीची विनंती करतो आणि थांबतो.

**मा.उषा उर्फ माई ढोरे-**सन्मा.महापौर साहेब,सन्मा.आयुक्त साहेब,सन्मा.सभागृह,विषय अतिशय महत्त्वाचा आहे. मा.महापौर साहेब,मा.आयुक्त साहेब,निधी द्यायला कुठलीही ना नाही. तो ६०:४० असा द्यायचा असे ठरलेले आहे. त्यामध्ये कुठलाही बदल करावा असं मला म्हणायचं नाही. महापौर या नात्याने आपण मुंढे साहेबांना सांगायला पाहिजे. तळेगावचा जर कामगार असेल तो कात्रजला ड्युटीवर जातो आणि एक माणुसकी म्हणून सिनिऍरीटी सुद्धा पाहिली पाहिजे. दोन/तीन वर्षांनी रिटायर होणारी जी व्यक्ती आहे,त्या व्यक्तीला चष्मा लागलेला असतो, त्यांच शरीर कमकुवत झालेलं असतं, कोणालातरी श्वास घ्यायला त्रास झालेला असतो,असे अनेक प्रकारचे आपल्या शहरातले आपले

कामगार म्हणजेच आपले मतदार आहेत. आज या मतदारांना पीएमपीएलमध्ये काम करत असताना जर हॅरॅसमेंट होत असेल आणि हॅरॅसमेंट होऊनही त्यांना निधी दिला जाणार असेलतर कर्मचा-यांच्या सहानुभूतीबाबत त्यांच्याशी बोलणे करणे खूप महत्त्वाचे आहे. शेवटी नोकरीशिवाय पर्याय नसतो. नोकरीवरच त्यांच कुटूंब अवलंबून असत. पण नोकरीला गेल्यानंतर त्या कामगाराच्या पत्नी इतकी टेन्शनमध्ये असते. अशी कितीतरी गा-हाणी आमच्यापर्यंत आलेला आहेत, त्यांच्यापर्यंत आलेली आहेत. यांना घरी यायला रात्रीचे बारा/बारा वाजतात. अशा पद्धतीने जर पीएमपीएलचे अधिकारी आपल्या शहरातील लोकांना जर त्रास देत असतील तर हे बरोबर नाही. कारण आपण संस्था स्थापन केली. ही पीसीएमटी म्हणून त्याचं नाव होत. ती सुधारण्याकरीता आम्ही प्रयत्न केले. अनेक चांगले-चांगले अधिकारी त्यावर नेमले गेले होते. मला वाटतं श्रीनिवास पाटील यांच्या हातातही ही संस्था गेली होती. तुम्ही तरी या संस्थेकडे पहा आणि त्याचा आर्थिक बोजा कसा सुधारेल याकरीता प्रयत्न करा. पण ती सुधारली गेली नाही. कोणाला ते जमलेले नाही. का जमले नाही त्याविषयी आपल्याला आज बोलायचं नाही. ही संस्था व्यवस्थित चालावी,दळणवळण व्यवस्थित चालावे, नागरिकांची सोय चांगली व्हावी, बसेस प्रत्येक रूट वर जायला पाहिजेत आणि प्रत्येक रूटवर गेल्यानंतर त्या प्रवाशांना ही पीएमपीएमएलची सोय मिळाली पाहिजे. हा हेतू जर डोळ्यासमोर ठेवला गेला आणि नंतर एकत्रीकरण केल्यानंतर पुन्हा महानगर पालिकेची ही काय बस आहे का. आपण लिंबूटिंबू आहोत का. पिंपरी-चिंचवड महानगरपालिकेतील राहणा-या नागरिकांना हॅरॅसमेंट करतात आणि निधी म्हटले की आपल्याकडे हात पसरवतात. मला वाटतं की, स्टॅंडिंग चेअरमन यांनीसुद्धा मुंढे साहेबांना निमंत्रित केलं होतं. त्यावेळी ते म्हणाले होते की, मी या मीटिंगला येणार नाही. अशी भाषा करणारं या संस्थेचं हे प्रशासन आहे. कडक असावं. कडक स्वभाव असणे अतिशय चांगले असते. पण प्रत्येक माणसामध्ये कडक स्वभावामध्ये माणुसकी ही सुद्धा कुठेतरी दडलेली असते. ज्या ठिकाणी माणुसकीचा वापर करायचा त्याठिकाणी प्रशासनाने देखील माणुसकीचा वापर केला पाहिजे. आज आपण पाहतो पीएमपीएलचे लोक इतकी टेन्शनमध्ये आहेत. काही जणांना तर श्वासोच्छवासाचा त्रास होत होता. रात्री बारा वाजता त्यांना ॲडमिट करायला नेले आणि ॲडमिट केल्यानंतर त्याला माईल्ड ॲटॅक येऊन गेला होता. तरी त्याची रजा मुंढे साहेबांनी मंजूर केली नाही. हा कुठला न्याय आहे. म्हणजे ॲटॅक येऊन गेलेली माणसं मेलीतरी, पीएमपीएलचा हा अधिकारी त्यांच्या स्वभावाप्रमाणे वागत असेलतर हे चुकीचे आहे. मा.महापौर साहेब, आपण एकदा तरी त्यांच्याशी विचारविनिमय केला पाहिजे. आपल्या भागातल्या आमदारांनी एकत्र येऊन मुंडे साहेबांशी बोलले पाहिजे. जेणेकरून पी.एम.पी.एम.एल. व्यवस्थित चालली पाहिजे. जे रूट आहेत ते रूट पुणे आणि पिंपरी-चिंचवड शहरामधल्या लोकांना पुरवले पाहीजेत. प्रत्येक रुटवर बस गेली पाहीजे. पिंपरी चिंचवडमध्ये जिथे पाहीजे तिथे रूट दिले पाहिजेत. रुटची मागणी करत असताना मा.दत्ता काका साने यांनी सुद्धा सांगितले की, आम्ही पत्र देतो. रूट मागतो. पण ते रुट देत नाहीत. हा कुठला न्याय आहे. मलादेखील पीएमपीएमएल यांच्याकडे रूट मागायचे आहेत. मीसुद्धा तुमच्या सहकार्याने रुट घेणार आहे. आपल्याला जर असे रूट दिले जात नसतील तर त्यांना हा निधी देऊन आपल्याला काय उपयोग. नको तिथे खर्च करण्यापेक्षा, बराचवेळ जवळजवळ एक तासभर आरोग्य या विषयावर चर्चा झाली. जर आरोग्याशी निगडित विषय असेलतर तिथे तुम्ही खर्च करा ना. आपण यांना एवढा निधी कशासाठी देताय. मी एवढेच सांगते की,मा.महापौरसाहेब,आपल्या कामगारांची जी हॅरॅसमेंट होते आहे, ती कुठेतरी थांबली पाहिजे. माणुसकीने त्या अधिका-याने त्या कामगारांना विश्वासात घेतले पाहिजे

आणि टेन्शन दिलं नाहीतर तो ड्रायव्हर व्यवस्थित गाडी चालवेल. क्लिनर त्याचं काम करेल. काम करण्यासाठी त्या कामगाराचं मानसिक स्वास्थ्य चांगलं असणं केव्हाही चांगलं. म्हणून आत्ता विषय आल्यानंतर माझी एवढीच इच्छा आहे की, आपण त्यांच्याशी बोलावं आणि आपल्या पिंपरी-चिंचवड महानगरपालिकेच्या कामगारांचे किंवा पुणे महानगरपालिकेच्या कामगारांचे स्वास्थ्य कसं चांगलं राहील, त्यांना कसा त्रास होणार नाही, ते अतिशय चांगल्या प्रकारे काम करतील, याची आपण हमी घेऊ. आणि त्या त्या पद्धतीने त्या कामगाराचे, त्याच्या घराचे स्वास्थ्य चांगलं राहील याकडे आपण आवर्जून लक्ष द्यावे. विषयाला माझी ना नाही,निधी द्यायला माझी ना नाही. आहे हा विषय तुम्ही मंजूर करणारच आहात. माझी विषयाला मंजूरी आहे. धन्यवाद.

**मा.पंकज भालेकर**- आदरणीय महापौर, आदरणीय आयुक्तसाहेब,आदरणीय सभागृह,सन्मा.पत्रकार मित्र, हा जो आपल्यापुढे सभापटलावर विषय आलेला आहे. निश्चितच सर्व सभासदांनी सांगितले आहे की, निधी देण्यासाठी कोणाची ना नाही. पण हा निधी देत असताना खरोखरच आपल्या परिसरामध्ये पीएमपीएमएलच्या बसेसची चांगली सुविधा मिळते का. यासाठी संबंधित अधिका-यांना आपण सूचना केल्या पाहिजेत. कारण दोन/तीन महिन्यांपूर्वी माझ्या प्रभागामध्ये बिजलीनगर परिसरामध्ये बसेसच्या दोन फे-या चालू होत्या आणि अचानकपणे त्या बंद करून एकच चालू केली आणि एक बंद केली. आम्ही त्यांना विचारले. गेल्या दोन महिन्यांपासून आम्ही त्यांचा पाठपुरावा करतोय. पण त्या फे-या त्यांनी काही चालू केल्या नाहीत. अशा ब-याच काही समस्या आहेत. आत्ता आमच्या प्रभागातील पीएमपीएमएलचा कर्मचारी आजाराने ॲडमिट होता. इथला कर्मचारी आजारपणामुळे ॲडमिट झालातर त्याला ९०% मेडीकल सवलत मिळते. फॉर्म भरून घेण्यासाठी आपल्या पिंपरी-चिंचवड महानगरपालिकेच्या हद्दीत डेपो आहे, तिथे सोय असायची. पण मी स्वतः त्याला घेऊन पुणे महानगरपालिकेत आम्हाला तिथे जावं लागलं. म्हणजे आपल्या या महानगरपालिकेतील कर्मचा-यांची किती दयनीय अवस्था आहे. आज मेडीकलसाठी पुणे महानगरपालिकेत जायला लागते. अशा ब-याचशा काही गोष्टी आहेत. मा.महापौरसाहेब,याचा नक्की विचार करावा अशी विनंती आहे. दोन किंवा तीन महिने झाले असतील, मा.महापालिका सभेत उपसूचनेसह विषय मंजूर केला होता. १७८ कर्मचारी पीएमपीएमएलमध्ये, सोळा-सतरा किंवा वीस वर्षांपासून महानगरपालिकेत काम करत होते. ते अचानकपणे पीएमपीएलमध्ये वर्ग करण्यात आले आहेत. काही जागा रिक्त झाल्या आहेत. काही पाणीपुरवठा विभागात काम करत होते, काही स्थापत्य विभागात काम करत होते. तिथे आज ती लोकं नाहीत. आज निश्चितच यांनी एवढी वर्षे महापालिकेची सेवा केलेली आहे. मागे ठराव केला होता की ते एक १७८ लोकं आपल्याकडे वर्ग करावेत. पुढे त्यांचे काय झालं याचा खुलासा निश्चितच झाला पाहिजे. काही कायद्याची बंधने पण असतात. परंतू आजपर्यंत आपल्या महानगरपालिकेच्या हद्दीत त्यांनी काम केलंय. ते वर्ग होईल किंवा नाही होईल, हा तर पुढचा भाग आहे. पण आत्ताच्या कंडीशनमध्ये त्यांना आपल्या मनपाच्या, पिंपरी-चिंचवड महानगरपालिकेच्या हद्दीमध्ये सर्व्हिस द्या,माझी एवढीच विनंती आहे. कृपया मा.महापौरसाहेब, आपण संबंधित अधिका-यांना पण विनंती करावी. मला येथे बोलायची संधी दिलीत, त्याबद्दल धन्यवाद.

**मा.राहुल कलाटे**-सन्मा.महापौर साहेब,मा.आयुक्त साहेब,सन्मा.सर्व सभासद,पत्रकार बंधुंनो, मा.महापौर साहेब, पीएमपीएमएलकडे कर्मचारी वर्ग करत असताना, आपला ४०% निधी वर्ग करत असताना, मी आपल्याला एकच विनंती करेन की, पीएमपीएमएलचे जे कर्मचारी काही वर्षे आपल्या सेवेत होते त्यांना पीएमपीएमएलमध्ये परत बोलवले त्या कर्मचा-यांचे काय आणि त्यांनी या शहरात देखील इन्फ्रास्ट्रक्चर त्यांचे ठेवावे. आपल्याला छोटा-छोटा पत्रव्यवहार करायचा असेल तर पुणे- सातारा रोडला जावे लागते. त्यांनी एखादा को-ऑर्डिनेशन ऑफिसर याठिकाणी नेमावा. आमच्या शहरातल्या नागरिकांच्या काही समस्या असते, कुठला रूट चालू करायचा असेल, कुठल्या रूटची काही माहिती घ्यायची असेल तर ही माहिती आपल्याला उपलब्ध होत नाही. किंवा आपण दिलेल्या पत्रांना त्यांच्याकडून उत्तरे दिली जात नाहीत. एवढ्या मोठ्या प्रमाणात आपण या शहरातील नागरिकांचा पैसा त्यांना देत असताना, या शहरासाठी सुविधा कशा देतील यासाठी या शहरात त्यांचे एक सक्षम कार्यालय असावे. त्यांचा एखादा अधिकारी या शहरात बसावा. जेणेकरून त्याला भेटण्यासाठी, को-ऑर्डिनेशन करण्यासाठी, त्याला एखादा तर रूट सजेस्ट करण्यासाठी आपल्याला सातारा रोडला जावे लागते. मा.महापौरसाहेब असे काही प्रश्न आपण त्यांच्याकडून सोडवून घ्यावेत. त्या कर्मचा-यांचा असेल, कार्यालयाचा असेल, बंद केलेले रुट का बंद केले. आज मला वाटतं, त्यांचा सर्वांत प्रॉफिटेबल बीआरटी औंध-रावेत रूट आहे. आपण त्यांना एवढ्या सगळ्या सुविधा दिलेल्या असताना,शहरातील नागरिकांनादेखील त्यांनी सुविधा पुरवाव्यात. सर्वात प्रथम या गोष्टींचा खुलासा करावा. शेवटी सर्वसामान्य नागरिकांसाठी पीएमपीएल आहे. ही नागरीकांची मुलभूत गरज आहे. त्यांना पैसे देण्यासाठी आमचा कुठलाही विरोध नाही. आपण हे करत असताना त्या नागरिकांच्या ज्या गरजा आहेत,त्यात इन्फ्रास्ट्रक्चर, कर्मचारी, रूट्स या सर्वांविषयी स्पष्टता असावी. एक कोऑर्डिनेशन ऑफिसर नेमावा, जेणेकरून सर्व नगरसेवकांना, सर्व नागरिकांना त्या ऑफिसमध्ये जाता येईल आणि आपल्या व्यथा, आपल्या अडचणी सांगता येतील. धन्यवाद.

**मा.मंगलाताई कदम** – मा.महापौर साहेब,मा.आयुक्त साहेब,माझे सर्व सहकारी, मा.महापौर साहेब, आत्ताच सदस्यांनी यांनी सांगितले की, पिंपरी चिंचवडमधील कर्मचा-यांना हडपसर,कात्रजला ड्युट्या दिल्या जातात. मी मागे आयुक्त साहेबांना एक पत्र दिले होते. तिथे ३२ लोकांच्या बदल्या झाल्या. पण उर्वरित लोकांच्या बदल्या केल्या गेलेल्या नाहीत. हा एक मुद्दा आहे. आजही त्या लोकांना सणसूद काहीही नाही. ज्यावेळेला जूनमध्ये मुलांच्या शाळा चालू होत्या, त्या लोकांना मुलांसाठी काहीही करता आलेले नाही. आज आपण एवढ्या बसेस वाढवतोय. मा.महापौरसाहेब,तुम्ही मला सांगा, बसेस चांगल्या असल्या पाहीजेत, पिंपरी चिंचवडचे ट्रान्सपोर्ट चांगले असायला पाहीजे, लिकिंग चांगले असले पाहीजे याबद्दल आमचे दुमत नाही. परंतु साधी पासकेंद्रे होती. तर तुम्ही कॉन्ट्रॅक्ट बेसवर पासकेंद्रे चालू करा. तुम्हाला ती परवडत नसतील, कर्मचारी ठेवायला येत नसेल. पूर्वी दिवसाचा पास होता. सकाळी पास काढा, दिवसभर कुठेही फिरा. तुम्हा मला सांगा, तुकाराम मुंढे साहेब नक्कीच शंभर टक्के चांगले आहेत. परंतु पीएमपीएमएलमध्ये वाढ झाली का, पैशांची वाढ झाली का. काहीही वाढ झालेली नाही. शंभर टक्के ते चांगले अधिकारी आहेत त्याच्याबद्दल माझं दुमत नाही. मग त्यांनी काही योजना आखल्यात का. काहीही योजना आखल्या नाहीत. पूर्वी जशी परिस्थिती होती की डेलिपास होता. ज्येष्ठ नागरिकांसाठी पास असायला पाहिजे. सर्व नागरिकांसाठी असायला पाहिजे. त्याच्यासाठी पासकेंद्र होती ती बंद केली. तिथे कॉन्ट्रॅक्टने ही पासकेंद्रे चालू करा.

लोकांना सोयीस्कर पडेल. लोकं म्हणतात, जाऊ दे कोण जाणार दिवसभराचा पास काढायला. एवढ्या लांब निगडीला जावे लागेल. आम्हाला इथून चिंचवडवरून पुण्याला जायचं होतं. आम्ही कशाला पास काढायला निगडित जाणार. कोणते नवीन रूट्स कुठल्या ठिकाणी दिले गेले. कुठलेही नवीन रूटस् दिले गेले नाहीत. आणि बसेसचा अवतार तर विचारूच नका. इतकी वाईट परिस्थिती आहे. त्यांचा कलरसुद्धा बदलला आहे. उलट अजूनही तुम्हाला काय दोन/पाच कोटी लागत असतील तर घ्या. पण चांगल्या लक्झरी बसेस चालू करा. ती बस आहे असे वाटतच नाही. आतातर त्याचा निळा आणि काळा काय प्रकार झालाय तो समजतच नाही. रस्त्याने बस गेलीतरी ही आपली बस आहे असे ओळखूही येत नाही अशी वाईट परिस्थिती या निळ्या बसने करून ठेवलेली आहे. त्या बसेसमध्ये काय-काय करायचय. अधिकारी जर चांगले आलेले असतीलतर किती कर्मचारी सस्पेण्ड केले. पिंपरी-चिंचवडचा एकच क्लासवन अधिकारी होता. त्याला पण सस्पेंड केलयं. या पीएमपीएमएलने पिंपरी-चिंचवडच्या कर्मचा-यांची फार वाईट अवस्था करून ठेवलेली आहे. पुण्यातल्या लोकांना काय वाटतं परमेश्वरालाच माहिती. त्यांनाच फार सगळं येतं आणि पिंपरी-चिंचवडच्या पीएमपीएलवाल्या लोकांना काही येत नाही का. इतकं असेलतर त्यांचं सेपरेट करा आणि आपलं सेपरेट करा. महापौर साहेब, मा.चेअरमन आपण तिकडे मिटींगला जाता. तुम्ही तिथे जाऊन हे बोलायला पाहिजे. आज आपल्या ज्या विधवा माता भगिनी आहेत, त्या तिथे कामाला लागल्या पाहिजेत. त्यांना कामावर का घेत नाहीत. मा.महापौर साहेब, तुम्ही त्यांचं सगळं रेकॉर्ड मागवा. त्यांचे चेकर क्वालिफिकेशनप्रमाणे आहेत का ते चेक करा. त्यांचे चेकर क्वालिफिकेशनप्रमाणे नाहीत. पण बोललं गेलं पाहिजे. मा.महापौर साहेब, आपण तिथे मिटींगला जाता पण तिथे बोलत नाही त्यामुळे ही परिस्थिती आहे. मा.महापौरसाहेब, आपल्या लोकांना पदोन्नती कधी मिळणार आहे. तुम्ही मला सांगा, आता आपला किती स्टाफ राहिला आहे. मुळात हे आधी काढा. एक हजार, दोन हजार, तीन हजार, याच्यापुढे आपला स्टाफ राहिलेलाच नाही. आपला स्टाफ बाराशे/अठराशे सुद्धा नाही आणि या लोकांना डोळ्यांवर धरून ही लोक काम करतात. या लोकांनी व्हिआरएस घेतली पाहिजे. ही कुठली परिस्थिती. पीएमपीएल त्यांना पुणे पीएमपीएलच करायची आहे का. पुण्यातली लोकसुद्धा आपलीच आहेत. कर्मचारी शेवटी आपलाच आहे. ट्रान्सपोर्ट आपलं आहे. ट्रान्सपोर्ट चांगलं असलं पाहिजे हे आम्हाला मान्य आहे. परंतू जर तुम्ही चांगले रूट देणार नसाल,आमच्या लोकांना तिथे सुविधा मिळणार नसेल,आमचं गा-हाण ऐकायला जर कोणी पिंपरी-चिंचवडमध्ये येणार नसेल, तुम्ही ऐकणार नसाल, आमच्या नागरीकांना, आमच्या कर्मचा-यांना तुम्ही जर थम्ब करण्यासाठी त्यांनी रात्रंदिवस दोन दोन तास फिरायचं. वयानुसार जो माणूस सिनिअर आहे, या माणसाची नोकरी एक वर्ष राहिलेली आहे. रिटायरमेंट जवळ आली आहे. त्या माणसाचे परिस्थिती काय असणार आहे. त्याला बी.पी. असणार, शुगर असणार आहे. वय जास्त झालेल असणार आहे. अशी माणसं रहायला इथे आणि थम्ब करायला मात्र स्वारगेट डेपो,हडपसर डेपो, बाकी कुठे-कुठे लांब लांब. हा अन्याय करून काय उपयोग. मघाशी सुध्दा तुम्ही आरोग्याच्या बाबतीत सांगितलं की, हे तुमचं घर आहे. तुम्ही या घरामध्ये बसून निर्णय घेतले पाहिजेत. मागे जे कुणी पीएमपीएमएलचे बसलेले आहेत, त्यांना तुम्ही हा निरोप सांगा. तुम्ही मुळात अनधिकृत लोकं तिथे भरलेली आहेत हेही मी अगदी ठणकावून सांगते. जे कोणी चेकर आहेत ते क्वालिफिकेशनप्रमाणे नाहीत. आमच्या लोकांना प्रमोशन मिळत नाही. पुढच्या लोकांनी आधीच प्रमोशन घेवून विषय संपवून टाकलाय. आमच्या लोकांनाही प्रमोशन दिले गेले पाहीजेत. मग कुठेतरी हा विषय देखील बघितला गेला पाहिजे. आणि

जर या बसचा रंग तुम्हाला बदलता आला तर, जर तुम्हाला आणखीन दोन/पाच दहा कोटी पाहिजे असतील तर घ्या. ती बस बस वाटली पाहिजे. त्या बसमध्ये बसताना चांगलं तर वाटलं पाहिजे. आज त्या निळ्या बसेस काळ्या झाल्या आहेत. मा.महापौर साहेब, तुम्ही पण त्या कमिटीवर आहात. तुम्हीसुद्धा विचार केला पाहिजे की, लोकांना ट्रान्सपोर्ट आल्हाददायक वाटला पाहिजे. आज घरातून आपली गाडी बाहेर काढताना काय परिस्थिती आहे. दिवाळीच्या वेळेला शहरात कुठेही फिरता येत नाही एवढी गर्दी आहे. जर ट्रान्सपोर्ट चांगला असेलतर,लोक घरापासून बसने जातील. शटल बसे द्या. शाळांना बसेस द्या. पिंपरी चिंचवडवरून पुण्याला येणारे शाळेतले,कॉलेजचे जे विद्यार्थी आहेत,त्यांना नियमाप्रमाणे बसेस द्या. टायमिंग एक आणि बस सुटणार दुस-याच वेळेला. त्यामुळे त्या बसेसचा काहीच उपयोग होत नाही. आतातर कॅबचे फॅड आलेले आहे. तुम्ही एवढ्या बसेस घेताय. पहिल्यांदाच सांगते, माझा विरोध नाही. परंतू ओला वगैरे सगळ्या कॅब आलेल्या आहेत. आई वडील काय करतात. कुठे बसची वाट बघायची. फोन करून ओला बोलावतात. पालक लोकं मुलांना पुण्यात क्लास लावतात. एवढं साधं राहिलेलं नाही. दोन तास उशीर झाला तर दोन तास क्लास बुडतो. म्हणून त्यापेक्षा आमची मुलं कॅबनी गेलेली परवडली. जर तुम्ही ही सुविधा चांगली दिली तर नक्कीच पिंपरी-चिंचवडच्या लोकांना पुण्यात यायला आनंद होईल. तर या सगळ्या गोष्टींचा विचार केला गेला पाहिजे. आमचा विषयाला अजिबात विरोध नाही. मा.महापौर साहेब, उलट तुम्ही पाहीजेतर आणखी पाच/दहा कोटी वाढवा. परंतू त्या बसचा कलर,त्या बसची परिस्थिती आणि पिंपरी-चिंचवडच्या कर्मचा-यांवर होणारा अन्याय हे सगळं थांबलं गेलं पाहिजे. मा.महापौर साहेब, मी या ठिकाणी एवढेच सांगते.

**मा.अजित गव्हाणे**-सन्मा.महापौर साहेब,सन्मा.आयुक्त साहेब,मा.सभागृह आणि पत्रकार मित्र, महापौर साहेब, आयुक्त साहेब, आपण दरवर्षीप्रमाणे पीएमपीएलला मदत करत असतो. सर्वांना कल्पना आहे की, पूर्व पीसीएमटी आणि पीएमटी यांचे विलीनीकरण झाले. त्यामागचा हेतू असा होता की, दोन्हीही फायद्यात नव्हत्या. ज्या पद्धतीने ट्रान्सपोर्ट पाहीजे त्या पद्धतीने नव्हते. म्हणून दोन्हींचे एकत्रीकरण केले गेले. मा.महापौर साहेब,मा.आयुक्त साहेब,सुरुवातीचीच काही वर्षे दोन्ही महापालिकांनी पैसे द्यायचे असा विषय होता. आणि त्या पीएमपीएमएलला सक्षम करणे आणि पीएमपीएमएलच्याच पैशांतून ती व्यवस्था चालली पाहिजे, अशाप्रकारची भूमिका त्यावेळी पीसीएमटी व पीएमटीच्या विलीनीकरणावेळी घेतली गेली होती. परंतु नंतरच्या काळामध्ये गेली इतकी वर्षे झाली की, आपण पीएमपीएमएलला पैसे देत असतो. पैसे देण्याबद्दल आमचे कोणाचेही दुमत नाही. कारण पब्लिक ट्रान्सपोर्ट हे सक्षम असले पाहीजे. ते नव्हते म्हणून दोन्ही शहरांचे एकत्रिकरण केले गेले. मा.आयुक्त साहेब, आता ही काळाची गरज आहे. पिंपरी चिंचवडमध्ये आपण एवढे मोठे रस्ते केलेत, तरीही रस्ते अजून कमी पडतात. यामागची कारणं अशी आहेत की, इथली वाढती लोकसंख्या आणि वाढत्या गाड्या. यामुळे अनेक ठिकाणी मोठ्या प्रमाणात ट्रॅफिक जामचा प्रॉब्लेम होतो. मा.मंगलाताई कदम यांनी या गोष्टीचा इथे उल्लेख केला होता की, आता खासगी ट्रान्सपोर्ट व्यवस्था खूप चांगल्या पद्धतीने उपलब्ध झालेल्या आहेत. लोक आता त्याचा वापर करू लागलेले आहेत. त्याची मदत निश्चितपणे आपल्याला होते. परंतु पब्लिक ट्रान्स्पोर्ट चांगले होणे हे अत्यंत गरजेचे आहे. आणि त्याच्यामुळे आपण आज मेट्रो प्रकल्प पिंपरी चिंचवड आणि पुणे येथे सुरू केलेला आहे. या मागचा उद्देश हाच आहे की, उद्याच्या काळात वाढत्या लोकसंख्येच्या दृष्टिकोनातून आणि

ट्राफिक जामचा प्रॉब्लेम आहे यामुळे लोकांच्या वेळेचा अपव्यय होतो, तो वाचवण्याच्या दृष्टीने आपल्याला पीएमपीएल अधिक सक्षम करण्याची गरज आहे. आपले महापौर त्या कमिटीत आहेत, आयुक्त आहेत,स्टँडिंग चेअरमन आहेत. आपल्या शहराच्या वतीने तुम्ही तीन प्रतिनिधी तिथे काम करत असता. आमच्या शहराच्या वतीने आपल्या तिघांनाही विनंती आहे की, हे सगळं करत असताना त्याठिकाणी पीएमपीएमएल कशी सक्षम होईल. आज पीएमपीएमएलला जो निधी द्यावा लागतो, तो हळु-हळू कमी कसा होईल. पिंपरी-चिंचवड असेल, पुणे महापालिका असेल. आपलाच खर्च वाढतो आहे आणि आपल्याकडचे उत्पन्न आहे ते कुठेतरी कमी होते आहे. पूर्वी जकातीचं उत्पन्न होतं,एलबीटीच उत्पन्न होतं, ते आता कमी झालेलं आहे. आपण आता उत्पन्नाच्या दृष्टीने, आर्थिकदृष्ट्या राज्य शासनावर,केंद्र शासनावर अवलंबून आहोत. भविष्यकाळात ती संस्था सक्षम होण्याच्या दृष्टीने प्रयत्न केले पाहिजेत. मा.आयुक्तसाहेब, पीएमपीएमएलचे जे प्लॉटस् आहेत, ते आपल्या महापालिकेने आणि पुणे महापालिकेने त्यांना वर्ग केलेले आहेत. या प्लॉटस् मधून जर काही कमर्शिअल डेव्हलपमेंट करता आली,यातून काही उत्पन्न आलेतर निश्चितपणे त्यातून संस्था चालवता येईल. आणि भविष्यकाळात आपल्याकडून जी मदत त्यांना लागते ती कमी करता येईल. दुसरा महत्वाचा विषय म्हणजे, मा.आयुक्त साहेब आणि मा.महापौरसाहेब, आत्ता मा.संदीप वाघेरे, मा.दत्ता काका साने, मा.माई ढोरे यांनी सगळ्यांनीच उल्लेख केला की, त्याठिकाणी आपल्या कर्मचा-यांना जी दुय्यम वागणूक दिली जाते, त्यामध्ये मुख्य अडचण अशी आहे की, अनेक लोकांची लांबवर बदली करण्यात आलेली आहे आणि पिंपरी-चिंचवडच्या कर्मचा-याला इतक्या लांबवर जाऊन काम करणे शक्य होत नाही. म्हणजे कुठेतरी आपल्या कर्मचा-यांवर अन्याय होतो आहे. आपल्या शहरातल्या कर्मचा-यांना एक चांगल्या पद्धतीची वागणूक याठिकाणी मिळाली पाहिजे. त्यांची गैरसोय झाली नाही पाहिजे. खरेतर यासाठी आपण त्या कमिटीतून प्रयत्न करावेत. खरं म्हणजे आमच्या सगळ्यांचीच अपेक्षा आहे की, पीएमपीएलचे अधिकारी महापालिकेच्या सभागृहात कधीतरी आले पाहिजेत. जेव्हा त्यांचा विषय असतो त्यावेळी तरी ते आपल्या सभागृहापुढे आले पाहिजेत. तुमच्या बैठकांमध्ये किंवा पदाधिका-यांच्या बैठकांमध्ये ते आले पाहिजेत. म्हणजे आपल्या शहरातल्या नगरसेवकांना त्यांच्या त्यांच्या भागातल्या अडचणी मांडता येतील. या दृष्टिकोणातून इथून पुढे आपण प्रयत्न करावेत आणि पुढील काळात पीएमपीएल सक्षम करावी अशी अपेक्षा व्यक्त करून मी थांबतो.

**मा.आरती चोंधे-**मा.महापौर साहेब,मा.आयुक्त साहेब,सर्व सन्मा.सदस्य,पीएमपीएमएलला निधी द्यायचा जो विषय आलेला आहे, हा अत्यंत जिव्हाळयाचा असा विषय आहे. कारण पिंपरी-चिंचवड आणि पुणे महानगरपालिका यामध्ये नेहमीच दुजाभाव केलेला आहे. पिंपरी-चिंचवड महानगर पालिकेला बंद पडलेल्या बसेस वारंवार देण्यात आलेल्या आहेत. कुठला रूट चालू करायचं म्हटलं, आपण त्यांना पत्र दिलंतर आधी कारणं सांगितली जायची. आज आपण हा निधी देतोय. त्यामुळे नक्कीच चांगल्या बसेस पिंपरी-चिंचवड महानगरपालिकेला मिळतील आणि आपले पीएमपीएमएलचे जे कर्मचारी आहेत, त्यांना अनेक ठिकाणी लांब जावे लागते. त्यांचे आरोग्य बिघडते किंवा त्यांना काम करण्याचा उत्साह राहत नाही, तर यावर सुद्धा आपण विचार करावा. माझ्या आधीच्या वक्त्यांनी सांगितले की, ओला,उबेर सारख्या अशा अनेक सुविधा आलेल्या आहेत. पण त्या सर्वसामान्यांना परवडणा-या नाहीत. त्यामुळे पीएमपीएमएलच्या बस अत्यंत कमी दरात आहेत. नागरिकांना त्याची

आवश्यकता आहे. तर पिंपरी-चिंचवड महानगरपालिकेला चांगल्या बसेस उपलब्ध करून द्याव्यात असे मी म्हणते आणि थांबते.

**मा.सिमा सावळे-**सन्मा.महापौर साहेब,मा.आयुक्त साहेब, सर्व पदाधिकारी, दि.६.१.२०१७ला ८०० बसेस घेण्याचा आर्थिक निर्णय घेण्यात आलेला आहे. परंतू बसेस संदर्भातले काही निकष बदलले असे आपल्याला पीएमपीएमएलने सांगितले. त्यानंतर आपण सांगितले की, पहिल्या कमिटीने काय निर्णय घेतला तो आम्हाला कोणाला अवगत नाही. त्यामुळे आता तुम्ही बसेस कशा घेणार आहात कुठल्या कंपनीचा घेणार आहात यासाठी नवीन टेंडरिंग करा आणि टेंडर काढण्याच्या दृष्टीने त्यांनी जे काही एस्टिमेट काढलं, त्यात जो जास्तीचा खर्च त्यांना लागणार आहे त्यासंबंधीचा हा विषय आहे. या विषयाला आपण मंजुरी देणारच आहोत. परंतू ज्या-ज्या नगरसदस्यांनी तक्रारी मांडल्या, त्यात काही अंशी तथ्य आहे. हे खरे आहे की, पीएमपीएमएलचे कोणी ना कोणीतरी अधिकारी आपल्याकडे आले पाहीजेत. आणि जबाबदार अधिकारी आले पाहिजेत. जे अधिकारी येतात, त्यांच्याकडे कुठल्याही प्रकारचा अधिकार नसतो आणि म्हणून मग प्रश्न सुटत नाहीत. काहींनी विषयावर बोलताना सांगितले की, पीएमपीएमएलकडे जे कर्मचारी आहेत, त्यांना परत आपल्याकडे घ्या. मा.महापौर साहेब,एकदा कंपनी म्हणून रजिस्टर झाल्यानंतर असा कुठल्याही प्रकारचा निर्णय घेणे म्हणजे धाडस ठरेल. हे आपल्याला सर्वांना स्वतः सीएमजींनी त्याची कल्पना दिलेली आहे. मी सर्वांना असं लक्षात आणून देते की,परवा बोनससंदर्भात मा.महापौरांनी आणि मी स्वतः पत्र दिलं की, पीएमपीएलच्या कर्मचा-यांना आमच्या कर्मचा-यांप्रमाणे सानुग्रह अनुदान देण्यात यावे. त्यांच्या कामाचे बक्षीस देण्यात यावे. असे आपण दोघांनी पत्र दिले. ते पत्र दिल्यानंतर सीएमजींना मीटिंग बोलवावी लागली. सीएमजींनी त्यांचे म्हणणे मांडले. प्रशासकीय अधिकारी म्हणून निश्चितपणे त्यांचा बोनस द्यायला त्याठिकाणी विरोध होता. परंतु संचालक मंडळाने त्यांना निर्णय घेण्यास भाग पाडले. जी काही संचलन तूट आहे. त्या तूटीचे पैसे द्यायला आम्ही तयार आहोत म्हणून तुम्ही हा निर्णय घ्यावाच. जबरदस्ती म्हणता येणार नाही पण तुम्ही आणि आम्ही याची तूट भरून देणार आहोत. म्हणून तुम्हाला निर्णय घ्यावाच लागेल. आपण त्यांना ते रेझोल्यूशन मंजूर करायला भाग पाडले. पुण्याच्या महापौरांनी आणि स्टँडिंग चेअरमननेही विषय मंजूर केला. म्हणून पीएमपीएलच्या कर्मचा-यांना आज याठिकाणी बोनसचा चेक आपण देणार आहोत. खरेतर सीएमजींनी २०१० ला सांगितले. त्यावेळचे तत्कालीन जे बोर्ड होते. या बोर्डाने सगळे अधिकार हे सीएमजींना दिलेले आहेत. तरीसुद्धा आपण आग्रह करत होतो की, आम्ही म्हणू तसेच करा. त्यावेळी काय निर्णय झाला. त्यावेळच्या संचालक मंडळाने कुठल्या बेसिसवर असा निर्णय घेतला की, सीएमजींना सगळेच्या सगळे ए टू झेड अधिकार दिलेले आहेत. आज तुम्ही मी जे करतोय ते पहिले पाढे पंचावन्न वाचतोय. मा.महापौर साहेब,आपल्यासमोर खूप अडचणी आहेत. आत्ता काही सदस्यांनी सांगितले की, नाही नाही, तुम्ही त्यांना निर्णय घ्यायला भाग पाडलेच पाहीजे. तुम्ही बोललेच पाहीजे. बोलतोय ना. तोंड कुठे बंद आहे. परंतू मागच्यांनी जे काही केलय, त्यावेळच्या संचालक मंडळाने जे काही केलय. सगळेच अधिकार सीएमजींना देऊन टाकले आहेत आणि मोकळे झाले आहेत. आत्ता कशाकशात दुरुस्ती करतोय. एक विषय समोर आला की त्यामध्ये आपण दुरुस्ती करतोय. एक विषय समोर आला की त्यामध्ये दुरुस्ती करतोय. हे जे काय दुरुस्तीचे सत्र सुरू झाले आहे, त्याकडेसुद्धा मा.महापौर साहेब सगळ्यांचे लक्ष वेधण्याची गरज आहे आणि

म्हणून मला वाटते की, प्रशासकीय अधिकार देताना आपण सुद्धा विचार केला पाहिजे. २०१० नंतर एककल्ली कारभार करण्याचे जे सगळे अधिकार सीएमजींना दिले होते. त्यामुळे सीएमजी आग्रही होते की, मी बोनस देणार नाही. मा.महापौर साहेब,आपण त्याठिकाणी बोनस देण्याचा विषय केला. मला माहित नाही की आपण पुढच्या वेळेस काय करू शकणार आहोत. परंतु त्यामध्ये resolution करण्याची प्रचंड आवश्यकता आहे, हे याठिकाणी मला प्रकर्षाने सांगावे लागते आहे. सन्मा.एकनाथजी पवार, गटनेते यांच्या पत्रावर जवळपास ११० लोकांच्या बदल्या आपण शहरामध्ये करून घेतलेल्या आहेत. महानगरपालिकेच्या नाहीतर त्यांना पीएमपीएलच्याच आस्थापनेवर घेतलेले आहे हे या ठिकाणी मी मान्य करते. पीएमपीएमएलचे जे संचालक आहेत, ते याठिकाणी आग्रही आहेत की हे माझे कर्मचारी आहेत, माझ्या कंपनीतून त्यांना पगार मिळतो. मग मी त्यांना कुठे रुजू करून घ्यायचं हा माझा अधिकार आहे. असे असतानासुद्धा १७१ ऐवजी ११० लोक आपल्या महानगरपालिकेच्या हद्दीमध्ये बदली करून घेतलेले आहेत. ज्या महिला भगिनी आहेत,त्यांना सुद्धा घेतलेले आहे. हळूहळू आपले काम चालूच आहे. मा.महापौरसाहेब मला असं वाटतयं की, या ज्या ८०० बसेस आहेत. त्यातील २०३ बसेस आपल्या शहराला मिळणार आहेत. त्यासाठी या ठिकाणी हा विषय त्वरित मंजूर करून घ्यावा, असे मी आपल्याला सांगते. मा.महापौरसाहेब,आपण या विषयाला मंजुरी द्यावी. धन्यवाद.

**मा.योगेश बहल-**सन्मा.महापौर साहेब, मी तुमचा अधिक वेळ घेणार नाही. सर्वांनी आपली ओळख सांगितलेली आहे. अध्यक्षांनी सांगितले की काय बदल केले आहेत आणि काय करायला हवेत. जे कोणी लोक या कमिटीमध्ये आहेत त्यांना विनंती आहे की, सर्वसामान्यांच्या ज्या भावना आहेत, त्या लक्षात घेता आपण हे करावे. त्याचबरोबर नागरिकांना सुलभ व उत्तम सेवा मिळावी यासाठी आपण नेहमीच प्रयत्नशील आहोत. परंतु पीएमपीएमएलमध्ये कुछ भी कर लो हम नही सुधरेंगे अशी परिस्थिती निर्माण झालेली आहे. आपण काहीही करू शकत नाही अशी परिस्थिती निर्माण झालेली आहे. आणि या परिस्थितीमध्ये काहीतरी बदल घडवून आणला पाहिजे की. आपणही ज्यावेळेला नागरिकांच्या सेवेसाठी त्यांनी काही जरी चुकीचं केलंतरी आपण मान्य करतो. या गोष्टींमध्ये बदल होणं गरजेचं आहे आणि मा.आयुक्तसाहेब या डिपार्टमेंटमध्ये सर्वच बाबतींत नेगेटिव्हिटी आहे. माझं असं म्हणणं आहे की, जे कर्मचारी चांगल्या पद्धतीने काम करतात. प्रामाणिकपणे काम करतात. त्यांना काहीतरी एक इन्सेन्टिव्ह द्या आणि त्यांच्यामधली निगेटिव्हिटी कशी जाईल. ही एक पब्लिक सेवा आहे. आणि ती चांगल्या पद्धतीने करावी. अशा प्रकारची चेतना त्यांच्यामध्ये निर्माण व्हावी असे प्रयत्न जर आपण केलेतर ते सार्थक ठरतील. आपण हा विषय मंजूर करावा. धन्यवाद.

**मा.एकनाथ पवार**-सन्मा.महापौर साहेब,सन्मा.आयुक्त साहेब,सन्मा.सभागृह, खरेतर आज दिवस भरात पीएमपीएलच्या संदर्भामध्ये खूपच चांगली चर्चा झाली. मला मनाला वाटतेय की, कमी-अधिक प्रमाणामध्ये या विषयामध्ये एकमत असते. अशा पद्धतीने आपण पीएमपीएलला निधी देणार आहोत. या संदर्भामध्ये खरेतर माझ्या अगोदरच या सगळ्या वक्त्यांनी आपल्या कर्मचा-यांच्या संदर्भामध्ये आपले मनोगत व्यक्त केले. खरंतर या सभेपूर्वी आपले जे कर्मचारी पीएमपीएलमध्ये काम करत आहेत. मधल्या काळामध्ये ते महापालिकेच्या बरोबर काम करत होते. त्या संदर्भामधला ठराव महापालिकेच्या सभेमध्ये आपण आणला होता. खरेतर त्याच्याबद्दलची वेगळी चर्चा आता आपण

करण्याचीही गरज नाही. मला असं वाटतय की, महापालिकेचे आपले महापौर मा.नितीन काळजे आणि स्थायी समितीच्या अध्यक्षा मा.सीमाताई सावळे यांचे अभिनंदन केले पाहिजे. म्हणजे कर्मचा-यांच्या संदर्भामधली वेदना किती असते. या मधल्या काळामध्ये रोज वर्तमानपत्रामध्ये मा.मुंढे साहेब यांच्या संदर्भामध्ये सांगत होते की, पीएमपीएमएलच्या वतीने दिवाळीचा बोनस दिला जाणार नाही. मागच्या सात तारखेला पत्र दिले होते. सीएमडींना मीटिंग अरेंज करायला लावली आणि मला असं वाटतयं की, पुण्यामधल्या काही मान्यवर मंडळींचा विरोध असतानासुद्धा आपल्या कर्मचा-याच्या मागे महापौर आणि स्थायी समितीचे चेअरमन राहील्याने त्यांनी तो बोनस मंजूर करून घेतला ही आपल्या सगळ्यांसाठी महत्त्वाची गोष्ट आहे. खरेतर पुणे आणि पिंपरी-चिंचवडमध्ये दळणवळण सुधारण्याची गरज आहे का तर शंभर टक्के आहे. पीएमपीएमएलच्या चांगल्या बसेस आल्या पाहिजेत. सर्वच सन्माननीयांनी सांगितले की, आम्हाला चांगल्या बसेसच्या माध्यमातून मग तो बसच्या कलरचा प्रश्न असेल, किंवा बसमधून चांगल्या सुविधांचा प्रश्न असेल. आम्हाला असं वाटतयं की, पीएमपीएमएलने पुण्यामध्ये निश्चित धोरणही निश्चित केले पाहिजे. आपण निगडीपासून दापोडी पर्यंत पाच मिनिटांत जाऊ शकू. पण दापोडीपासून आपल्याला पुण्यामध्ये पदार्पण करायचे असेलतर एकेक तास थांबायला लागते. मला वाटतेय की, पुणे आणि पिंपरी-चिंचवड महानगरपालिकेने मागील काळामध्ये एक चांगले नियोजन केले असतेतर आपण पीएमपीएमएलच्या माध्यमातून निश्चितच एक चांगला प्रवास करतो. मला खात्री आहे, आपण हे लक्षात ठेवावे की,आपल्या सगळ्यांच काही मुद्यांवर चांगल मत आहे. म्हणजे पुणे आणि पिंपरी यादरम्यानचे दळणवळण नीट करायचे असेलतर आपण पीएमपीएमएलच्या माध्यमातून चांगले करू शकतो. माझी पीएमपीएलच्या अधिका-यांना विनंती पण आहे आणि सूचनाही आहे की, आपण हे लक्षात ठेवा की, जर तुम्ही कर्मचा-यांवर मुद्दाम अन्याय करणार असालतर पैसे देणार नाही अशी परिस्थिती नाही. पिंपरी-चिंचवडच्या महापालिकेतील सर्वसामान्य माणसाला चांगली सुविधा देण्याचे कर्तव्य आपलं आहे. परंतू ते कर्मचारी पण आपले आहेत. एखादा कर्मचारी जर तळेगावला राहतो आणि मुद्दाम जर आपण बदली करून त्याला त्रास देणार असालतर, मला असे वाटते की, तुम्हालाही त्रास देण्याची पद्धत आम्हाला या महापालिकेच्या सभागृहाच्या माध्यमातून करता येऊ शकते. अशा पद्धतीने कुठल्याही कर्मचा-यांना त्रास देण्याची कृति खरतर पुढच्या काळामध्ये नसली पाहिजे याची आपण काळजी घ्या. आणि माझी मा.महापौर यांना विनंती आहे की, खरेतर या दृष्टीने मी कमिशनर साहेबांनाही सांगितलं होते. आपण त्यांना पैसे देऊ. परंतु जर १६० कोटींच्या माध्यमातून आपल्या महापालिकेच्या वतीने जर बस घेतल्या असत्यातर मला वाटतं की, त्या शहरातल्या वेगवेगळ्या भागांमध्ये पुरवल्या गेल्या असत्या. पीएमपीएमएलच्या माध्यमातून आपल्या शहरामधल्या या रस्त्यांवर या छोट्या-छोट्या बसेस धावतील, अशा पद्धतीचं त्यांनी प्लानिंग करावं आणि या शहराच्या दृष्टीने सर्वसामान्य माणसाला परवडेल अशी दळणवळण व्यवस्था निर्माण करावी. यासाठी मा.महापौर साहेब आपण हा विषय मंजूर करावा, अशी मी विनंती करतो. धन्यवाद.

**मा.महापौर** - हा विषय मंजूर करण्यात येत आहे.

यानंतर सदर ठराव मतास टाकणेत आला असता –

अनुकूल-८१ प्रतिकूल- ०

अशी मते पडली व सदर ठराव सर्वानुमते मान्य झाल्याचे मा.महापौर यांनी प्रकट केले.

-------

**मा.मनिषा पवार-**मा.महापौर साहेब,विषय क्रमांक १०वर मी पुढीलप्रमाणे ठराव मांडते.

ठराव क्रमांक - ९३ विषय क्रमांक – १०

दिनांक- १६/१०/२०१७ विभाग- मा.आयुक्त

संदर्भ- १) मा.महापालिका आयुक्त यांचेकडील लेखा/३५/कावि/८१५३/२०१७ दि.१९/०९/२०१७

मा.सहशहर अभियंता जलनि:सारण विभाग यांच्या कडील दि. 16/9/2017 च्या पत्रा मध्ये नमुद केले प्रमाणे पिंपरी चिंचवड महानगरपालिकेच्या वतीने राष्ट्रीय नागरी सुधारणा अभियान (अमृत) अंतर्गत पिंपरी चिंचवड मनपा हददीतील मलनि:सारण व्यवस्थेत सुधारणा करणे व प्रकल्प राबविणे बाबत (Rehabilitation of sewerage system in old areas of PCMC) योजनेचा सविस्तर प्रकल्प अहवाल शासन मंजूरीसाठी सादर करण्यात आलेला असून नजीकच्या काळात मंजूरी मिळणे अपेक्षित आहे. त्याकामी महानगरपालिकेच्या सन 2017-18 च्या अंदाजपत्रकामधे सदर कामाचा समावेश करुन अंदाजपत्रकीय तरतुद करणे आवश्यक आहे. त्याकामी सन 2017-18 च्या अंदाजपत्रकातील पान क्रमांक 671 अ.क्र. 19 (1) वरील राष्ट्रीय नागरी सुधारणा अभियान (अमृत) अंतर्गत पाणीपुरावठा योजना राबविणे याकामासाठी र.रु. 85 कोटी एवढी तरतुद करणेत आलेली आहे. सदर कामामधून र.रु. 10 कोटी कमी करुन राष्ट्रीय नागरी सुधारणा अभियान (अमृत) अंतर्गत पिंपरी चिंचवड मनपा हददीतील मलनि:सारण व्यवस्थेत सुधारणा करणे व प्रकल्प राबविणे (Rehabilitation of sewerage system in old areas of PCMC) याकामाचा समावेश करुन र.रु. 10 कोटी इतकी तरतुद वर्ग करण्याकामी असे कळविले आहे.

तरी राष्ट्रीय नागरी सुधारणा अभियान (अमृत) अंतर्गत पाणीपुरावठा योजना राबविणे याकामासाठी र.रु. 85 कोटी एवढी तरतुद ठेवली असून त्या मधील सदर कामामधून र.रु. 10 कोटी कमी करुन राष्ट्रीय नागरी सुधारणा अभियान (अमृत) अंतर्गत पिंपरी चिंचवड मनपा हददीतील मलनि:सारण व्यवस्थेत सुधारणा करणे व प्रकल्प राबविणे वरील प्रमाणे तरतुद उपलब्ध करुन देणे साठी महाराष्ट्र महानगरपालिका अधिनियमातील कलम १०३ अनुसूची ड मधील प्रकरण-७ तरतूद-२ भांडवली लेखाशिर्षाबाबतचे अधिकार मा.महापालिका सभेस असल्याने मान्यता देणेत येत आहे.

**मा.माधवी राजापुरे** – मा.महापौर साहेब, ठरावाला अनुमोदन आहे.

यानंतर सदर ठराव मतास टाकणेत आला असता -

अनुकूल-८१ प्रतिकूल- ०

अशी मते पडली व सदर ठराव सर्वानुमते मान्य झाल्याचे मा.महापौर यांनी प्रकट केले.

**मा.सुजाता पालांडे -** मा.महापौर साहेब,विषय क्रमांक ११वर मी पुढीलप्रमाणे ठराव मांडते.

विषय क्रमांक – ११

दिनांक- १६/१०/२०१७ विभाग- मा.आयुक्त

संदर्भ-१)मा.महापालिका आयुक्त यांचेकडील क्र.मातंवि/१२/कावि/२९८/१७दि.१९/०९/२०१७

महापालिकेचे सन २०१७-१८ चे अंदाजपत्रक मा. महापालिका सभेपुढे मा. आयुक्त यांनी मा. स्थायी समिती मार्फत सादर केलेले आहे. व त्यास मा. महापालिका सभेने मान्यता दिलेली आहे. तथापि, सदरचे अंदाजपत्रकात महापालिकेमार्फत विविध विभागांमार्फत केंद्रशासन व राज्यशासनाचे अभियान/प्रकल्पांचे तसेच महापालिकेचे स्थापत्य, विद्युत, पाणीपुरवठा, जलनि:स्सारण इ. विभागांचे प्रकल्पांचे कामकाज हाती घेणेत येते. याव्यतिरिक्त जेएनएनयुआरएम, अमृत अभियान, स्वच्छ भारत अभियान, स्मार्ट सिटी अभियान, प्रधानमंत्री आवास योजना महानगरपालिका कार्यक्षेत्रामध्ये राबविणेकरिता प्रयत्नशिल आहे. सदरचे प्रकल्प कालमर्यादित व वेळेत पूर्ण करणेसाठी या कामासाठी राष्ट्रीय व आंतरराष्ट्रीय दर्जाचे सल्लागार संस्थेची मदत घेणे आवश्यक आहे. त्यामुळे,सन २०१७-१८ चे अंदाजपत्रकात **"सिटी ट्रान्फॉर्मेशन ऑफिस (City Transformation Office)"** हे नवीन लेखाशिर्ष निर्माण करणे व प्रशासकीय मान्यता मिळणे आवश्यक आहे.

सबब, सन २०१७-१८ चे अंदाजपत्रकात **अंदाजपत्रक – २ :महसुली जमा खर्च सन २०१७-१८, पान क्र. १२२ व पान क्र. १२३, अनुक्रमांक ५० - माहिती व तंत्रज्ञान विभागाकडे (अ.क्र.१२ वर) "सिटी ट्रान्फॉर्मेशन ऑफिस (City Transformation Office)" नवीन लेखाशिर्ष निर्माण करुन त्यावर तीन वर्ष कालावधीसाठी प्रशासकीय मान्यता र.रू १४.३१ कोटी यास मान्यता देणेत येत आहे.**

**मा.मनिषा पवार** – मा.महापौर साहेब, ठरावाला अनुमोदन आहे.

**मा.आरती चोंधे**- मा.महापौर साहेब,मी पुढीलप्रमाणे उपसूचना मांडते-सन २०१७-१८ या आर्थीक वर्षात खालील नमूद केलेल्या कामांची आवश्यकता असून नागरिकांच्या सोयीसाठी सदरची कामे करणे गरजेचे आहे.

| अ.क्र. | कामाचे नाव | पा.क्र./ अनु.क्र. | प्रशासकीय मान्यता | वाढीव प्रशासकीय मान्यता | एकूण आवश्यक प्रशासकीय मान्यता |
|---|---|---|---|---|---|
| १ | प्रभाग क्र. १९ वाल्हेकरवाडीमधील चिंतामणी गणेश मंदीर, आहेरनगर, राजनगीगंधा हौ.सोसायटी, शिवाजीपार्क इ. परिसरातील अंतर्गत रस्ते डांबरीकरण करणे. | ११०/६९ | २५,००,००० | ७०,००,००० | ९५,००,००० |

| | | | | | |
|---|---|---|---|---|---|
| २ | प्रभाग क्र. १९ वाल्हेकरवाडी मधील वाल्हेकरवाडी मनपा शाळा ते गावठाणपर्यंतचा रस्ता डांबरीकरण करणे | १११/७२ | २५,००,००० | ७२,००,००० | ९७,००,००० |
| ३ | प्र.क्र.१९ वाल्हेकरवाडी मधील वाल्हेकरवाडी गावठाण इ. परिसरात ठिकठिकाणी पेव्हींग ब्लॉक बसविणे पाथवे दुरुस्ती व स्थापत्य विषयक कामे करणे. | ११८/४१ | १५,००,००० | ५३,००,००० | ६८,००,००० |
| ४ | प्र.क्र. १९ वाल्हेकरवाडी मधील विवीध ठिकाणी देखभाल दुरुस्ती सुधारणा व स्थापत्य विषयक कामे करणे. | १३०/६४ | १५,००,००० | ३९,००,००० | ५४,००,००० |
| ५ | प्र.क्र. २१ मध्ये ठिकठिकाणी नाले बांधणे. | १४४/०६ | १,००,००० | ८९,००,००० | ९०,००,००० |

तरी वर नमुद केलेप्रमाणे सन २०१७-१८ च्या मुळ अर्थसंकल्पात सदर कामांना वाढीव प्रशासकीय मान्यता देणेत यावी. तसेच प्रभाग क्र.५७ पिंपळे गुरव (नवीन प्रभाग क्र.३१) येथील आवश्यकतेनुसार स्थापत्य विषयक कामांचा अंदाजपत्रकामध्ये समावेश करुन सुधारीत रक्कमेस प्रशासकिय मान्यता देणेत यावी.

| अ. क्र. | कामाचे नाव | पान क्र. | अ.क्र. | अंदाजपत्रकीय रक्कम | सुधारीत अंदाजपत्रकीय रक्कम |
|---|---|---|---|---|---|
| १ | प्रभाग क्र.५७ (नवीन प्रभाग ३१) पिंपळे गुरव मधील बँक ऑफ महाराष्ट्र ते ओरीयाना इमारतीपर्यंतचा रस्ता अद्यावत पद्धतीने विकसित करणे. | - | - | १०,००,००,००० | १०,००,००,००० |
| २ | प्रभाग क्र.५७ (नवीन प्रभाग ३१) पिंपळे गुरव मधील काटेपुरम चौक तेमनपा शाळा पर्यंतचा रस्ता अद्यावत पद्धतीने विकसित करणे. | - | - | १०,००,००,००० | १०,००,००,००० |

तरी पिंपळे गुरव, नवी सांगवी भागातील विकास कामाची आवश्यकता असून उपरोक्त ठिकाणी काम करणेस सुधारीत अंदाजपत्रकीय रक्कमेस प्रशासकीय मान्यता देणेत यावी. तसेच मनपा परिसरातील विविध भागामध्ये आवश्यकतेनुसार स्थापत्य विषयक कामांचा अंदाजपत्रकामध्ये समावेश करुन सुधारीत रक्कमेस प्रशासकीय मान्यता देणेत यावी.

| अ.क्र. | कामाचे नाव | पान क्र. | अ.क्र. | अंदाजपत्रकीय रक्कम | सुधारीत अंदाजपत्रकीय रक्कम |
|---|---|---|---|---|---|
| १ | ह प्रभागात ठिकठिकाणी आवश्यकतेनुसार डांबरीकरण करणे. | - | - | ५,००,००,००० | ५,००,००,००० |
| २ | ब प्रभागात ठिकठिकाणी आवश्यकतेनुसार डांबरीकरण करणे. | - | - | ५,००,००,००० | ५,००,००,००० |
| ३ | ड प्रभागात ठिकठिकाणी आवश्यकतेनुसार डांबरीकरण करणे. | - | - | ५,००,००,००० | ५,००,००,००० |
| ४ | ग प्रभागात ठिकठिकाणी आवश्यकतेनुसार डांबरीकरण करणे. | - | - | ५,००,००,००० | ५,००,००,००० |
| ५ | क प्रभागात ठिकठिकाणी आवश्यकतेनुसार डांबरीकरण करणे. | - | - | ५,००,००,००० | ५,००,००,००० |

वरील प्रभागातील विकास कामांची आवश्यकता असून उपरोक्त ठिकाणी काम करण्याची आवश्यकता असून सुधारीत अंदाजपत्रकीय रक्कमेस प्रशासकीय मान्यता देणेत यावी. तसेच काळेवाडी फाटा (धर्मवीर संभाजी महाराज चौक) येथे वाकड कस्पटेवस्ती ते पिंपरी (काळेवाडी) ग्रेड सेपरेटर बांधणे या कामासाठी स्थापत्य भांडवली खर्च शहर विकास आराखडा या लेखाशिर्षांतर्गत र.रु.१४ कोटीच्या खर्चास प्रशासकीय मान्यता देणेत यावी. तसेच नाशिकफाटा ते वाकड बीआरटीएस रस्त्यालगत उच्चतम द्रुतगती मार्ग (HCMTR) रस्त्याचे क्षेत्रामध्ये असलेला नाला पाईप टाकुन बंदिस्त करणे – या कामास प्रशासकीय मान्यता मिळणेबाबत या नविन कामासाठी स्थापत्य भांडवली खर्च शहर विकास आराखडा या लेखाशिर्षा अंतर्गत र.रु. २ कोटी चे खर्चास प्रशासकीय मान्यता देणेत यावी. तसेच पिंपरी चिंचवड महानगरपालिकेच्या विकास आराखडयातील रस्ते व आरक्षणे विकसीत करण्याबाबत मा.स्थायी समिती सभेच्या सूचना आहेत. सबब सन २०१७-१८ च्या अंदाजपत्रकात समावेश असलेली कामे परंतु कमी प्रशासकीय मान्यता असलेल्या कामांची यादी खालीलप्रमाणे आहे. सदरची कामे ब क्षेत्रीय कार्यालयाअंतर्गत करावयाची आहेत. सदर कामासाठी सल्लागार नेमुन अंदाजपत्रक तयार करण्याचे काम चालू आहे त्याकरिता सदर कामास सुधारीत प्रशासकीय मान्यता मिळणे आवश्यक आहे. सन २०१७-१८चे भांडवली अंदाजपत्रकामध्ये खाली नमुद केलेल्या कामांना

अंदाजपत्रकीय रक्कमेच्या रकान्यामध्ये असलेल्या रक्कमेत कामाच्या नावासमोर दर्शविलेल्या सुधारीत अंदाजपत्रकीय रक्कमेस प्रशासकीय मान्यता देणेत यावी.

| अ.क्र. | लेखाशिर्ष | अंदाजपत्रक पानांक | मुळ अंदापत्रकीय रक्कम | सुधारीत अंदाजपत्रकीय रक्कम |
|---|---|---|---|---|
| १ | जुन्या तालेरा हॉस्पिटलची इमारत पाडून नवीन इमारत बांधणे | ७०/१६/५ | २६,००,००,०००/- | ७१,५०,००,०००/- |

तसेच सन २०१७-१८ या आर्थिक वर्षात खालील नमुद केलेल्या कामांची आवश्यकता असून नागरिकांच्या सोयीसाठी सदरची कामे करणे गरजेचे आहे.

| **अनु क्र.** | **कामाचे नाव** | **पान क्र. / अनु.क्र.** | **प्रशासकीय मान्यता** | **वाढिव प्रशासकीय मान्यता** | **एकूण आवश्यक प्रशासकीय मान्यता** |
|---|---|---|---|---|---|
| १ | पिंपळे सौदागर प्रभाग क्र.५५ मधील कोकणे चौक ते रहाटणी चौकापर्यंतचा रस्ता यु.टी.डब्ल्यु.टी. पध्दतीने विकसीत करणे. | 52/252 | 5,00,00,000 | 3,00,00,000 | 8,00,00,000 |
| २ | पिंपळे सौदागर प्रभाग क्र.५५ मधील झरवरी रस्ता यु.टी.डब्ल्यु.टी. पध्दतीने विकसीत करणे. | 52/253 | 2,00,00,000 | 5,00,00,000 | 7,00,00,000 |

तरी वर नमूद केलेप्रमाणे सन २०१७-१८ च्या मुळ अर्थसंकल्पात सदर कामांना वाढीव प्रशासकीय मान्यता देणेत यावी. तसेच पुणे मुंबई महामार्गावरील निगडी ते दापोडी यारस्त्यावरील वल्लभनगर पिंपरी येथील सबवेचे सुशोभीकरण करणे व इतर अनुषंगीक कामे करणे या नवीन कामासाठी स्थापत्य विषय योजना या लेखाशिर्षांतर्गत र.रु.१ कोटीचे खर्चास प्रशासकीय मान्यता देणेत यावी. तसेच सदर काम करणेस मनपाचे सन २०१७-१८ च्या अंदाजपत्रकातील काम बोपखेल येथील मुळा नदीवरील पुलाला जोडरस्ता व सर्व्हीस रस्ता करणे

लेखाशिर्ष स्थापत्य विषयक योजना पान क्र.६७ अ.क्र. १८५ मधील तरतूद र.रु. ४ कोटी मधुन र.रु. ६० लाख तरतूद करणेस मान्यता देणेत यावी. तसेच सन २०१७-१८ या आर्थिक वर्षात खालील नमुद केलेल्या कामांची आवश्यकता असून नागरीकांच्या सोयीसाठी सदरची कामे करणे गरजेचे आहे.

| अनु क्र. | कामाचे नाव | पान क्र. / अनु क्र. | प्रशासकीय मान्यता | वाढिव प्रशासकीय मान्यता | एकूण आवश्यक प्रशासकीय मान्यता |
|---|---|---|---|---|---|
| १ | प्रभाग क्र.५५ पिंपळे सौदागर मधील आरक्षण क्र.६५५ येथे शाळा इमारत बांधणे. (वाढीव प्राथमिक शाळा) | ६३६ / १२ | १,००,००,००० | २,००,००,००० | ३,००,००,००० |
| २ | प्रभाग क्र.५५ रहाटणी गावठाण येथील स्मशानभूमीमध्ये वेटींग शेड बांधणे, अग्नीकुंड, व इतर स्थापत्य विषयक कामे करणे. | ६३८ / १३ | ५०,००,००० | २,५०,००,००० | ३,००,००,००० |

तरी वर नमूद केलेप्रमाणे सन २०१७-१८ च्या मुळ अर्थसंकल्पात सदर कामांना वाढीव प्रशासकीय मान्यता देणेत यावी. तसेच पिंपरी चिंचवड महानगरपालिका ‘अ’क्षेत्रीय कार्यालय अंतर्गत नवीन प्रभाग क्र.१९ मध्ये प्रा.रामकृष्ण मोरे प्रेक्षागृह आहे. सदर प्रेक्षागृहाचे नुतनीकरण करणेकामी अंदाजपत्रक-३,सन २०१७-१८ मध्ये लेखाशिर्ष – स्थापत्य विशेष योजना, पान क्र. ७०, अ.क्र. ११ वर “ प्रभाग क्र. २४ **(**रामकृष्ण मोरे प्रेक्षागृह) येथील रामकृष्ण मोरे नाटयगृहाचे नुतनीकरण करणे” असे कामाचे लेखाशिर्ष उपलब्ध आहे. सदर कामास प्रशासकीय मान्यता (अंदाजपत्रकीय रक्कम) र.रू.१२.५० कोटी इतकी आहे. सदर कामास वास्तुविशारद म्हणुन “ मे.किमया आर्किटेक्ट ” यांची नेमणुक यापुर्वी केलेली आहे. सदर कामाचे ड्रॉईंग व डिझाईन नुसार सुमारे अंदाजपत्रकीय खर्च एकुण र.रू.२०.०० कोटी इतका येत आहे. तरी सदर कामास अंदाजपत्रकीय र.रू.७.५० कोटी इतकी प्रशासकीय मान्यता कमी पडणार आहे. तरी सदर कामास सुधारीत प्रशासकीय मान्यता (अंदाजपत्रकीय रक्कम) र.रु.२०.०० कोटी आवश्यक असल्याने त्यास मान्यता देणेत यावी. तसेच पिंपरी चिंचवड महानगरपालिका **‘अ’** क्षेत्रिय कार्यालय अंतर्गत नवीन प्र. क्र. १९ मध्ये ब प्रभाग कार्यालयाची जुनी इमारत (शेड) आहे. सदर ठिकाणी नवीन इमारत बांधणेकरीता अंदाजपत्रक-३,सन २०१७-२०१८ मध्ये लेखाशिर्ष – भांडवली खर्च (इमारत योजना), पान क्र. १५४, अ.क्र. २५ वर “ ब प्रभाग कार्यालयासाठी

नविन प्रशासकिय इमारत बांधणे” असे कामाचे लेखाशिर्ष उपलब्ध आहे. सदर कामास प्रशासकीय मान्यता र.रू.१०.०० कोटी इतकी आहे. सदर कामास वास्तुविशारद म्हणुन “ मे. किमया आर्किटेक्ट ” यांची नेमणुक यापुर्वी केलेली आहे. सदर कामाचे ड्रॉईंग व डिझाईन नुसार सुमारे अंदाजपत्रकीस खर्च एकुण र.रू. ३५.०० कोटी इतका येत आहे. तरी सदर कामास अंदाजपत्रकीय र.रू. २५.०० कोटी इतकी प्रशासकीय मान्यता कमी पडणार आहे. तरी सदर कामास सुधारीत प्रशासकीय मान्यता (अंदाजपत्रकीय रक्कम) र.रु.३५.०० कोटी आवश्यक असल्याने त्यास मान्यता देणेत यावी. तसेच प्रभाग क्र.३ च-होली मोशी येथील विकास आराखडयातील रस्ते पुर्ण विकसीत करणेकरिता खालील कामांना नावात बदल व प्रशासकीय मान्यता वाढविण्याची आवश्यकता आहे.

| अ.क्र. | कामाचे नाव | पानांक | अ.क्र. | मुळ प्रशासकीय मान्यता | आवश्यक प्रशासकीय मान्यता र.रु. |
|---|---|---|---|---|---|
| १ | प्रभाग क्र. ६ डूडूळगाव येथील १८ व २४ मी. विकास आराखडयातील मोशी आळंदी रस्ता ते माऊलीनगर ते पुणे आळंदी रस्ता विकसीत करणे. | २८३ | १६७ | १५,००,००,००० | ५०,००,००,००० |
| २ | प्रभाग क्र.७ च-होली, दत्तनगर (काळीभींत रस्ता) विकास आराखडयातील रस्ता १८ मीटर विकसीत करणे. | ३८ | ३३३ | १०,००,००,००० | २०,००,००,००० |
| ३ | प्रभाग क्र. ७ च-होली, बुर्डेवस्ती मुख्य रस्ता ते सर्व्हे नं. ८७ येथील १८ मी. विकास आराखडयातील रस्ता विकसीत करणे. | ३७ | ३१५ | ७,००,००,००० | ३०,००,००,००० |
| ४ | प्र.क्र. ७ च-होली येथील हिरामाता पुल, खडकवासला वस्तीतील | ३२ | २०८ | ५,००,००,००० | ४०,००,००,००० |

| | | | | | |
|---|---|---|---|---|---|
| | ९० मी. डीपी पर्यंत रस्ता विकसीत करणे. | | | | |
| ५ | प्र.क्र. ६ डुडूळगाव येथील सर्व्हे क्र. १३४ ते १८६ विकास आराखडयातील १८ मी. रस्ता विकसीत करणे तसेच गट क्र. ५१ ते ७६ पर्यंतचा १८ मी. रस्ता विकसीत करणे. | ३७ | ३११ | ५,००,००,००० | २५,००,००,००० |
| ६ | प्र.क्र ३ मोशी येथील आरक्षण क्र. १/१७५ येथे खेळाचे मैदान व जलतरण तलाव बांधणे | ३८ | १० | २,५०,००,००० | ७,००,००,००० |
| ७ | प्र.क्र. ६ मोशी येथील भाजीमंडईचा विस्तार करणे व इतर कामे करणे. | २६६ | १ | १,००,००,००० | ५,००,००,००० |
| ८ | प्र.क्र.७ च-होली येथील स.नं. १०१३ ते ८ पर्यंतचा १८ मी. रस्ता विकसीत करणे (स्मशानभूमीकडील रस्ता) | ८२ | २० | १०,००,००,००० | २०,००,००,००० |

उपरोक्त कामांच्या समोर दर्शवलेल्या रक्कमेस प्रशासकीय मान्यता देणेत यावी. तसेच प्रभाग क्र.५७ पिंपळेगुरव (नवीन प्रभाग क्र.३१) येथील स्थापत्य कामाच्या अंदाजपत्रकामध्ये रक्कमेस सुधारित प्रशासकीय मान्यता देणेत यावी.

| अ.क्र. | कामाचे नाव | पानांक | अ.क्र. | अंदाजपत्रकीय रक्कम | सुधारीत अंदाजपत्रकीय रक्कम |
|---|---|---|---|---|---|
| १ | प्रभाग क्र. ५७ पिंपळेगुरव रस्त्याच्या कडेने पेव्हींग ब्लॉक बसविणे व अदयावत पध्दतीने विकसीत करणे. | २३७ | ५ | २०,००,००० | ५,००,००,००० |

| | | | | | |
|---|---|---|---|---|---|
| २ | प्रभाग क्र. ५७ पिंपळेगुरव येथील विनायक नगर कवडेनगर व इतर भागात पेव्हींग ब्लॉक बनवणे व अदयावत पध्दतीने विकसीत करणे | २३८ | ६ | २०,००,००० | १०,००,००,००० |
| ३ | प्रभाग क्र. ५८ नवी सांगवी येथील रस्त्याचे विशेष दुरुस्ती कामे करणे | १८१ | १५८ | १०,००,००० | ५,००,००,००० |

पिंपळेगुरव नवी सांगवी भागातील विकास कामाची आवश्यकता असून उपरोक्त ठिकाणी काम करणेस सुधारीत अंदाजपत्रकीय रक्कमेस व सदर कामास प्रशासकीय मान्यता देणेत यावी. तसेच प्रभाग क्र.४ कृष्णानगर मधील से.क्र.१८,१९ व २० मध्ये मोकळया जागा प्राधिकरणाकडून मनपास हस्तांतरीत झालेल्या आहेत. सदर जागेचे सपाटीकरण करुन जॉगींग ट्रॅक करणेकामी सन २०१७-१८ चे अंदाजपत्रकात कामाचा समावेश असून त्याकरिता मा.महापालिका सभा ठराव क्र. ४२ दि.२०/६/२०१७ अन्वये र.रु.२,००,००,००० /- इतकी प्रशासकीय मान्यता मिळालेली आहे. तथापि प्रत्यक्ष कामाची व्याप्ती जादा असल्याने सदरची प्रशासकीय मान्यता प्रत्यक्ष काम करणेकरिता अपुरी आहे. सदर कामावर सन २०१७-१८ चे अंदाजपत्रकात र.रु.४,००,००,०००/- इतकी तरतूद मा.स्थायी समिती ठराव क्र.८५१ दि.२३/८/२०१७ अन्वये करणेत आलेली आहे. सदर ठिकाणचे सर्व मोकळया जागेचे सपाटीकरण,सिमाभींत व जाँगींक ट्रॅक करणेकामी अंदाजे र.रु.६,००,००,०००/- इतकी कामाची अंदाजपत्रकीय रक्कम येत आहे. त्यामुळे उपरोक्त कामाचे मुळ अंदाजपत्रकीय र.रु. २,००,००,०००/- ऐवजी सुधारीत र.रु.६,००,००,०००/- करणेस मान्यता देणेत येत आहे. तसेच चिखली से.क्र.१७ व १९ येथे जेएनएनयुआरएम अंतर्गत महानगरपालिकेमार्फत आर्थीकदृष्टया दुर्बल घटकांसाठी (ईडब्ल्यूएस) गृहप्रकल्प राबवणेत येत आहे. सदर प्रकल्पातील विवीध सुविधा भूखंडावर खालीलप्रमाणे सुविधा पुरवणे गरजेचे असून सन २०१७-१८ चे अंदाजपत्रकात सदर कामांचा अंतर्भाव करणेत आला असून त्यांचे अंदाजपत्रकीय किमंतीत खालीलप्रमाणे बदल सुचवणेत येत आहे. या गृहप्रकल्पात एकूण ६६३६ सदनिकांपैकी ४५०० सदनिकांचे वाटप झालेले आहे.

| अ.क्र. | कामाचे नाव | अंदाजपत्रकीय रक्कम | शेरा |
|---|---|---|---|
| १ | दवाखाना | २,२०,११,९०० | |
| २ | भाजीमंडई | ३,१५,७३,००० | |
| ३ | टाऊनहॉल | १०,७२,९५,७०० | |

त्यामुळे सदर सुविधा भुखंडावरील इमारतीचे बांधकाम या वर्षात सुरु करणेकामी सदरचे अंदाजपत्रकीय खर्चास प्रशासकीय मान्यता देणेत यावी.

**मा.निर्मला कुटे** – मा.महापौर साहेब, उपसूचनेला अनुमोदन आहे.

**मा.योगेश बहल-**मा.महापौर साहेब,मा.आयुक्त साहेब,सर्व सन्मा.सभागृह,मुळात माहिती व तंत्रज्ञान विभाग सिटी ट्रान्सफॉर्मेशन ऑफिसचा हा विषय नवा आहे. परंतू त्याला ढिगभर उपसूचना दिल्या आहेत. या उपसूचनांच्या माध्यमातून किती कोटींचा भ्रष्टाचार केला आहे हे सभागृहाला सांगा. मा.आयुक्त साहेब, सिटी ट्रान्सफॉर्मेशन ऑफिसबाबत आपण सांगताना सांगितले आहे की, राज्य शासनाचे प्रकल्प तसेच महापालिकेचे स्थापत्य, विद्युत, पाणीपुरवठा, जलनिःसारण इ. विभागांच्या प्रकल्पांचे कामकाज हाती घेण्यात येते आहे. याव्यतिरिक्त अमृत योजना, स्वच्छ भारत अभियान, स्मार्ट सिटी अभियान, पंतप्रधान आवास योजना महापालिका कार्यक्षेत्रात राबविण्यास प्रयत्नशील आहे. सदर प्रकल्प कालमर्यादित व वेळेत पूर्ण करण्यासाठी राष्ट्रीय, आंतरराष्ट्रीय दर्जाचे सल्लागार/संस्था यांची मदत घेणे आवश्यक आहे. त्यामुळे सन २०१७-१८ च्या अंदाजपत्रकात, सिटी ट्रान्सफॉर्मेशन ऑफिस हे नवीन लेखाशिर्ष निर्माण करणे व प्रशासकीय मान्यता मिळवणे. आपला कन्सेप्ट चांगला आहे. नवीन आहे. Actually, this work supposed to do under this. That is we want to do.

**मा.महापौर** - मा.आयुक्त साहेब, या विषयाची माहिती द्यावी.

**मा.आयुक्त** – सन्मा.महापौर साहेब,सन्मा.सभागृह, पिंपरी चिंचवड महानगरपालिका ही नव्यानेच स्मार्ट सिटी मध्ये समावेशित झालेली आहे आणि स्मार्ट सिटीचा टप्प्याटप्प्याने अंमलबजावणी करत असताना आपल्या शहराची झपाट्याने होणारी वाढ, विविध विषयांतर्गत घनकचरा असेल, स्वच्छता असेल,आरोग्य असेल,पाणीपुरवठा असेल,जलनिस्सारण असेल,ट्रान्स्पोर्टेशन असेल किंवा आरक्षणांचा विकास असेल,Affordable हाऊसिंग असेल अशा अनेक प्रकारचे जे विषय आपल्यासमोर आले आहेत. हे एकाच गोष्टीचं द्योतक आहे की,पिंपरी चिंचवड शहर हे नागरिकांच्या पसंतीचं शहर आहे. वेगानं आणि झपाट्याने वाढणारे शहर आहे. आणि ज्या वेगाने आपले शहर वाढते आहे,त्या वेगाने सुविधा देण्यासाठी आपण जर सक्षम बनायचं असेल तर, स्ट्रॅटेजिकली आपल्याला प्लॅनिंग करणं, आपण केलेल्या गोष्टींच्या अनुषंगाने शेल्फ ऑफ वर्क तयार करून घेणं, शेल्फ ऑफ वर्क जो तयार होईल त्याची अंमलबजावणी करणं आणि अनेक वर्षांच्या अनुभवातून आपल्याला लक्षात आलेले आहे की, अनेक वेळेला प्रकल्प राबवताना आपण मुदतीमध्ये अनेक प्रकल्प पूर्ण करू शकलेलो नाही. आपल्याला वेळोवेळी मुदतवाढ द्यावी लागलेली आहे. कुठलाही प्रकल्प हा मुदतीत पूर्ण करणे की जेणेकरून वित्तीय देखील बचत होईल, अशा स्वरूपाची जर अंमलबजावणी करायची असेल तर एक सपोर्ट सिस्टीम एक्स्पर्ट सपोर्ट सिस्टीमची आवश्यकता आहे. अनेक वेळेला आपल्याला काही कन्सल्टंट लावावे लागतात. पण आज ज्या झपाट्याने अर्बन डेव्हलपमेन्ट या क्षेत्रामध्ये तांत्रिक ज्ञानाचा वापर केला जातो आहे, या अनुषंगाने आपल्याला देशविदेशातील अनुभव असलेले देखील काही अर्बन डेव्हलपर्स, अर्बन डेवलपमेंट आणि प्लॅनिंग एक्सपर्टस् आणावे लागतील. हे होत असतानाच आज नवीन स्मार्ट सिटी अंतर्गत जी बाब आपल्यासमोर आलेली आहे,ती प्रभावी पद्धतीने सिटिझन एंगेजमेंट झालीतर, प्रत्येक टप्प्यावर प्रत्येक कामाच्या नियोजनापासून ते कामाच्या अंमलबजावणीपर्यंत आणि अंमलबजावणीनंतर त्याच्या ऑडिटपर्यंत आपल्याला सिटीझन एंगेजमेंट घेता येऊ शकते. हा महत्वाचा भाग जर पहिल्याच दिवसापासून घेतला तर, यामध्ये सन्मा.पदाधिकारी असतील,लोकप्रतिनिधी असतील,या भागातील नागरिक असतील,विविध Stakeholders असतील. आपल्या शहरांमध्ये दोन अन्य प्लॅनिंग authorities महत्त्वाच्या आहेत.

आपल्या इथे पीसीएमसी आहे. आपल्या इथे एमआयडीसी आहे. यासोबतच कॅन्टोन्मेंट क्षेत्र आहे. अशा अनेक प्रकारच्या एजन्सीजना समोर घेऊन, भविष्याचा वेध घेवुन ख-या अर्थाने स्मार्ट सिटी म्हणून विकास करायचा असेलतर सिटी ट्रान्सफॉर्मेशन ऑफिस म्हणून एक संकल्पना आपण पुढे आणतो आहोत. यामध्ये पहिल्या दोन टप्प्यांमध्ये कार्यक्रमाची अंमलबजावणी प्रस्तावित आहे. पहिला टप्पा हा strategy प्लॅनिंगचा असेल ज्याच्यामध्ये आपण लाॅ ग टर्म प्लॅन,मिड टर्म प्लॅन, शॉर्ट टर्म प्लॅन, आणि शेल्फ ऑफ वर्क आयडेंटिफाय करू. लोकसहभागातून,कन्सल्टेशनमधून जे महत्वाचे प्रकल्प आहेत, पाणीपुरवठ्याचे असतील, जलनिस्सारणचे असतील, घनकच-याचे असतील,चालू असतील किंवा भविष्यात घ्यावयाचे असतील, यांची जी कामे आपण सुरु केलेली आहेत, त्यांचा एक शेल्फ करुन त्याचा डॅशबोर्ड तयार करणे. त्याच्यामधे ज्या टप्प्यावर ती कामे अडकलेली असतील,स्टेकहोल्डर्सना सोबत आणून ती स्पीडअप करणे. आणि याच्यामध्ये अग्रक्रमाने सर्व कार्यक्रमांचा कामाचा एक मॉनिटरींग प्लॅन/आराखडा तयार करणे, त्यासाठी लागणारे सिटीझन एंगेजमेंट करणे हा पहिला टप्पा असेल. दुस-या टप्प्यामध्ये पुढील चोवीस महिन्यांमध्ये या सर्व आयडेंटिफाय केलेल्या प्रकल्पांची लॉन्ग टर्म असतील किंवा शॉर्ट टर्म असतील, त्यांच्या टाईम लाइन्स प्रमाणे त्याची अंमलबजावणी करणे. अनेक वेळेला असे होते की, एखाद्या प्रकल्पाची अंमलबजावणी होते. पण तो कुठल्या ना कुठल्यातरी अडचणीमध्ये अडत राहतो. त्याचा रिव्ह्यू घेतला जाऊ शकत नाही. कारण कार्यबाहुल्य असतं आणि अशा परिस्थितीमध्ये तर जर तो कुठे अडकून राहिला तर त्याच्यामध्ये इमिजेटली अलर्टस निर्माण करणे, त्याठिकाणी जाऊन त्याचा पाठपुरावा करणे. त्याच्यामध्ये सविस्तर transformation agenda मध्ये एखाद्या वॉर रूम प्रमाणे काम करणे एखादा प्रकल्प मुदतीमध्ये संपवून घेऊन त्याची मार्गक्रमणा करणे याच्यासाठी ही यंत्रणा आपण establish करतो आहोत. याच्यामधे गतिमान प्रशासन निर्माण करण्यासाठी प्रशासकीय यंत्रणा आपण पायाभूत करणारी यंत्रणा आपण याच्यामध्ये घेतोय. त्याच्यामध्ये आपण जागतिक स्तरावरचे अर्बन एक्सपर्ट्स असलेली जागतिक संस्था आपण तिथे आमंत्रित करतो आहोत. पण यासोबतच सिटीझन एंगेजमेंटमधला अनुभव असलेली संस्था कार्यसंस्था आपण आमंत्रित केलेल्या आहेत. एक चांगला उपक्रम त्याच्यामध्ये प्रशासनामध्ये गतिमानता आणून पूर्ण शहर आपल्याला स्मार्ट सिटीच्या अनुषंगाने वाटचाल करण्यासाठी सक्षम बनवणे, आपला हा यामागचा उद्देश आहे. या पार्श्वभूमीवर सिटी ट्रान्सफॉर्मेशन ऑफिस हा एक नाविन्यपूर्ण उपक्रम सभागृहासमोर ठेवण्यात आलेला आहे.

**मा.सुजाता पालांडे** – मा.महापौर साहेब, उपसूचना स्विकारली आहे.

**मा.योगेश बहल-**सन्मा.महापौर साहेब,याठिकाणी मी आयुक्तांचे मनापासून अभिनंदन करू इच्छितो. I really appreciate. आत्ता मी जी काही संकल्पना मांडली आहे,त्याअनुषंगाने आपण गेलो तर निश्चितच भविष्यामध्ये महापालिकेची वाटचाल चांगली होईल. त्याबद्दल हा एक चांगला सुज्ञ विषय आपण या सभागृहापुढे आणला आहे,आपण त्याला मंजुरी द्यावी. मी आपले अभिनंदन करतो.

**मा.महापौर** - हा विषय उपसूचनेसह मंजूर करण्यात येत आहे.

यानंतर उपसूचनेप्रमाणेचा ठराव मतास टाकणेत आला असता -

ठराव क्रमांक - ९४ विषय क्रमांक – ११

दिनांक- १६/१०/२०१७ विभाग- मा.आयुक्त

संदर्भ-१) मा.महापालिका आयुक्त यांचेकडील क्र.मातंवि/१२/कावि/२९८/१७ दि.१९/०९/२०१७

महापालिकेचे सन २०१७-१८ चे अंदाजपत्रक मा. महापालिका सभेपुढे मा. आयुक्त यांनी मा.स्थायी समिती मार्फत सादर केलेले आहे. व त्यास मा. महापालिका सभेने मान्यता दिलेली आहे. तथापि, सदरचे अंदाजपत्रकात महापालिकेमार्फत विविध विभागांमार्फत केंद्रशासन व राज्यशासनाचे अभियान/प्रकल्पांचे तसेच महापालिकेचे स्थापत्य, विद्युत, पाणीपुरवठा, जलनि:स्सारण इ. विभागांचे प्रकल्पांचे कामकाज हाती घेणेत येते. या व्यतिरिक्त जेएनएनयुआरएम, अमृत अभियान, स्वच्छ भारत अभियान, स्मार्ट सिटी अभियान, प्रधानमंत्री आवास योजना महानगरपालिका कार्यक्षेत्रामध्ये राबविणेकरिता प्रयत्नशिल आहे. सदरचे प्रकल्प कालमर्यादित व वेळेत पूर्ण करणेसाठी या कामासाठी राष्ट्रीय व आंतरराष्ट्रीय दर्जाचे सल्लागार संस्थेची मदत घेणे आवश्यक आहे. त्यामुळे,सन २०१७-१८ चे अंदाजपत्रकात **"सिटी ट्रान्फॉर्मेशन ऑफिस (City Transformation Office)"** हे नवीन लेखाशिर्ष निर्माण करणे व प्रशासकीय मान्यता मिळणे आवश्यक आहे.

सबब, सन २०१७-१८ चे अंदाजपत्रकात **अंदाजपत्रक – २ :महसुली जमा खर्च सन २०१७-१८, पान क्र.१२२ व पान क्र.१२३, अनुक्रमांक ५० - माहिती व तंत्रज्ञान विभागाकडे (अ.क्र.१२ वर) "सिटी ट्रान्फॉर्मेशन ऑफिस (City Transformation Office)" नवीन लेखाशिर्ष** निर्माण करुन त्यावर तीन वर्ष कालावधीसाठी प्रशासकीय मान्यता र.रू १४.३१ कोटी यास मान्यता देणेत येत आहे. तसेच सन २०१७-१८ या आर्थीक वर्षात खालील नमूद केलेल्या कामांची आवश्यकता असून नागरिकांच्या सोयीसाठी सदरची कामे करणे गरजेचे आहे.

| अ.क्र. | कामाचे नाव | पा.क्र./अनु.क्र. | प्रशासकीय मान्यता | वाढीव प्रशासकीय मान्यता | एकूण आवश्यक प्रशासकीय मान्यता |
|---|---|---|---|---|---|
| १ | प्रभाग क्र. १९ वाल्हेकरवाडीमधील चितामणी गणेश मंदीर, आहेरनगर, राजनगीगंधा हौ.सोसायटी शिवाजीपार्क इ. परिसरातील अंतर्गत रस्ते डांबरीकरण करणे. | ११०/६९ | २५,००,००० | ७०,००,००० | ९५,००,००० |
| २ | प्रभाग क्र. १९ वाल्हेकरवाडी मधील वाल्हेकरवाडी मनपा | १११/७२ | २५,००,००० | ७२,००,००० | ९७,००,००० |

| | | | | | |
|---|---|---|---|---|---|
| | शाळा ते गावठाणपर्यंतचा रस्ता डांबरीकरण करणे | | | | |
| ३ | प्र.क्र.१९ वाल्हेकरवाडी मधील वाल्हेकरवाडी गावठाण इ. परिसरात ठिकठिकाणी पेव्हींग ब्लॉक बसविणे पाथवे दुरुस्ती व स्थापत्य विषयक कामे करणे. | ११८/४१ | १५,००,००० | ५३,००,००० | ६८,००,००० |
| ४ | प्र.क्र. १९ वाल्हेकरवाडी मधील विवीध ठिकाणी देखभाल दुरुस्ती सुधारणा व स्थापत्य विषयक कामे करणे. | १३०/६४ | १५,००,००० | ३९,००,००० | ५४,००,००० |
| ५ | प्र.क्र. २१ मध्ये ठिकठिकाणी नाले बांधणे | १४४/०६ | १,००,००० | ८९,००,००० | ९०,००,००० |

तरी वर नमुद केलेप्रमाणे सन २०१७-१८ च्या मुळ अर्थसंकल्पात सदर कामांना वाढीव प्रशासकीय मान्यता देणेत येत आहे. तसेच प्रभाग क्र.५७ पिंपळे गुरव (नवीन प्रभाग क्र.३१) येथील आवश्यकतेनुसार स्थापत्य विषयक कामांचा अंदाजपत्रकामध्ये समावेश करुन सुधारीत रक्कमेस प्रशासकिय मान्यता देणेत येत आहे.

| अ. क्र. | कामाचे नाव | पान क्र. | अ.क्र. | अंदाजपत्रकीय रक्कम | सुधारीत अंदाजपत्रकीय रक्कम |
|---|---|---|---|---|---|
| १ | प्रभाग क्र.५७ (नवीन प्रभाग ३१) पिंपळे गुरव मधील बँक ऑफ महाराष्ट्र ते ओरीयाना इमारतीपर्यंतचा रस्ता अद्यावत पद्धतीने विकसित करणे. | - | - | १०,००,००,००० | १०,००,००,००० |
| २ | प्रभाग क्र.५७ (नवीन प्रभाग ३१) पिंपळे गुरव मधील काटेपुरम चौक तेमनपा शाळा पर्यंतचा रस्ता अद्यावत पद्धतीने विकसित करणे. | - | - | १०,००,००,००० | १०,००,००,००० |

तरी पिंपळे गुरव नवी सांगवी भागातील विकास कामाची आवश्यकता असून उपरोक्त ठिकाणी काम करणेस सुधारीत अंदाजपत्रकीय रक्कमेस प्रशासकीय मान्यता देणेत येत आहे. तसेच मनपा परिसरातील विविध भागामध्ये आवश्यकतेनुसार स्थापत्य विषयक कामांचा अंदाजपत्रकामध्ये समावेश करुन सुधारीत रक्कमेस प्रशासकीय मान्यता देणेत येत आहे.

| अ. क्र. | कामाचे नाव | पान क्र. | अ.क्र. | अंदाजपत्रकीय रक्कम | सुधारीत अंदाजपत्रकीय रक्कम |
|---|---|---|---|---|---|
| १ | ह प्रभागात ठिकठिकाणी आवश्यकतेनुसार डांबरीकरण करणे. | - | - | ५,००,००,००० | ५,००,००,००० |
| २ | ब प्रभागात ठिकठिकाणी आवश्यकतेनुसार डांबरीकरण करणे. | - | - | ५,००,००,००० | ५,००,००,००० |
| ३ | ड प्रभागात ठिकठिकाणी आवश्यकतेनुसार डांबरीकरण करणे. | - | - | ५,००,००,००० | ५,००,००,००० |
| ४ | ग प्रभागात ठिकठिकाणी आवश्यकतेनुसार डांबरीकरण करणे. | - | - | ५,००,००,००० | ५,००,००,००० |
| ५ | क प्रभागात ठिकठिकाणी आवश्यकतेनुसार डांबरीकरण करणे. | - | - | ५,००,००,००० | ५,००,००,००० |

वरील प्रभागातील विकास कामांची अवश्यकता असून उपरोक्त ठिकाणी काम करण्याची आवश्यकता असून सुधारीत अंदाजपत्रकीय रक्कमेस प्रशासकीय मान्यता देणेत येत आहे. तसेच काळेवाडी फाटा (धर्मवीर संभाजी महाराज चौक) येथे वाकड कस्पटेवस्ती ते पिंपरी (काळेवाडी) ग्रेड सेपरेटर बांधणे या कामासाठी स्थापत्य भांडवली खर्च शहर विकास आराखडा या लेखाशिर्षांतर्गत र.रु.१४ कोटीच्या खर्चास प्रशासकीय मान्यता देणेत येत आहे. तसेच नाशिकफाटा ते वाकड बीआरटीएस रस्त्यालगत उच्चतम द्रुतगती मार्ग ( HCMTR) रस्त्याचे क्षेत्रामध्ये असलेला नाला पाईप टाकुन बंदिस्त करणे – या कामास प्रशासकीय मान्यता मिळणेबाबत या नविन कामासाठी स्थापत्य भांडवली खर्च शहर विकास आराखडा या लेखाशिर्षा अंतर्गत र.रु. २ कोटी चे खर्चास प्रशासकीय मान्यता देणेत येत आहे. तसेच पिंपरी चिंचवड महानगरपालिकेच्या विकास आराखडयातील रस्ते व आरक्षणे विकसीत करण्याबाबत मा.स्थायी समिती सभेच्या सूचना आहेत. सबब सन २०१७-१८ च्या अंदाजपत्रकात समावेश असलेली कामे परंतु कमी प्रशासकीय मान्यता असलेल्या कामांची यादी खालीलप्रमाणे आहे. सदरची कामे ब क्षेत्रीय कार्यालयाअंतर्गत करावयाची आहेत. सदर कामासाठी सल्लागार नेमुन अंदाजपत्रक तयार करण्याचे काम चालू आहे त्याकरिता सदर कामास सुधारीत प्रशासकीय मान्यता मिळणे आवश्यक आहे. सन २०१७-१८चे भांडवली अंदाजपत्रकामध्ये खाली नमुद केलेल्या कामांना अंदाजपत्रकीय रक्कमेच्या रकान्यामध्ये असलेल्या रक्कमेत कामाच्या नावा समोर दर्शविलेल्या सुधारीत अंदाजपत्रकीय रक्कमेस प्रशासकीय मान्यता देण्यात येत आहे.

| अ.क्र. | लेखाशिर्ष | अंदाजपत्रक पानांक | मुळ अंदापत्रकीय रक्कम | सुधारीत अंदाजपत्रकीय रक्कम |
|---|---|---|---|---|
| १ | जुन्या तालेरा हॉस्पिटलची इमारत पाडून नवीन इमारत बांधणे | ७०/१६/५ | २६,००,००,०००/- | ७१,५०,००,०००/- |

तसेच सन २०१७-१८ या आर्थिक वर्षात खालील नमुद केलेल्या कामांची आवश्यकता असून नागरिकांच्या सोयीसाठी सदरची कामे करणे गरजेचे आहे.

| अनु क्र. | कामाचे नाव | पान क्र. / अनु क्र. | प्रशासकीय मान्यता | वाढिव प्रशासकीय मान्यता | एकूण आवश्यक प्रशासकीय मान्यता |
|---|---|---|---|---|---|
| १ | पिंपळे सौदागर प्रभाग क्र.५५ मधील कोकणे चौक ते रहाटणी चौकापर्यंतचा रस्ता यु.टी.डब्ल्यु.टी. पध्दतीने विकसीत करणे. | 52/252 | 5,00,00,000 | 3,00,00,000 | 8,00,00,000 |
| २ | पिंपळे सौदागर प्रभाग क्र.५५ मधील झरवरी रस्ता यु.टी.डब्ल्यु.टी. पध्दतीने विकसीत करणे. | 52/253 | 2,00,00,000 | 5,00,00,000 | 7,00,00,000 |

तरी वर नमूद केलेप्रमाणे सन २०१७-१८ च्या मुळ अर्थसंकल्पात सदर कामांना वाढीव प्रशासकीय मान्यता देणेत येत आहे. तसेच पुणे मुंबई महामार्गावरील निगडी ते दापोडी यारस्त्यावरील वल्लभनगर पिंपरी येथील सबवेचे सुशोभीकरण करणे व इतर अनुषंगीक कामे करणे या नवीन कामासाठी स्थापत्य विषय योजना या लेखाशिर्षांतर्गत र.रु. १ कोटीचे खर्चास प्रशासकीय मान्यता देणेत येत आहे. तसेच सदर काम करणेस मनपाचे सन २०१७-१८ च्या अंदाजपत्रकातील काम बोपखेल येथील मुळा नदीवरील पुलाला जोडरस्ता व सर्व्हीस रस्ता करणे लेखाशिर्ष स्थापत्य विषयक योजना पान क्र. ६७ अ.क्र. १८५ मधील तरतूद र.रु. ४ कोटी मधुन र.रु. ६० लाख तरतूद करणेस मान्यता देणेत येत आहे. तसेच सन २०१७-१८ या आर्थिक वर्षात खालील नमुद केलेल्या कामांची आवश्यकता असून नागरकांच्या सोयीसाठी सदरची कामे करणे गरजेचे आहे.

| अनु क्र. | कामाचे नाव | पान क्र. / अनु क्र. | प्रशासकीय मान्यता | वाढिव प्रशासकीय मान्यता | एकूण आवश्यक प्रशासकीय मान्यता |
|---|---|---|---|---|---|
| १ | प्रभाग क्र.५५ पिंपळे सौदागर मधील आरक्षण क्र.६५५ येथे शाळा इमारत बांधणे. (वाढीव प्राथमिक शाळा) | ६३६/१२ | १,००,००,००० | २,००,००,००० | ३,००,००,००० |
| २ | प्रभाग क्र.५५ रहाटणी गावठाण येथील स्मशानभूमीमध्ये वेटींग शेड बांधणे, अग्नीकुंड, व इतर स्थापत्य विषयक कामे करणे. | ६३८/१३ | ५०,००,००० | २,५०,००,००० | ३,००,००,००० |

तरी वर नमूद केलेप्रमाणे सन २०१७-१८ च्या मुळ अर्थसंकल्पात सदर कामांना वाढीव प्रशासकीय मान्यता देणेत येत आहे. तसेच पिंपरी चिंचवड महानगरपालिका 'अ'क्षेत्रीय कार्यालय अंतर्गत नवीन प्रभागक्र. १९ मध्ये प्रा. रामकृष्ण मोरे प्रेक्षागृह आहे. सदर प्रेक्षागृहाचे नुतनीकरण करणेकामी अंदाजपत्रक-३,सन २०१७-१८ मध्येलेखाशिर्ष – स्थापत्य विशेष योजना, पान क्र. ७०, अ.क्र. ११ वर " प्रभाग क्र. २४ **(**रामकृष्ण मोरेप्रेक्षागृह) येथील रामकृष्ण मोरे नाटयगृहाचे नुतनीकरण करणे" असे कामाचे लेखाशिर्ष उपलब्ध आहे. सदर कामास प्रशासकीय मान्यता (अंदाजपत्रकीय रक्कम) र.रू.१२.५० कोटी इतकी आहे. सदर कामास वास्तुविशारद म्हणुन " मे.किमया आर्किटेक्ट " यांची नेमणुक यापुर्वी केलेली आहे. सदर कामाचे ड्रॉईंग व डिझाईन नुसार सुमारे अंदाजपत्रकीय खर्च एकुण र.रू.२०.०० कोटी इतका येत आहे. तरी सदर कामास अंदाजपत्रकीय र.रू.७.५० कोटी इतकी प्रशासकीय मान्यता कमी पडणार आहे. तरी सदर कामास सुधारीत प्रशासकीय मान्यता (अंदाजपत्रकीय रक्कम) र.रु.२०.०० कोटी आवश्यक असल्याने त्यास मान्यता देणेत येत आहे. तसेच पिंपरी चिंचवड महानगरपालिका 'अ' क्षेत्रिय कार्यालय अंतर्गत नवीन प्र.क्र.१९ मध्ये ब प्रभाग कार्यालयाची जुनी इमारत (शेड) आहे.सदर ठिकाणी नवीन इमारत बांधणेकरीता अंदाजपत्रक-३,सन २०१७-२०१८ मध्ये लेखाशिर्ष – भांडवली खर्च (इमारत योजना), पान क्र.१५४, अ.क्र.२५ वर " ब प्रभाग कार्यालयासाठी नविन प्रशासकिय इमारत बांधणे" असे कामाचे लेखाशिर्ष उपलब्ध आहे. सदर कामास प्रशासकीय मान्यता र.रू.१०.०० कोटी इतकी आहे. सदर कामास वास्तुविशारद म्हणुन " मे. किमया आर्किटेक्ट " यांची नेमणुक यापुर्वी केलेली आहे. सदर कामाचे ड्रॉईंग व डिझाईन नुसार सुमारे अंदाजपत्रकीस खर्च एकुण र.रू.३५.०० कोटी इतका येत आहे. तरी सदर कामास अंदाजपत्रकीय र.रू.२५.०० कोटी इतकी प्रशासकीय मान्यता कमी पडणार आहे. तरी सदर कामास सुधारीत प्रशासकीय मान्यता (अंदाजपत्रकीय रक्कम) र.रु.३५.०० कोटी आवश्यक असल्याने त्यास मान्यता देणेत येत आहे. तसेच प्रभाग क्र.३ च-होली मोशी येथील विकास

आराखडयातील रस्ते पुर्ण विकसीत करणेकरिता खालील कामांना नावात बदल व प्रशासकीय मान्यता वाढविण्याची आवश्यकता आहे.

| अ.क्र. | कामाचे नाव | पानांक | अ.क्र. | मुळ प्रशासकीय मान्यता | आवश्यक प्रशासकीय मान्यता र.रु. |
|---|---|---|---|---|---|
| १ | प्रभाग क्र. ६ डूडूळगाव येथील १८ व २४ मी. विकास आराखडयातील मोशी आळंदी रस्ता ते माऊलीनगर ते पुणे आळंदी रस्ता विकसीत करणे. | २८३ | १६७ | १५,००,००,००० | ५०,००,००,००० |
| २ | प्रभाग क्र.७ च-होली, दत्तनगर (काळीभींत रस्ता) विकास आराखडयातील रस्ता १८ मीटर विकसीत करणे. | ३८ | ३३३ | १०,००,००,००० | २०,००,००,००० |
| ३ | प्रभाग क्र. ७ च-होली, बुर्डेवस्ती मुख्य रस्ता ते सर्व्हे नं. ८७ येथील १८ मी. विकास आराखडयातील रस्ता विकसीत करणे. | ३७ | ३१५ | ७,००,००,००० | ३०,००,००,००० |
| ४ | प्र.क्र. ७ च-होली येथील हिरामाता पुल, खडकवासला वस्तीतील ९० मी. डीपी पर्यंत रस्ता विकसीत करणे. | ३२ | २०८ | ५,००,००,००० | ४०,००,००,००० |
| ५ | प्र.क्र. ६ डुडूळगाव येथील सर्व्हे क्र. १३४ ते १८६ विकास आराखडयातील १८ मी. रस्ता विकसीत करणे तसेच गट क्र. ५१ ते ७६ पर्यंतचा १८ मी. रस्ता विकसीत करणे. | ३७ | ३११ | ५,००,००,००० | २५,००,००,००० |
| ६ | प्र.क्र ३ मोशी येथील आरक्षण क्र. १/१७५ येथे खेळाचे मैदान व जलतरण तलाव बांधणे | ३८ | १० | २,५०,००,००० | ७,००,००,००० |
| ७ | प्र.क्र.६ मोशी येथील भाजीमंडईचा विस्तार करणे व इतर कामे करणे. | २६६ | १ | १,००,००,००० | ५,००,००,००० |
| ८ | प्र.क्र.७ च-होली येथील स.नं. १०१३ ते ८ पर्यंतचा १८ मी. | ८२ | २० | १०,००,००,००० | २०,००,००,००० |

| | | | | | |
|---|---|---|---|---|---|
| | रस्ता विकसीत करणे (स्मशानभूमीकडील रस्ता) | | | | |

उपरोक्त कामांच्या समोर दर्शवलेल्या रक्कमेस प्रशासकीय मान्यता देणेत येत आहे. तसेच प्रभाग क्र.५७ पिंपळेगुरव (नवीन प्रभाग क्र.३१) येथील स्थापत्य कामाच्या अंदाजपत्रकामध्ये रक्कमेस सुधारित प्रशासकीय मान्यता देणेत येत आहे.

| अ.क्र. | कामाचे नाव | पानांक | अ.क्र. | अंदाजपत्रकीय रक्कम | सुधारीत अंदाजपत्रकीय रक्कम |
|---|---|---|---|---|---|
| १ | प्रभाग क्र.५७ पिंपळेगुरव रस्त्याच्या कडेने पेव्हींग ब्लॉक बसविणे व अदयावत पध्दतीने विकसीत करणे. | २३७ | ५ | २०,००,००० | ५,००,००,००० |
| २ | प्रभाग क्र. ५७ पिंपळेगुरव येथील विनायक नगर कवडेनगर व इतर भागात पेव्हींग ब्लॉक बसविणे व अदयावत पध्दतीने विकसीत करणे. | २३८ | ६ | २०,००,००० | १०,००,००,००० |
| ३ | प्रभाग क्र. ५८ नवी सांगवी येथील रस्त्याचे विशेष दुरुस्ती कामे करणे. | १८१ | १५८ | १०,००,००० | ५,००,००,००० |

पिंपळेगुरव नवी सांगवी भागातील विकास कामाची आवश्यकता असून उपरोक्त ठिकाणी काम करणेस सुधारीत अंदाजपत्रकीय रक्कमेस व सदर कामास प्रशासकीय मान्यता देणेत येत आहे. तसेच प्रभाग क्र. ४ कृष्णानगर मधील से.क्र. १८,१९ व २० मध्ये मोकळया जागा प्राधिकरणाकडून मनपास हस्तांतरीत झालेल्या आहेत सदर जागेचे सपाटीकरण करुन जॉगींग ट्रॅक करणेकामी सन २०१७-१८ चे अंदाजपत्रकात कामाचा समावेश असून त्याकरिता मा.महापालिका सभा ठराव क्र. ४२ दि.२०/६/२०१७ अन्वये र.रु.२,००,००,०००/- इतकी प्रशासकीय मान्यता मिळालेली आहे. तथापि प्रत्यक्ष कामाची व्याप्ती जादा असल्याने सदरची प्रशासकीय मान्यता प्रत्यक्ष काम करणेकरिता अपुरी आहे. सदर कामावर सन २०१७-१८ चे अंदाजपत्रकात र.रु.४,००,००,०००/- इतकी तरतूद मा.स्थायी समिती ठराव क्र.८५१ दि.२३/८/२०१७ अन्वये करणेत आलेली आहे. सदर ठिकाणचे सर्व मोकळया जागेचे सपाटीकरण, सिमाभींत व जॉगींक ट्रॅक करणेकामी अंदाजे र.रु.६००००००००/- इतकी कामाची अंदाजपत्रकीय रक्कम येत आहे. त्यामुळे उपरोक्त कामाचे मुळ अंदाजपत्रकीय र.रु.२००००००००/- ऐवजी सुधारीत र.रु.६००००००००/- करणेस मान्यता देणेत येत आहे. तसेच चिखली से.क्र. १७ व १९ येथे जेएनएनयुआरएम अंतर्गत महानगरपालिकेमार्फत आर्थीकदृष्टया दुर्बल घटकांसाठी (ईडब्ल्यूएस) गृहप्रकल्प राबवणेत येत आहे सदर प्रकल्पातील विवीध सुविधा भूखंडावर खालीलप्रमाणे सुविधा पुरवणे गरजेचे असून सन २०१७-१८ चे अंदाजपत्रकात सदर कामांचा अंतर्भाव करणेत आला असून त्यांचे अंदाजपत्रकीय किमंतीत खालीलप्रमाणे बदल

सुचवणेत येत आहे. या गृहप्रकल्पात एकूण ६६३६ सदनिकांपैकी ४५०० सदनिकांचे वाटप झालेले आहे.

| अ.क्र. | कामाचे नाव | अंदाजपत्रकीय रक्कम | शेरा |
|---|---|---|---|
| १ | दवाखाना | २,२०,११,९०० | |
| २ | भाजीमंडई | ३,१५,७३,००० | |
| ३ | टाऊनहॉल | १०,७२,९५,७०० | |

त्यामुळे सदर सुविधा भुखंडावरील इमारतीचे बांधकाम या वर्षात सुरु करणेकामी सदरचे अंदाजपत्रकीय खर्चास प्रशासकीय मान्यता देणेत येत आहे.

अनुकूल-८१ प्रतिकूल- ०

अशी मते पडली व सदर ठराव सर्वानुमते मान्य झाल्याचे मा.महापौर यांनी प्रकट केले.

-------

**मा.उत्तम केंदळे** - मा.महापौर साहेब,विषय क्रमांक १२वर मी पुढीलप्रमाणे ठराव मांडतो.

ठराव क्रमांक - ९५ विषय क्रमांक – १२

दिनांक- १६/१०/२०१७ विभाग- मा.आयुक्त

संदर्भ- १) मा.महापालिका आयुक्त यांचेकडील क्र.मातंवि/३/कावि/२२०/१७ दि.०४/१०/२०१७

मा.पोलीस आयुक्त,परिमंडळ-३,पुणे शहर यांचेकडील पत्र क्र.पोउआ/परि-३/६२५/२०१३ दिनांक ६/२/२०१३ अन्वये कळविलेनुसार घरमालक-भाडेकरू ट्रॅकींग सिस्टीम विकसीत करणेत आलेली असून त्याबाबतचा डेटा महानगरपालिका सर्व्हरवर (Server Host) ठेवणेत आलेला आहे. सदरची संगणक प्रणाली मे. प्रोबिटी सॉफ्ट यांचेमार्फत विकसीत करणेत आली असून त्याकरिता महानगरपालिकेस कोणतेही शुल्क आकारण्यात आलेले नाही.

महानगरपालिकेच्या नागरी सुविधा केंद्रांमार्फत घरमालक-भाडेकरू ट्रॅकींग सिस्टीमद्वारे सेवा उपलब्ध केल्यास नागरिकांना प्रती अर्ज रक्कम रू.२०/- व ऑनलाईन सेवा उपलब्ध करून घेतल्यास रक्कम रू.१०/- शुल्क आकारले जाते. महानगरपालिकेकडे जमा होणारे ऑनलाईन शुल्क रक्कम रू.१०/- पैकी महानगरपालिकेस रक्कम रू.५/- ऑनलाईन पध्दतीने जमा करून उर्वरित रक्कम रू.५/- संगणक प्रणाली विकसीत करणारी एजन्सी मे. प्रोबिटी सॉफ्ट यांना अदा करणेकामी आदेश क्र.मातंवि/३/कावि/९८/२०१६ दि. ३/५/२०१६ अन्वये मान्यता देणेत आलेली आहे. तसेच मा.स्थायी समिती सभा ठराव क्र.६२१ दि. १२/७/२०१७ अन्वये मान्यता देणेत आलेली आहे. त्यानुसार मे.प्रोबिटी सॉफ्ट यांना ऑनलाईन प्राप्त झालेल्या प्रती अर्जाकरिता रक्कम रू.५/- प्रमाणे रक्कम अदा करणेचे धोरणास तसेच सदरची रक्कम महानगरपालिका फंडामध्ये जमा होत असल्याने वेळोवेळी जमा होणारी रक्कम माहिती व तंत्रज्ञान विभागाच्या ई-गव्हर्नन्स या लेखाशिर्षातून अदा करणेस मान्यता देणेत येत आहे.

**मा.कैलास बारणे** - मा.महापौर साहेब, ठरावाला अनुमोदन आहे.

यानंतर सदर ठराव मतास टाकणेत आला असता -

अनुकूल-८१ प्रतिकूल- ०

अशी मते पडली व सदर ठराव सर्वानुमते मान्य झाल्याचे मा.महापौर यांनी प्रकट केले.

-------

**मा.प्रियांका बारसे -** मा.महापौर साहेब,विषय क्रमांक १३वर मी पुढीलप्रमाणे ठराव मांडते.

ठराव क्रमांक - ९६ विषय क्रमांक – १३

दिनांक- १६/१०/२०१७ विभाग- मा.आयुक्त

संदर्भ-१) मा.महापालिका आयुक्त यांचेकडील जा.क्र. स्वभाअक/३/कावि/ २८६/२०१७ दि.६/१०/२०१७

केंद्र शासनाच्या “स्वच्छ भारत अभियान”च्या धर्तीवर राज्यामध्ये “स्वच्छ महाराष्ट्र अभियान (नागरी)” राबविणेत येत आहे.

सदर अभियानाचे अनुषंगाने शहरातील ज्या कुटुंबाकडे स्वत:चे स्वतंत्र शौचालयनाही त्यांचेकरिता शौचालय उभारणेसाठी निधी उपलब्ध करून शहर हागंदारी मुक्त करणे (Open Defecation Free) हा या अभियानाचा मुळ उद्देश आहे. राष्ट्रीय जनगणना २०११ नुसार पिंपरी चिंचवड महानगरपालिका क्षेत्रातील एकूण११,६८४ कुटुंबे अभियानांतर्गत वैयक्तीक शौचालय उभारणी करीता निधी उपलब्ध करणे आवश्यक आहे. सदर अभियानाचे अनुषंगाने केंद्र शासन व राज्य शासन यांचेकडून अनुक्रमे र.रु २८७,०३,०००/- व ५,०३,९१,०००/- असे एकुण र. रु ७,९०,९४,०००/- अनुदान प्राप्त झाले आहे.

प्राप्त अनुदान व मनपा हिस्सा यामधून प्रत्येक लाभार्थीस केंद्र शासनाचे र.रु ४०००/- , राज्य शासनाचे र.रु.८००० /- व मनपा हिस्सा र.रु. ४०००/-याप्रमाणे वैयक्तिक घरगुती शौचालय बांधणेसाठी अनुदानाची रक्कम अदा करणेत येत आहे.

स्वच्छ महाराष्ट्र अभियान (नागरी) अंतर्गत महापालिकेने दिनांक ३०/९/२०१७अखेर केलेल्या कार्यवाहीची माहिती खालीलप्रमाणे

**प्रपत्र“अ”**

| **महानगरपालिकेचे नाव** | **पिंपरी चिंचवड महानगरपालिका** | **शेरा** |
|---|---|---|
| जिल्हा | पुणे | |
| वैयक्तिक शौचालय बांधकामासाठी अर्ज केलेल्या कुटुंबांची संख्या | ११५१३ | |
| केंद्र शासनाचे “स्वच्छ भारत अभियान”च्या संकेतस्थळावर अपलोड | १०५५६ | |

| | | | |
|---|---|---|---|
| करणेत आलेल्या एकूण अर्जांची संख्या | | | |
| मंजूर अर्जांची एकूण संख्या | | ६६०४ | |
| बांधकाम सुरु झालेल्या शौचालयांची संख्या | वैयक्तिक घरगुतीशौचालय | ६०३७ | |
| बांधकाम पूर्ण झालेल्या शौचालयांची संख्या | वैयक्तिक घरगुती शौचालय | ७३८८ | मनपा बांधकाम- ४९६६<br>सी.एस.आर(एनजीओ) मार्फत बांधकाम - २४२२ |
| बांधकाम सुरु झालेल्या शौचालयांची संख्या | सामुदायिक शौचालय | ३६१ सीटस | |
| बांधकाम पूर्ण झालेल्या शौचालयांची संख्या | सामुदायिक शौचालय | ३६१ सीटस | महिला–१९२ सिटस कामकाज पूर्ण<br>पुरुष–१६९ सिटस कामकाज पूर्ण |
| निर्गत करणेत आलेला पहिलाहप्ता | ५८१० लाभार्थी | GOI+GOM=३४८.६० लाख | GOI=२०००/-व GOM=४०००/-हिस्सा |
| | | ULB =११६.२० लाख | ULB =२०००/- हिस्सा |
| | **एकुण** | **४६४.८०लाख** | |
| निर्गत करणेत आलेला दुसरा हप्ता | ४५४० लाभार्थी | GOI+GOM=२७२.४० लाख | GOI=२०००/-व GOM=४०००/-हिस्सा |
| | | ULB =९०.८० लाख | ULB =२०००/- हिस्सा |
| | **एकुण** | **३६३.२० लाख** | |

सबब, महापालिकेकडून राबविणेत येत असलेल्या स्वच्छ महाराष्ट्र अभियान (नागरी) अंमलबजावणीचा आढावा अवलोकन करणे.

**मा.योगिता नागरगोजे** - मा.महापौर साहेब, ठरावाला अनुमोदन आहे.

यानंतर सदर ठराव मतास टाकणेत आला असता -

अनुकूल-८१ प्रतिकूल- ०

अशी मते पडली व सदर ठराव सर्वानुमते मान्य झाल्याचे मा.महापौर यांनी प्रकट केले.

-------

**मा.आरती चोंधे -** मा.महापौर साहेब,विषय क्रमांक १४वर मी पुढीलप्रमाणे ठराव मांडते.

विषय क्रमांक – १४

दिनांक- १६/१०/२०१७ विभाग- मा.आयुक्त

संदर्भ – १) मा.महापालिका आयुक्त यांचेकडील जा.क्र.जनि/१०/कावि/५०/२०१७ दि.०६/१०/२०१७

पिंपरी चिंचवड महानगरपालिकेत ग आणि ह क्षेत्रीय कार्यालय नव्याने झाले असल्याने सदर क्षेत्रीय कार्यालयाचे कार्यक्षेत्रात जलनिस:रण नलिकांची वार्षिक ठेकेदारी पध्दतीने साफसफाई करणे व चोकअप काढणे यासाठी स्वतंत्र व्यवस्था नाही. त्यामुळे खालील कामांचा सन २०१७-१८ च्या अंदाजपत्रकात समावेश करून व सदर कामांना प्रत्येकी ५०,००,०००/- (अक्षरी र.रू. पन्नास लाख फक्त) याप्रमाणे तरतूद करणेस व सदर तरतूद चिखली येथे मैला शुध्दीकरण केंद्र बांधणे या कामातून वर्ग करणेस मान्यता देणेकामी तसेच सदर कामांना प्रशासकीय मान्यता देणेत येत आहे.

१. ग क्षेत्रीय कार्यालयाचे क्षेत्रातील जलनिस:रण नलिकांची वार्षिक ठेकेदारी पध्दतीने साफसफाई करणे व चोकअप काढणे. अंदाजपत्रकीय रक्कम वार्षिक र.रू. १,०६,००,०००/- (अक्षरी र.रू. एक कोटी सहा लाख रूपये फक्त) – तरतूद रक्कम रूपये ५०,००,०००/- (अक्षरी र.रू. पन्नास लाख फक्त)

२. ह क्षेत्रीय कार्यालयाचे क्षेत्रातील जलनिस:रण नलिकांची वार्षिक ठेकेदारी पध्दतीने साफसफाई करणे व चोकअप काढणे. अंदाजपत्रकीय रक्कम वार्षिक र.रू. १,०६,००,०००/- (अक्षरी र.रू. एक कोटी सहा लाख रूपये फक्त) – तरतूद रक्कम रूपये ५०,००,०००/- (अक्षरी र.रू. पन्नास लाख फक्त)

**मा.निर्मला कुटे** - मा.महापौर साहेब, ठरावाला अनुमोदन आहे.

**मा.सुजाता पालांडे** – मा.महापौर साहेब, मी पुढीलप्रमाणे उपसूचना मांडते –

प्रभाग क्र. ५७ पिंपळे गुरव (नवीन प्रभाग क्र. ३१) येथील आवश्यकतेनुसार स्थापत्य विषयक कामांचा अंदाजपत्रकामध्ये समावेश करुन प्रशासकीय रक्कमेस मान्यता देणेत यावी.

| अ.क्र. | कामाचे नाव | पान क्र. | अ.क्र. | अंदाजपत्रकीय रक्कम |
|---|---|---|---|---|
| १ | प्रभाग क्र. ५७ (नवीन प्रभाग ३१) पिंपळे गुरव मधील बँक ऑफ महाराष्ट्र ते ओरीयाना इमारतीपर्यंतचा रस्ता अदयावत पध्दतीने विकसित करणे. | - | - | १०,००,००,००० |

| | | | | |
|---|---|---|---|---|
| २ | प्रभाग क्र. ५७ (नवीन प्रभाग ३१) पिपळे गुरव मधील काटेपुरम चौक ते मनपा शाळा पर्यंतचा रस्ता अदयावत पध्दतीने विकसित करणे. | - | - | १०,००,००,००० |

सदर कामाचा अंदाजपत्रकात समावेश करुन सदर कामास प्रशासकीय मान्यता देणेत यावी. तसेच दि.९/१०/२०१७ रोजी भीमसृष्टी प्रकल्पाबाबत झालेल्या बैठकीत माता रमाईचा पुतळा डॉ.बाबासाहेब आंबेडकर पुतळा परिसरात उभारणेबाबत निर्णय घेणेत आला आहे. सदर काम करण्याच्या दृष्टिने खालील प्रमाणे कामाच्या नावाचा २०१७-१८ च्या अंदाजपत्रकात समावेश करुन अंदाजपत्रकीय रक्कमेस प्रशासकीय मान्यता देणेत यावी.

| लेखाशिर्ष | कामाचे नाव | वॉर्ड क्र. | अंदाजपत्रकीय रक्कम |
|---|---|---|---|
| विशेष योजना | भारतरत्न डॉ.बाबासाहेब आंबेडकर पुतळा पिंपरी चौक येथील पुतळा परिसरात माता रमाईचा पुतळा उभारणे व स्थापत्य विषयक कामे करणे. | ९ | ४,००,००,०००/- |

तसेच मनपा परिसरातील विविध भागामध्ये आवश्यकतेनुसार स्थापत्य विषयक कामांचा अंदाजपत्रकामध्ये समावेश करुन प्रशासकीय मान्यता देणेत यावी.

| अ.क्र. | कामाचे नाव | पान क्र. | अ.क्र. | अंदाजपत्रकीय रक्कम |
|---|---|---|---|---|
| १ | ह प्रभाग ठिकठिकाणी आवश्यकतेनुसार डांबरीकरण करणे. | - | - | ५,००,००,००० |
| २ | ब प्रभाग ठिकठिकाणी आवश्यकतेनुसार डांबरीकरण करणे. | - | - | ५,००,००,००० |
| ३ | ड प्रभाग ठिकठिकाणी आवश्यकतेनुसार डांबरीकरण करणे. | - | - | ५,००,००,००० |
| ४ | ग प्रभाग ठिकठिकाणी आवश्यकतेनुसार डांबरीकरण करणे. | - | - | ५,००,००,००० |
| ५ | क प्रभाग ठिकठिकाणी आवश्यकतेनुसार डांबरीकरण करणे. | - | - | ५,००,००,००० |

तसेच प्रभाग क्र. १० मध्ये शाहू उदयान, बर्ड व्हॅली उदयान, शिवशाहू शंभो उदयान ही तीन उदयाने आहेत. सदरची उदयाने साधारणपणे १५ ते २० वर्षापुर्वी करण्यात आलेली आहेत. आता सदर उदयानाचे नुतनीकरण करणे गरजेचे आहे. त्यासाठी खालीलप्रमाणे कामांच्या नावांचा सन २०१७-१८ च्या अंदाजपत्रकामध्ये समावेश करुन अंदाजपत्रकीय रक्कमेस प्रशासकीय मान्यता देणेत यावी.

| लेखाशिर्ष | कामाचे नाव | वॉर्ड क्र. | कामाची अंदाजपत्रकीय रक्कम |
|---|---|---|---|
| स्थापत्य उदयाने | प्रभाग क्र. १० मधील शाहू उदयानाचे आकर्षक असे नुतनीकरण करणे. | १० | ३,००,००,०००/- |
| स्थापत्य उदयाने | प्रभाग क्र. १० मधील बर्ड व्हॅली उदयानाचे नुतनीकरणाचे कामे करणे. | १० | ३,५०,००,०००/- |
| स्थापत्य उदयाने | प्रभाग क्र. १० मधील शिवशाहू शंभो उदयानाचे नुतनीकरणाचे कामे करणे. | १० | ३,००,००,०००/- |

तसेच सन २०१७-१८ चे आर्थीक वर्षात खालील नमुद केलेल्या कामांची आवश्यकता असुन नागरीकांच्या सोईसाठी सदरची काम करणे गरजेचे आहे.

| अ.क्र. | कामाचे नाव | अंदाजपत्रकीय रक्कम रुपये | आवश्यक तरतूद रक्कम रु. |
|---|---|---|---|
| १ | पिंपरी चिंचवड महानगरपालिका क्षेत्रातील थेरगाव डांगे चौक येथील शिवछत्रपती उद्यानात चौकातील पिण्याच्या पाण्याची पाणपोई टाकीसह बांधकाम करणे (जीआरसी टाईप) तसेचग्रेनाईट व आरसीसी बांधकामासह | १६,८७,३००/- | ० |

तरी वर नमुद केलेप्रमाणे सन २०१७-१८ च्या मुळ अर्थसंकल्पात सदर कामाचा नव्याने समावेश करुन सदर कामास प्रशासकीय मान्यता देणेत यावी. तसेच पिंपरी चिंचवड महानगरपालिकेचा ग क्षेत्रीय कार्यालय दि ९/८/२०१७ पासुन कार्यरत झाले आहे. सदर क्षेत्रीय कार्यालयाची सुरुवात सन २०१७-१८ चे अंदाजपत्रकास मान्यता मिळालेनंतर झाली असल्याने, सदर कार्यालयास खालील आवश्यक कामाकरीता तरतुद करणे शक्य झाले नाही. तरी सदरची कामे करणे आवश्यक असल्याने त्या कामाची नावे अंदाजपत्रकात समाविष्ट करणे अत्यावश्यक आहे.

लेखाशिर्ष **"ग क्षेत्रीय कार्यालयाकरीता विद्युत विषयक कामे करणे (भांडवली)"**

| अ.क्र. | उपलेखाशिर्ष | अंदाजपत्रकीय र.रु. |
|---|---|---|
| **1** | ग क्षेत्रिय कार्यालय इमारतीस विजपुरवठा करणेसाठी जनरेटरची व्यवस्था करणे. | 12,00,000 |
| **2** | ग क्षेत्रिय कार्यालय इमारतीस उदवाहक (Lift) बसविणे. | 20,00,000 |
| **3** | ग क्षेत्रिय कार्यालयातील क्षेत्रिय समितीच्या मिटींग हॉल मध्ये व मा.अध्यक्ष यांचे कार्यालयामध्ये वातानुकूलन यंत्रणा बसविणे. | 15,00,000 |

| | | |
|---|---|---|
| **4** | ग क्षेत्रिय कार्यालयातील क्षेत्रिय समितीच्या मिटींग हॉल मध्ये Public Address Conference System बसविणे. | 8,00,000 |
| 5 | ग क्षेत्रिय कार्यालयाचे टेरेसवर सौर विज यंत्रणा बसविणे. | 50,00,000 |
| 6 | ग क्षेत्रिय कार्यालयाकरीता आवश्यकतेनुसार विद्युतीकरणाचे काम करणे. | 15,00,000 |
| 7 | ग क्षेत्रिय कार्यालयाकरीता अंतर्गत दुरध्वनी (EPBAX) यंत्रणा बसविणे. | 15,00,000 |
| | **ग क्षेत्रीय कार्यालयाकरीता विद्युत विषयक कामे करणे(भांडवली)** | **13500000** |

उपरोक्त तक्त्यात नमुदप्रमाणे वरील १ते ७ या कामाची नावे सन २०१७-१८ चे मनपाचे अंदाजपत्रकात समाविष्ट करणेस तसेच सदरहु खर्चास प्रशासकीय मान्यता देणेत यावी. तसेच सन २०१७-१८ या आर्थीक वर्षात खालील नमुद केलेल्या कामांची आवश्यकता असून नागरीकांच्या सोईसाठी सदरची कामे करणे गरजेचे आहे.

| अ.क्र. | कामाचे नाव | अंदाजपत्रकीय रक्कम रुपये |
|---|---|---|
| १ | नवीन प्रभाग क्र. २८ येथील रहाटणी मनपा शाळा ते पिंपळे सौदागर स्मशानभूमी पर्यंतच्या रस्त्यांचे युटीडब्ल्यूटी पध्दतीने काँक्रीटीकरण करणे. | ८,००,००,०००/- |
| २ | नवीन प्रभाग क्र. २८ येथील पिंपळेसौदागर स्मशानभूमी ते स.नं. २३ पर्यंतचा १२ मी. रुंदीचा डीपी रस्ता विकसीत करणे. | ३,००,००,०००/- |

तरी वर नमुद केलेप्रमाणे सन २०१७-१८ च्या मुळ अर्थसंकल्पात सदर कामांचा नव्याने समावेश करुन त्यास प्रशासकीय मान्यता देणेत यावी. तसेच पिंपरी चिंचवड महानगरपालिका अ क्षेत्रीय कार्यालयाअंतर्गत नवीन प्रभाग क्र.१९ मधील नाल्याच्या भींती बहुतांश ठिकाणी दगडी बांधकामात आहेत सदर नाल्यांच्या भींती जागोजागी पावसाळयात पडण्याच्या घटना घडत आहेत. सदर नाल्यांच्या भींती कमकुवत झाल्या असून जागोजागी भींतीलगत मोठी झाडे वाढली आहेत त्यामुळे भविष्यातही नाल्याच्या भींती पडू शकतात त्यामुळे सदरच्या नाल्याच्या भींती पुर्णपणे नव्याने बांधणे व अनुषंगीक कामे करणे आवश्यक आहे. पिंपरी चिंचवड महानगरपालिका अंदाजपत्रक ३, सन २०१७-१८ मध्ये अ क्षेत्रीय मुख्य कार्यालयाच्या अंतर्गत-लेखाशिर्ष भांडवली खर्च (नाला ट्रेनिंग ) पान क्र.१०१ अ.क्र. ६७ वर "प्रभाग क्र. १९ मधील नाल्यांना आरसीसी भींत बांधणे व अनुषंगीक कामे करणे" या नवीन कामांचा समावेश करुन त्याकरिता र.रु. १० कोटीस प्रशासकीय मान्यता देणेत यावी. तसेच प्रभाग क्र.४ कृष्णानगर (नवीन प्रभाग क्र. ११ कृष्णानगर, पुर्णानगर) येथील शरद नगर ते शिवाजी पार्कला जोडणा-या स्पाईन रस्त्यावर ओव्हरब्रीज बांधणेचे कामाचा समावेश सन २०१७-१८ च्या अंदाजपत्रकात ''स्थापत्य विशेष योजना'' या लेखाशिर्षांतर्गत करण्यात आलेला आहे. सदर कामा करिता पान क्र. १६ अ.क्र.१५ अन्वये. र.रु. ४५,००,०००/- इतकी तरतूद असून मा.स्थायी समिती ठ.क्र. ८५१ दि.२३/८/२०१७ नुसार र.रु.४,००,००,०००/- इतकी तरतूद वर्ग करण्यात आलेली आहे व

सदर कामावर एकूण र.रु.४,४५,००,०००/- इतकी आहे. सदर ठिकाणी नागरीकांच्या सोईकरिता ओव्हरब्रीज ऐवजी पादचारी भुयारी मार्ग केल्यास त्याचा नागरीक जादा वापर करतील तसेच ज्येष्ठ नागरीक महीला यांनाही त्याचा वापर सहजरीत्या करता येईल त्यामुळे त्याठिकाणी ओव्हरब्रीज ऐवजी पादचारी भुयारी मार्ग करावा अशी मागणी संबंधित प्रभागातील नगरसदस्य यांनी केली आहे. तरी उपरोक्त प्रभाग क्र.४ कृष्णानगर (नवीन प्रभाग क्र.११ कृष्णानगर, पुर्णानगर) येथील शरद नगर ते शिवाजी पार्कला जोडणा-या स्पाईन रस्त्यावर ओव्हरब्रीज बांधणे ऐवजी पादचारी भुयारीमार्ग करणे अशी सुधारणा करुन त्यास मान्यता देणेत यावी. तसेच सन २०१७-१८ या आर्थीक वर्षात खाली नमुद केलेल्या कामांची आवश्यकता असून नागरीकांच्या सोईसाठी सदरची कामे करणे गरजेचे आहे.

| अ.क्र. | कामाचे नाव | आवश्यक प्रशासकीय मान्यता र.रु. |
|---|---|---|
| १ | ग प्रभागांतर्गत खाजगी कंपन्या व मनपा मार्फत विवीध सेवा वाहीन्या टाकण्यासाठी खोदकाम केल्याने झालेले चर एमपीएमबीएम व बीसी पध्दतीने डांबरीकरण करणे. | र.रु.७,००,००,०००/- |

तरी वर नमुद केलेप्रमाणे सन २०१७-१८ या अर्थसंकल्पात सदर कामाचा समावेश करुन प्रशासकीय मान्यता देणेत यावी. तसेच सन २०१७-१८ या आर्थिक वर्षात खालील नमुद केलेल्या कामांची आवश्यकता असून नागरिकांच्या सोयीसाठी सदरची कामे करणे गरजेचे आहे.

| **अनु क्र.** | **कामाचे नाव** | **आवश्यक प्रशासकीय मान्यता र.रू.** |
|---|---|---|
| १ | ड प्रभाग अंतर्गत खाजगी कंपन्या व मनपा मार्फत विविध सेवा वाहिन्या टाकणेसाठी खोदकाम केल्याने झालेले चर एम.पी.एम, बी.एम. व बी.सी. पद्धतीने डांबरीकरण करणे. | र.रू.१०,००,००,०००/- |
| २ | प्रभाग क्र.२६ पिंपळे निलख येथील रक्षक चौक ते पिंपळे निलख गावठाणातून संरक्षण विभागाच्या हद्दीतून जाणा-या १८.०० मी. डी.पी. रस्त्यास सब-वे करणे, व ताब्यात येणारा १२.०० मी. रूंदीचा डी.पी. रस्ता विकसीत करणे. | र.रू.११,००,००,०००/- |
| ३ | प्रभाग क्र.२६ मधील नाल्यांची स्थापत्य विषयक कामे करणे. | र.रू.३,००,००,०००/- |

तरी वर नमूद केलेप्रमाणे सन २०१७-२०१८ च्या अर्थसंकल्पात सदर कामांचा समावेश करून त्यास प्रशासकीय मान्यता देणेत यावी.

**मा.मनिषा पवार** – मा.महापौर साहेब, उपसूचनेला अनुमोदन आहे.

**मा.योगेश बहल-**सन्मा.महापौर साहेब,मा.आयुक्त साहेब,सर्व सन्मा.सभागृह, मी मघाशी उल्लेख केला होता. जी ड्रेनेजची नलिका आहे ती स्वच्छ करण्यासाठी ठेका देण्याचा विषय आहे.

या विषयाला आमचा विरोध नाही. जो कोणी ठेकेदार असेल त्याच्याकडे proper equipment आहेत की नाहीत, मॅनपॉवर आहे का नाही, प्रॉपर कंट्रोल होते आहे का नाही, टर्मस् आणि कंडीशन्स कशा असाव्यात, या गोष्टी तुम्ही बारकाईने बघाव्यात, एवढीच विनंती आहे.

**मा.आरती चोंधे** – मा.महापौर साहेब, उपसूचना स्विकारली आहे.

**मा.महापौर** – हा विषय उपसूचनेसहीत मंजूर करण्यात येत आहे.

यानंतर उपसूचनेप्रमाणेचा ठराव मतास टाकणेत आला असता -

ठराव क्रमांक - ९७ विषय क्रमांक – १४
दिनांक- १६/१०/२०१७ विभाग- मा.आयुक्त

संदर्भ – १) मा.महापालिका आयुक्त यांचेकडील जा.क्र.जनि/१०/कावि/५०/२०१७ दि.०६/१०/२०१७

पिंपरी चिंचवड महानगरपालिकेत ग आणि ह क्षेत्रीय कार्यालय नव्याने झाले असल्याने सदर क्षेत्रीय कार्यालयाचे कार्यक्षेत्रात जलनिसःरण नलिकांची वार्षिक ठेकेदारी पध्दतीने साफसफाई करणे व चोकअप काढणे यासाठी स्वतंत्र व्यवस्था नाही. त्यामुळे खालील कामांचा सन २०१७-१८ च्या अंदाजपत्रकात समावेश करून व सदर कामांना प्रत्येकी ५०,००,०००/- (अक्षरी र.रू. पन्नास लाख फक्त) याप्रमाणे तरतूद करणेस व सदर तरतूद चिखली येथे मैला शुध्दीकरण केंद्र बांधणे या कामातून वर्ग करणेस मान्यता देणेत येत आहे तसेच सदर कामांना प्रशासकीय मान्यता देणेत येत आहे.

१. ग क्षेत्रीय कार्यालयाचे क्षेत्रातील जलनिसःरण नलिकांची वार्षिक ठेकेदारी पध्दतीने साफसफाई करणे व चोकअप काढणे. अंदाजपत्रकीय रक्कम वार्षिक र.रू. १,०६,००,०००/- (अक्षरी र.रू. एक कोटी सहा लाख रूपये फक्त) – तरतूद रक्कम रूपये ५०,००,०००/- (अक्षरी र.रू. पन्नास लाख फक्त) यास मान्यता देणेत येत आहे.
२. ह क्षेत्रीय कार्यालयाचे क्षेत्रातील जलनिसःरण नलिकांची वार्षिक ठेकेदारी पध्दतीने साफसफाई करणे व चोकअप काढणे. अंदाजपत्रकीय रक्कम वार्षिक र.रू. १,०६,००,०००/- (अक्षरी र.रू.एक कोटी सहा लाख रूपये फक्त) – तरतूद रक्कम रूपये ५०,००,०००/- (अक्षरी र.रू. पन्नास लाख फक्त) यास मान्यता देण्यात येत आहे तसेच प्रभाग क्र. ५७ पिंपळे गुरव (नवीन प्रभाग क्र. ३१) येथील आवश्यकतेनुसार स्थापत्य विषयक कामांचा अंदाजपत्रकामध्ये समावेश करुन प्रशासकीय रक्कमेस मान्यता देणेत येत आहे.

| अ.क्र. | कामाचे नाव | पान क्र. | अ.क्र. | अंदाजपत्रकीय रक्कम |
|---|---|---|---|---|
| १ | प्रभाग क्र. ५७ (नवीन प्रभाग ३१) पिंपळे गुरव मधील बँक ऑफ महाराष्ट्र ते ओरीयाना इमारतीपर्यंतचा रस्ता अदयावत | - | - | १०,००,००,००० |

| | | | | |
|---|---|---|---|---|
| | पध्दतीने विकसित करणे. | | | |
| २ | प्रभाग क्र. ५७ (नवीन प्रभाग ३१) पिपळे गुरव मधील काटेपुरम चौक ते मनपा शाळा पर्यंतचा रस्ता अदयावत पध्दतीने विकसित करणे. | - | - | १०,००,००,००० |

सदर कामाचा अंदाजपत्रकात समावेश करुन सदर कामास प्रशासकीय मान्यता देणेत येत आहे. तसेच दि.९/१०/२०१७ रोजी भीमसृष्टी प्रकल्पाबाबत झालेल्या बैठकीत माता रमाईचा पुतळा डॉ. बाबासाहेब आंबेडकर पुतळा परिसरात उभारणेबाबत निर्णय घेणेत आला आहे. सदर काम करण्याच्या दृष्टिने खालील प्रमाणे कामाच्या नावाचा २०१७-१८ च्या अंदाजपत्रकात समावेश करुन अंदाजपत्रकीय रक्कमेस प्रशासकीय मान्यता देणेत येत आहे.

| लेखाशिर्ष | कामाचे नाव | वॉर्ड क्र. | अंदाजपत्रकीय रक्कम |
|---|---|---|---|
| विशेष योजना | भारतरत्न डॉ.बाबासाहेब आंबेडकर पुतळा पिंपरी चौक येथील पुतळा परिसरात माता रमाईचा पुतळा उभारणे व स्थापत्य विषयक कामे करणे. | ९ | ४,००,००,०००/- |

तसेच मनपा परिसरातील विविध भागामध्ये आवश्यकतेनुसार स्थापत्य विषयक कामांचा अंदाजपत्रकामध्ये समावेश करुन प्रशासकीय मान्यता देणेत येत आहे.

| अ.क्र. | कामाचे नाव | पान क्र. | अ.क्र. | अंदाजपत्रकीय रक्कम |
|---|---|---|---|---|
| १ | ह प्रभाग ठिकठिकाणी आवश्यकतेनुसार डांबरीकरण करणे. | - | - | ५,००,००,००० |
| २ | ब प्रभाग ठिकठिकाणी आवश्यकतेनुसार डांबरीकरण करणे. | - | - | ५,००,००,००० |
| ३ | ड प्रभाग ठिकठिकाणी आवश्यकतेनुसार डांबरीकरण करणे. | - | - | ५,००,००,००० |
| ४ | ग प्रभाग ठिकठिकाणी आवश्यकतेनुसार डांबरीकरण करणे. | - | - | ५,००,००,००० |
| ५ | क प्रभाग ठिकठिकाणी आवश्यकतेनुसार डांबरीकरण करणे. | - | - | ५,००,००,००० |

तसेच प्रभाग क्र. १० मध्ये शाहू उदयान, बर्ड व्हॅली उदयान, शिवशाहू शंभो उदयान ही तीन उदयाने आहेत. सदरची उदयाने साधारणपणे १५ ते २० वर्षापुर्वी करण्यात आलेली आहेत. आता सदर उदयानाचे नुतनीकरण करणे गरजेचे आहे. त्यासाठी खालीलप्रमाणे कामांच्या नावांचा सन २०१७-१८ च्या अंदाजपत्रकामध्ये समावेश करुन अंदाजपत्रकीय रक्कमेस प्रशासकीय मान्यता देणेत येत आहे.

| लेखाशिर्ष | कामाचे नाव | वॉर्ड क्र. | कामाची अंदाजपत्रकीय रक्कम |
|---|---|---|---|
| स्थापत्य उदयाने | प्रभाग क्र. १० मधील शाहू उदयानाचे आकर्षक असे नुतनीकरण करणे. | १० | ३,००,००,०००/- |
| स्थापत्य उदयाने | प्रभाग क्र. १० मधील बर्ड व्हॅली उदयानाचे नुतनीकरणाचे कामे करणे. | १० | ३,५०,००,०००/- |
| स्थापत्य उदयाने | प्रभाग क्र. १० मधील शिवशाहू शंभो उदयानाचे नुतनीकरणाचे कामे करणे. | १० | ३,००,००,०००/- |

तसेच सन २०१७-१८ चे आर्थीक वर्षात खालील नमुद केलेल्या कामांची आवश्यकता असुन नागरीकांच्या सोईसाठी सदरची काम करणे गरजेचे आहे.

| अ.क्र. | कामाचे नाव | अंदाजपत्रकीय रक्कम रुपये | आवश्यक तरतूद रक्कम रु. |
|---|---|---|---|
| १ | पिंपरी चिंचवड महानगरपालिका क्षेत्रातील थेरगाव डांगे चौक येथील शिवछत्रपती उद्यानात चौकातील पिण्याच्या पाण्याची पाणपोई टाकीसह बांधकाम करणे (जीआरसी टाईप) तसेचग्रेनाईट व आरसीसी बांधकामासह | १६,८७,३००/- | ० |

तरी वर नमुद केलेप्रमाणे सन २०१७-१८ च्या मुळ अर्थसंकल्पात सदर कामाचा नव्याने समावेश करुन सदर कामास प्रशासकीय मान्यता देणेत येत आहे. तसेच पिंपरी चिंचवड महानगरपालिकेचा ग क्षेत्रीय कार्यालय दि ९/८/२०१७ पासुन कार्यरत झाले आहे. सदर क्षेत्रीय कार्यालयाची सुरवात सन २०१७-१८ चे अंदाजपत्राकास मान्यता मिळाले नंतर झाली असल्याने, सदर कार्यालयास खालील आवश्यक कामाकरीता तरतुद करणे शक्य झाले नाही. तरी सदरची कामे करणे आवश्यक असल्याने त्या कामाची नावे अंदाजपत्रकात समाविष्ट करणे अत्यावश्यक आहे.

लेखाशिर्ष **“ग क्षेत्रीय कार्यालयाकरीता विद्युत विषयक कामे करणे (भांडवली)”**

| अ.क्र. | उपलेखाशिर्ष | अंदाजपत्रकीय र.रु. |
|---|---|---|
| **1** | ग क्षेत्रिय कार्यालय इमारतीस विजपुरवठा करणेसाठी जनरेटरची व्यवस्था करणे. | 12,00,000 |
| **2** | ग क्षेत्रिय कार्यालय इमारतीस उदवाहक (Lift) बसविणे. | 20,00,000 |

| | | |
|---|---|---|
| **3** | ग क्षेत्रिय कार्यालयातील क्षेत्रिय समितीच्या मिटींग हॉल मध्ये व मा.अध्यक्ष यांचे कार्यालयामध्ये वातानुकुलन यंत्रणा बसविणे. | 15,00,000 |
| **4** | ग क्षेत्रिय कार्यालयातील क्षेत्रिय समितीच्या मिटींग हॉल मध्ये Public Address Conference System बसविणे. | 8,00,000 |
| 5 | ग क्षेत्रिय कार्यालयाचे टेरेसवर सौर विज यंत्रणा बसविणे. | 50,00,000 |
| 6 | ग क्षेत्रिय कार्यालयाकरीता आवश्यकतेनुसार विद्युतीकरणाचे काम करणे. | 15,00,000 |
| 7 | ग क्षेत्रिय कार्यालयाकरीता अंतर्गत दुरध्वनी (EPBAX) यंत्रणा बसविणे. | 15,00,000 |
| | **ग क्षेत्रीय कार्यालयाकरीता विद्युत विषयक कामे करणे(भांडवली)** | **1,35,00,000** |

उपरोक्त तक्त्यात नमुदप्रमाणे वरील १ते ७ या कामाची नावे सन २०१७-१८ चे मनपाचे अंदाजपत्रकात समाविष्ट करणेस तसेच सदरहु खर्चास प्रशासकीय मान्यता देणेत येत आहे. तसेच सन २०१७-१८ या आर्थीक वर्षात खालील नमुद केलेल्या कामांची आवश्यकता असून नागरीकांच्या सोईसाठी सदरची कामे करणे गरजेचे आहे.

| अ.क्र. | कामाचे नाव | अंदाजपत्रकीय रक्कम रुपये |
|---|---|---|
| १ | नवीन प्रभाग क्र. २८ येथील रहाटणी मनपा शाळा ते पिंपळे सौदागर स्मशानभूमी पर्यंतच्या रस्त्यांचे युटीडब्ल्यूटी पध्दतीने कॉंक्रीटीकरण करणे. | ८,००,००,०००/- |
| २ | नवीन प्रभाग क्र. २८ येथील पिंपळेसौदागर स्मशानभूमी ते स.नं. २३ पर्यंतचा १२ मी. रुंदीचा डीपी रस्ता विकसीत करणे. | ३,००,००,०००/- |

तरी वर नमुद केलेप्रमाणे सन २०१७-१८ च्या मुळ अर्थसंकल्पात सदर कामांचा नव्याने समावेश करुन त्यास प्रशासकीय मान्यता देणेत येत आहे. तसेच पिंपरी चिंचवड महानगरपालिका अ क्षेत्रीय कार्यालया अंतर्गत नवीन प्रभाग क्र.१९ मधील नाल्याच्या भींती बहुतांश ठिकाणी दगडी बांधकामात आहेत सदर नाल्यांच्या भींती जागोजागी पावसाळयात पडण्याच्या घटना घडत आहेत. सदर नाल्यांच्या भींती कमकुवत झाल्या असून जागोजागी भींतीलगत मोठी झाडे वाढली आहेत त्यामुळे भविष्यातही नाल्याच्या भींती पडू शकतात त्यामुळे सदरच्या नाल्याच्या भींती पुर्णपणे नव्याने बांधणे व अनुषंगीक कामे करणे आवश्यक आहे. पिंपरी चिंचवड महानगरपालिका अंदाजपत्रक ३, सन २०१७-१८ मध्ये अ क्षेत्रीय मुख्य कार्यालयाच्या अंतर्गत-लेखाशिर्ष भांडवली खर्च (नाला ट्रेनिंग ) पान क्र. १०१ अ.क्र. ६७ वर "प्रभाग क्र. १९ मधील नाल्यांना आरसीसी भींत बांधणे व अनुषंगीक कामे करणे" या नवीन कामांचा समावेश करुन त्याकरिता र.रु.१० कोटीस प्रशासकीय मान्यता देणेत येत आहे. तसेच प्रभाग क्र. ४ कृष्णानगर (नवीन प्रभाग क्र. ११ कृष्णानगर, पुर्णानगर) येथील शरद नगर ते शिवाजी पार्कला जोडणा-या स्पाईन रस्त्यावर ओव्हरब्रीज बांधणेचे कामाचा समावेश सन २०१७-१८ च्या अंदाजपत्रकात ''स्थापत्य विशेष योजना'' या लेखाशिर्षांतर्गत करण्यात आलेला

आहे. सदर कामा करिता पान क्र.१६ अ.क्र.१५ अन्वये. र.रु. ४५,००,०००/- इतकी तरतूद असून मा.स्थायी समिती ठ.क्र.८५१ दि.२३/८/२०१७ नुसार र.रु.४,००,००,०००/- इतकी तरतूद वर्ग करण्यात आलेली आहे व सदर कामावर एकूण र.रु.४,४५,००,०००/- इतकी आहे. सदर ठिकाणी नागरीकांच्या सोईकरिता ओव्हरब्रीज ऐवजी पादचारी भुयारी मार्ग केल्यास त्याचा नागरीक जादा वापर करतील तसेच ज्येष्ठ नागरीक महीला यांनाही त्याचा वापर सहजरीत्या करता येईल त्यामुळे त्याठिकाणी ओव्हरब्रीज ऐवजी पादचारी भुयारी मार्ग करावा अशी मागणी संबंधित प्रभागातील नगरसदस्य यांनी केली आहे तरी उपरोक्त प्रभाग क्र. ४ कृष्णानगर (नवीन प्रभाग क्र. ११ कृष्णानगर, पुर्णानगर) येथील शरद नगर ते शिवाजी पार्कला जोडणा-या स्पाईन रस्त्यावर ओव्हरब्रीज बांधणे ऐवजी पादचारी भुयारीमार्ग करणे अशी सुधारणा करुन त्यास मान्यता देणेत येत आहे. तसेच सन २०१७-१८ या आर्थीक वर्षात खाली नमुद केलेल्या कामांची आवश्यकता असून नागरीकांच्या सोईसाठी सदरची कामे करणे गरजेचे आहे.

| अ.क्र. | कामाचे नाव | आवश्यक प्रशासकीय मान्यता र.रु. |
|---|---|---|
| १ | ग प्रभागांतर्गत खाजगी कंपन्या व मनपा मार्फत विवीध सेवा वाहीन्या टाकण्यासाठी खोदकाम केल्याने झालेले चर एमपीएमबीएम व बीसी पध्दतीने डांबरीकरण करणे. | र.रु. ७,००,००,०००/- |

तरी वर नमुद केलेप्रमाणे सन २०१७-१८ या अर्थसंकल्पात सदर कामाचा समावेश करुन प्रशासकीय मान्यता देणेत येत आहे. तसेच सन २०१७-१८ या आर्थिक वर्षात खालील नमुद केलेल्या कामांची आवश्यकता असून नागरिकांच्या सोयीसाठी सदरची कामे करणे गरजेचे आहे.

| **अनु क्र.** | **कामाचे नाव** | **आवश्यक प्रशासकीय मान्यता र.रू.** |
|---|---|---|
| १ | ड प्रभाग अंतर्गत खाजगी कंपन्या व मनपा मार्फत विविध सेवा वाहिन्या टाकणेसाठी खोदकाम केल्याने झालेले चर एम.पी.एम, बी.एम. व बी.सी. पद्धतीने डांबरीकरण करणे. | र.रू.१०,००,००,०००/- |
| २ | प्रभाग क्र.२६ पिंपळे निलख येथील रक्षक चौक ते पिंपळे निलख गावठाणातून संरक्षण विभागाच्या हद्दीतून जाणा-या १८.०० मी. डी.पी. रस्त्यास सब-वे करणे, व ताब्यात येणारा १२.०० मी. रूंदीचा डी.पी. रस्ता विकसीत करणे. | र.रू.११,००,००,०००/- |
| ३ | प्रभाग क्र.२६ मधील नाल्यांची स्थापत्य विषयक कामे करणे. | र.रू.३,००,००,०००/- |

तरी वर नमूद केलेप्रमाणे सन २०१७-२०१८ च्या अर्थसंकल्पात सदर कामांचा समावेश करून त्यास प्रशासकीय मान्यता देणेत येत आहे.

अनुकूल-८१ प्रतिकूल- ०

अशी मते पडली व सदर ठराव सर्वानुमते मान्य झाल्याचे मा.महापौर यांनी प्रकट केले.

-------

**मा.राहूल जाधव-** मा.महापौर साहेब,विषय क्रमांक १५वर मी पुढीलप्रमाणे ठराव मांडतो.

ठराव क्रमांक - ९८ विषय क्रमांक – १५

दिनांक- १६/१०/२०१७ विभाग- मा.नगरसचिव

**मा.विधी समिती**

अ) दि.०४/०८/२०१७ चा सभावृत्तांत कायम करणेत येत आहे.

ब) दि.१८/०८/२०१७, दि.०१/०९/२०१७, दि.०७/०९/२०१७, दि.०८/०९/२०१७ चा सभावृत्तांत कायम करणेत येत आहे.

क) दि.०१/०९/२०१७, दि.०७/०९/२०१७ व दि.०८/०९/२०१७ चा सभावृत्तांत कायम करणेत येत आहे.

ड) दि.१५/०९/२०१७ चा सभावृत्तांत कायम करणेत येत आहे.

**मा.नवनाथ जगताप** - मा.महापौर साहेब,ठरावाला अनुमोदन आहे.

यानंतर सदर ठराव मतास टाकणेत आला असता –

अनुकूल-८१ प्रतिकूल- ०

अशी मते पडली व सदर ठराव सर्वानुमते मान्य झाल्याचे मा.महापौर यांनी प्रकट केले.

-------

**मा.राहूल जाधव -** मा.महापौर साहेब,विषय क्रमांक १६वर मी पुढीलप्रमाणे ठराव मांडतो.

ठराव क्रमांक -९९ विषय क्रमांक – १६

दिनांक- १६/१०/२०१७ विभाग- मा.नगरसचिव

**मा.महिला व बालकल्याण समिती**

अ) दि.०६/०९/२०१७ चा सभावृत्तांत कायम करणेत येत आहे.

ब) दि.१९/०९/२०१७ चा सभावृत्तांत कायम करणेत येत आहे.

**मा.नवनाथ जगताप** - मा.महापौर साहेब, ठरावाला अनुमोदन आहे.

यानंतर सदर ठराव मतास टाकणेत आला असता –

अनुकूल-८१ प्रतिकूल- ०

अशी मते पडली व सदर ठराव सर्वानुमते मान्य झाल्याचे मा.महापौर यांनी प्रकट केले.

-------

**मा.राहूल जाधव -** मा.महापौर साहेब,विषय क्रमांक १७वर मी पुढीलप्रमाणे ठराव मांडतो.

ठराव क्रमांक -१०० विषय क्रमांक – १७
दिनांक- १६/१०/२०१७ विभाग- मा.नगरसचिव

**मा.शहर सुधारणा समिती**

दि.२२/०८/२०१७ चा सभावृत्तांत कायम करणेत यत आहे.

**मा.नवनाथ जगताप-** मा.महापौर साहेब, ठरावाला अनुमोदन आहे.

यानंतर सदर ठराव मतास टाकणेत आला असता –

अनुकूल-८१ प्रतिकूल- ०

अशी मते पडली व सदर ठराव सर्वानुमते मान्य झाल्याचे मा.महापौर यांनी प्रकट केले.

-------

**मा.राहूल जाधव -** मा.महापौर साहेब,विषय क्रमांक १८वर मी पुढीलप्रमाणे ठराव मांडतो.

ठराव क्रमांक - १०१ विषय क्रमांक – १८
दिनांक- १६/१०/२०१७ विभाग- मा.नगरसचिव

**मा.क्रीडा कला साहित्य व सांस्कृतिक समिती**

अ) दि.०८/०९/२०१७ चा सभावृत्तांत कायम करणेत येत आहे.

**मा.नवनाथ जगताप-** मा.महापौर साहेब, ठरावाला अनुमोदन आहे.

यानंतर सदर ठराव मतास टाकणेत आला असता –

अनुकूल-८१ प्रतिकूल- ०

अशी मते पडली व सदर ठराव सर्वानुमते मान्य झाल्याचे मा.महापौर यांनी प्रकट केले.

-------

**मा.दत्तात्रय साने-**मा.महापौर साहेब,मा.आयुक्त साहेब,सर्व सन्मा.सभागृह,आज आपल्या शहरामध्ये जे फटाके स्टॉल्स लावलेले आहेत. त्या फटाक्यांच्या स्टॉल्सना आपली कुठलीही परमिशन नसताना आपण ते लावलेले आहेत. मंडळाच्या माध्यमातून नवरात्र असो,दहीहंडी असो,कार्यक्रमाच्या माध्यमातून आम्हाला अधिकृत पैसे भरल्याशिवाय कुठल्याही कार्यकर्त्याला किंवा मंडळाला स्टेज किंवा अन्य काही करू दिले जात नाही. पण आज शहरावर मध्यवर्ती ठिकाणी तिथे जर एखादा फटाके स्टॉल फुटला तर फार मोठा विध्वंस होऊ शकतो. परवा मी ऑनलाईन तक्रार दिली आहे की, आपल्या परिसरामध्ये चांगल्या मेन रोडवर फटाक्यांचे स्टॉल लागलेले आहेत. आम्ही आमच्या कार्यकर्त्यांना सांगितले आहे की, स्टॉल्स् लावू नका आणि समोरच्या काही लोकांनी तिथे बिनधास्तपणे स्टॉल लावलेले आहेत. याचा अर्थ आम्ही तक्रार देऊनसुद्धा कारवाई होत नसेल तर शहरामध्ये जी काही दुर्घटना होणार आहे याला सर्वस्वी जबाबदार कोण. मा.महापौर साहेब, हा विषय अतिशय गांभिर्याने घेण्यासारखा आहे. उद्या जर एखादा स्टॉल रस्त्यावर टाकलेला असताना त्याला महापालिकेची किंवा अग्निशामक विभागाची कोणतीही परमिशन नाही. अन्य कुठल्याही प्रकारची परमिशन नसताना शहरामध्ये ॲक्सीडेंट झाला तर त्याला आपणच जबाबदार असू. म्हणून मा.आयुक्त साहेब, आपल्याला विनंती आहे, जे अनधिकृत स्टॉल्स् आहेत, आपण ते ताबडतोब काढण्यात यावेत, अशी माझी मा.महापौर साहेब आपल्याला विनंती आहे.

**मा.महापौर-**मा.आयुक्त साहेब, आदेश देण्यात येत आहे की, असे काही स्टॉल्स असतील तर ते काढून टाकण्यात यावेत.

**मा.अजित गव्हाणे-**मा.महापौर साहेब,मा.आयुक्त साहेब, मा.दत्ता काका साने यांनी जो विषय मांडला आहे,आख्ख्या शहरामध्ये हीच परिस्थिती आहे. आत्ता तुम्ही जरी सांगितलं तरी प्रभागांमधून ही कारवाई होणं शक्य नाही. कारण तिथे शंभर टक्के अडचणी निर्माण होणार आहेत. कारवाई होऊ शकत नाही. तर यानिमित्ताने माझी अशी एक सूचना आहे की, आपल्याकडे प्रत्येक ठिकाणी रिझर्वेशन्स आहेत,मोकळ्या जागा आहेत. जर आपण या स्टॉलस् ची यादी केलीतर पुढच्या वर्षीपासून आपण एकाच ठिकाणी सगळ्यांना परवानगी देऊ शकू. लोकांनाही अडथळा होणार नाही. अधिकृत परवानगी मिळेल आणि भविष्यात निश्चितपणे दूर्घटना होणार नाहीत. आपण यापद्धतीने विचार करावा व तशा प्रकारची अंमलबजावणी करावी. आज दिवाळी आहे. मा.दत्ता काका साने यांनी दिवाळीच्या शुभेच्छा द्याव्यात. आणि त्यांचे म्हणणे आहे की, राष्ट्रवादी काँग्रेसच्या वतीने सगळ्यांना मनापासून दिवाळीच्या शुभेच्छा द्याव्यात. सर्वांना राष्ट्रवादी काँग्रेसच्या वतीने दिवाळीच्या शुभेच्छा.

**मा.महापौर**-सन्मा.नगरसेवक,नगरसेविका पत्रकार बंधू तसेच मा.आयुक्त साहेब अधिकारी सर्वांना प्रथम दिवाळीच्या हार्दीक शुभेच्छा देतो. तसेच नागरीकांना देखील हार्दीक शुभेच्छा देतो. भारतीय जनता पक्षाच्या वतीने सगळ्यांना शुभेच्छा देतो. सभागृहाच्या वतीने शुभेच्छा देतो. महापौर या नात्याने, च-होलीच्या गावाच्या वतीने, काळजे परिवाराकडून शुभेच्छा देतो. आणि सर्वांचे आभार मानून ही सभा संपल्याचे जाहीर करतो.

-------------

**(नितीन (आप्पा) प्रताप काळजे)**
**महापौर**
पिंपरी चिंचवड महानगरपालिका
पिंपरी -४११ ०१८.

पिंपरी चिंचवड महानगरपालिका
पिंपरी-४११ ०१८.
नगरसचिव कार्यालय
क्रमांक-नस/१०/कावि/९७/२०१८
दिनांक-०१/०१/२०१८

**नगरसचिव**
पिंपरी चिंचवड महानगरपालिका
पिंपरी – ४११ ०१८.

प्रत – सर्व संबंधित शाखाप्रमुख व शाखाधिकारी यांजकडे पुढील योग्य त्या कार्यवाहीसाठी रवाना.

**(मा.विधी समितीकडील ठराव क्रमांक ३७ दि.६/१०/२०१७ व मा.मनपा सभा विषय क्र.६ चे लगत )**

**परिशिष्ट अ**

**महापालिका अधिकारी व पदाधिकारी यांना महापालिका कामकाजासाठी ऐच्छिक पध्दतीने खाजगी वाहन वापरण्यास परवानगी देणेसंदर्भात धोरण**

महापालिका अधिकारी व पदाधिकारी यांना महापालिका कामकाजासाठी वाहन अनुज्ञेय करण्यात आले असून त्याचा सन २०१६-१७ मधील सरासरी मासिक खर्च खालीलप्रमाणे आहे.

| **अधिकारी / पदाधिकारी** | **अंदाजे र.रु. (दर महा)** |
|---|---|
| मा.महापौर | ९९८२६/- |
| उपमहापौर व इतर पदाधिकारी | ६३१४१/- |
| अधिकारी वर्ग १ | ८७८७७/- |
| अधिकारी वर्ग २ | ६९४६८/- |

वरीलप्रमाणेचा वाहनावरील खर्च पाहता महापालिका अधिकारी व पदाधिकारी यांना महापालिका कामकाजासाठी ऐच्छिक पध्दतीने खाजगी वाहन प्रतिपूर्ती म्हणून ठोक रक्कम देणे अनुज्ञेय केल्यास महापालिकेचा आर्थिक लाभ होणार आहे. त्याकरीता खालीलप्रमाणे प्रतिपूर्ती रक्कम निश्चित करणे उचित आहे.

| **वाहनांची निश्चित किंमत** | **र.रु. १० लाख पेक्षा जास्त (मा.महापौर, आयुक्त)** | **र.रु ०६ लाख पर्यंत (इतर पदाधिकारी, वर्ग १ दर्जाचे अधिकारी)** | **वर्ग २ चे अधिकारी** |
|---|---|---|---|
| देखभाल दुरुस्ती, एक वेळचा कर, विमा | रु.२०९३५/- | रु.१२५६०/- | रु.८३७३/- |
| इंधन | रु.१६०००/- (पेट्रोल) | रु.१२०००/- (पेट्रोल) | रु.१००००/- (पेट्रोल) |
| | रु.१२०००/- (डिझेल) | रु.९०००/- (डिझेल) | रु.७५००/- (डिझेल) |
| वाहन चालकाचा पगार | रु.३०,०००/- (२ वाहनचालक) | रु.१५०००/- (१ वाहनचालक) | रु.१५०००/- (१ वाहनचालक) |
| **एकूण** | **रु.६६९३५/- (पेट्रोल वाहन)** | **रु.३९५६०/- (पेट्रोल वाहन)** | **रु.३३३७३/- (पेट्रोल वाहन)** |
| | **रु.६२९३५/- (डिझेल वाहन)** | **रु.३६५६०/- (डिझेल वाहन)** | **रु.३०८७३/- (डिझेल वाहन)** |

प्रशासनाने प्रस्तावित केलेल्या रकमेमध्ये वाढ / घट करणेबाबतचा निर्णय मा.विधी / महापालिका सभेने घ्यावयाचा आहे.

**अटी व शर्ती –**

१) सदरची योजना ही ऐच्छिक स्वरुपाची असून याबाबतची मागणी योग्यत्या सक्षम प्राधिका-यामार्फत येणे आवश्यक आहे.

२) मनपा कामकाजासाठी वापरण्यात येणारे खाजगी वाहन हे अधिकारी / पदाधिकारी यांच्या स्वतःचे अथवा कुटुंबातील (पती / पत्नी / अविवाहीत मुलगा / अविवाहित मुलगी / आई / वडील) सदस्यांचे नावावर नोंदणीकृत असणे आवश्यक आहे.

३) हा पर्याय स्विकारणा-या अधिकारी / पदाधिकारी यांनी सक्षम अधिका-यांकडून खाजगी वाहन महापालिका कामकाजासाठी वापर केल्याचे प्रमाणपत्र दर महा सादर करणे आवश्यक राहील.

४) सलग १० दिवस किंवा त्यापेक्षा जास्त कालावधीच्या रजेच्या प्रकरणी त्या प्रमाणात इंधनाची प्रतिपूर्ती करण्यात येणार नाही.

५) महापालिकेचे वाहन अनुज्ञेय असलेला अधिकारी जर स्वतःच्या पदाचा कार्यभार सांभाळून दुस-या पदाचा अतिरिक्त कार्यभार सांभाळत असेल तर त्यांना एकाच पदासाठी वाहनाची प्रतिपूर्ती अनुज्ञेय राहील. तसेच दुस-या पदास अनुज्ञेय असलेले वाहन त्यांना वापरता येणार नाही.

६) खाजगी वाहन महापालिका कामकाजासाठी वापरण्याचा पर्याय स्विकारणा-या अधिका-याने महापालिका कामकाजासाठी मुख्यालया बाहेर प्रवास करावयाचा असल्यास त्यांनी त्यांचेच खाजगी वाहन वापरणे आवश्यक आहे.

७) खाजगी वाहन महापालिका कामकाजासाठी वापरण्याचा पर्याय स्विकारणा-या अधिका-यास कोणत्याही परिस्थितीत महापालिका वाहन वापरता येणार नाही.

सही/-
**आयुक्त**
**पिंपरी चिंचवड महानगरपालिका**
**पिंपरी ४११ ०१८**